**अहवाल क्रमांक : १९२**

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत

# तेरावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी विधानसभेस / विधानपरिषदेस सादर करण्यात आला. )

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
२०२२

## पंचायती राज समिती

(२०२०-२०२१)

**(चौदावी महाराष्ट्र विधानसभा)**

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत

# तेरावा अहवाल

# पंचायती राज समिती

## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप जैस्वाल, वि.स.स
(३) श्री. कैलास पाटील (घाडगे) वि.स.स,
(४) डॉ.राहूल पाटील वि.स.स.
(५) श्री. अनिल पाटील, वि.स.स.
(६) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.
(७) श्री. दिलीपराव बनकर, वि.स.स.
(८) श्री. शेखर निकम, वि.स.स.
(९) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.
(१०) श्री. माधवराव पवार, वि.स.स.
(११) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.
(१२) श्री. हरीभाऊ बागडे, वि.स.स.
(१३) डॉ. विजयकुमार गावीत, वि.स.स.
(१४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(१५) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
(१६) *श्री. विजय रहांगडाले, वि.स.स.
(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.
(१८) श्री. प्रशांत बंब, वि.स.स.
(१९) श्रीमती मेघना बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.
(२०) श्री. किशोर जोरगेवार , वि.स.स.
(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.
(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.
(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.
(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.
(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.
(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.
(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.
(३१) श्री. महादेव जानकर, वि.प.स.
(३२) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेन्द्र भागवत, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. प्रकाश थिटे, कक्ष अधिकारी
(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

* डॉ. संजय कुटे, वि.स.स. यांनी समिती सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर श्री. विजय रहांगडाले, वि.स.स. यांची "समिती सदस्य" म्हणून दिनांक १३ ऑक्टोबर, २०२१ रोजी पासून नामनियुक्ती केली.

## पंचायती राज समिती

(सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(५) ॲड. राहुल कुल, वि.स.स.
(६) श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
(७) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(८) ***रिक्त
(९) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
(१०) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(११) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(१२) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(१३) श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
(१४) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
(१६) श्री. भारत भालके, वि.स.स.
(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१८) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१९) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(२०) श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
(२१) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
(२२) ***रिक्त
(२३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.
(२४) श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
(२५) श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२७) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(२८) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.
(२९) * किशोर दराडे, वि.प.स.

(३०) **श्री. निलय नाईक, वि.प.स.

(३१) **श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी.

*श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

**श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

***डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा तेरावा अहवाल सादर करीत आहे.—

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती सहाजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature" सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुसऱ्या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचाऱ्यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१३-२०१४ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-२०१८ साठी गठीत झालेल्या समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेस दिनांक ०४, ०५ व ०६ ऑक्टोबर, २०१८ रोजी भेट देऊन श्री. विश्वजीत माने, मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

तसेच सन २०१७-२०१८ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी आणि सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता गठीत झालेल्या समितीने दिनांक १४ डिसेंबर, २०२१ व १५ डिसेंबर, २०२१ रोजी जिल्हा परिषद, अहमदनगर संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री. मनुकुमार श्रीवास्तव, अपर मुख्य सचिव, महसूल विभाग, श्रीमती वंदना कृष्णा, अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्रीमती जयश्री मुखर्जी, अपर मुख्य सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री. नंद कुमार, अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्रीमती नीलिमा केरकेट्टा, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.जे.पी.गुप्ता,

प्रधान सचिव, कृषी व पशुसंवर्धन विभाग, श्री.एकनाथ डवले, सचिव, कृषी विभाग, श्री.दिनेश डिंगळे, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.प्रविण पुरी, सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.श्रीधर डुबे-पाटील, सह सचिव, महसुल विभाग, श्री.माणिक गुट्टे, सह सचिव, कृषी व पशुसंवर्धन विभाग, श्री.दिलीप गावडे, सह सचिव, आरोग्य विभाग, श्री.विजय चौधरी, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग श्री.नि.अं.पांढरकामे, उप सचिव, मृद व जलसंधारण विभाग, श्री.प्रविण जैन, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.श्रीकांत दे.लोंढे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती सरिता बांदेकर-देशमुख, उप सचिव, कृषी विभाग, श्री.का.गो. वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.पो.द.देशमुख, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.वसंत माने, उप सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, श्री.बि.पु.घोडके, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री.ए.का.गागदे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.पांडुरंग वाबळे, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण आयुक्त कार्यालय, अहमदनगर, डॉ.विजय वृंदेवए, सहसंचालक, आरोग्य विभाग, श्री.माधव नागरगोजे, व श्री.प्रताप मोहिते, संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक २२ मार्च, २०२२ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन व किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २२ मार्च, २०२२.

**संजय रायमुलकर**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करणे या योजनेत झालेल्या अनियमिततेबाबत. | ३.१४/४० | १ |
| (२) | दोन | सन २०१३-२०१४ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या नियमबाह्य प्रकरणांबाबत. | ३.११९३ (६)<br>४.७९८ (३९)<br>४.७९८ (४०)<br>४.७९८ (४१)<br>४.७९८ (४२) | ५ |
| (३) | तीन | शालेय पोषण आहारासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतील १३ कोटींपेक्षा जास्त रक्कम आवश्यकता नसताना कोषागारातून काढुन झालेली अनियमितता. | ३.७८/०९ | १४ |
| (४) | चार | विशेष घटक योजनेंतर्गत मुलींना उपस्थिती भत्ता अनुदान वाटपाबाबत.. | ३.७९/१४<br>३.८०/६९ | २३ |
| (५) | पाच | मजलेश्वर ते बक्तरपूर (ता.शेवगांव) या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. | ३.२०७/०१ | २६ |
| (६) | सहा | मौजे चिचोंडी पा. (ता.अहमदनगर) येथील कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा कामातील अनियमितता. | ३.५१०/२ | ३१ |
| (७) | सात | ‘अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास’ या योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामांसह या योजनेतील अनियमिततेबाबत. | ३.९०९/१४<br>४.२०१/११ | ३५ |
| (८) | आठ | जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे. | ३.१३/१८ | ४२ |
| (९) | नऊ | सर्वसाधारण शिफारशी. | | ५० |
| | | परिशिष्ट - “ अ ”<br>शासन निर्णय व परिपत्रके | | ५३ |
| | | परिशिष्ट - “ ब ”<br>समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | | ८५ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, अहमदनगर

## राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करणे या योजनेत झालेल्या अनियमिततेबाबत.

**परिच्छेद क्रमांक ३.१४/४० (सन २०१३-२०१४)**

जिल्हा परिषद अहमदनगर, सन २०१३-२०१४ (परिच्छेद क्रमांक २२) - सदर योजनेवर सन २०१३-२०१४ या वर्षात रक्कम रुपये १,३९,००,००० इतका खर्च नोंदविण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत :—

महाराष्ट्र शासन, शासन निर्णय अविवि २०१०/प्र.क्र.३१/१०/का ७, दिनांक १४ मे २०१३ मध्ये नमूद केले नुसार निकषात बसत असलेल्या ग्रामपंचायतीचा प्रस्ताव पंचायत समितीकडून जिल्हा परिषदेला १५/०७/२०१३ पुर्वी प्राप्त होणे आवश्यक होते. परंतु अहमदनगर जिल्ह्यातील १४ तालुक्यांपैकी पंचायत समिती राहाता, श्रीगोंदा, श्रीरामपुर, कोपरगांव, राहुरी हे तालुके वगळता इतर तालुक्यांचा प्रस्ताव विहीत मुदतीत प्राप्त नसतानाही त्या तालुक्यातील ग्रामपंचायतींना अनुदान वितरीत केले आहे. वितरण आदेश क्रमांक साप्रवि २/ग्रापं९/४२०/२०१४, दिनांक ३१/०५/२०१४ मध्ये नमुद केलेप्रमाणे सदरचे अनुदान वितरणाचा अहवाल शासनास सादर करणे आवश्यक असताना तो शासनास सादर केलेला नाही.

उपरोक्त शासन निर्णयातील तरतूद 'फ' नुसार संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रशासकीय कामासाठी उपरोक्त योजनेसाठी दिलेल्या एकूण अनुदानापैकी १ टक्का रक्कम उपलब्ध करून देणेत येईल अशी तरतूद आहे. मात्र अशी १ टक्का तरतुद संबंधित कार्यालयास उपलब्ध केली किंवा नाही याबाबतचा खुलासा लेखापरीक्षणा दरम्यान आला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

**आक्षेपात नमुद केलेप्रमाणे खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे.**

१. दिनांक १४/०५/२०१३ चे शासन निर्णयानुसार सदर योजनेअंतर्गत अनुज्ञेय पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेसाठीचे प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीस्तव सादर करावयाचे असल्यास, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती आपल्या शिफारशीसह विहित नमुन्यात दिनांक ०१/०९/२०१३ पर्यंत शासनास सादर करील असे नमूद आहे.

त्याअनुषंगाने अध्यक्ष, अल्पसंख्याक समिती तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.साप्रवि२/ग्रापं९/७६०/२०१३ दिनांक ३१/०८/२०१३ अन्वये सदर योजने अंतर्गत अहमदनगर जिल्ह्यातील प्राप्त झालेले व निकषात बसत असलेल्या ग्रामपंचायतीचे प्रस्ताव दिनांक ०१/०९/२०१३ पुर्वीच मंजुरीस्तव शासनास सादर करणेत आलेले आहेत.

तसेच सन २०१३-१४ या आर्थिक वर्षाकरीता सदर योजने अंतर्गत दिनांक २५/०३/२०१४ चे शासन निर्णयानुसार अहमदनगर जिल्ह्यातील १४ पैकी १३ तालुक्यांमध्ये एकूण १४ ग्रामपंचायतींना रुपये.१,३९,९८,८३७/- इतका निधी मंजूर करणेत आलेला असून वितरीत करणेत आलेला आहे.

२. संबंधित ग्रामपंचायतींच्या कामांचे विहित नमुन्यातील उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करणेत आलेले आहेत.

३. दिनांक १४/०५/२०१३ चे शासन निर्णयामधील (फ) नुसार सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना प्रशासकीय कामकाजासाठी जिल्ह्यांना वितरीत करण्यात येणाऱ्या अनुदानाच्या प्रत्येकी १% इतकी अनुदानाची रक्कम उपलब्ध करून देण्यात येईल असे नमूद आहे.

परंतु प्रत्यक्षात १% इतकी अनुदानाची रक्कम शासन स्तरावरून उपलब्ध करून देण्यात आलेली नाही.

तरी कृपया अनुपालन मान्य होऊन परिच्छेद वगळणेस विनंती आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

**अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०४ ऑक्टोंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की,** राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करणे ही योजना राबविताना झालेल्या अनियमितता. यामध्ये प्रशासकीय कामासाठी अनुदानाच्या १ टक्का रक्कम मिळण्यासाठी शासनाकडे केव्हा पाठपुरावा करण्यात आला आहे ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, संबंधित ग्रामपंचायतीने १५ जूनपर्यंत संबंधित पंचायत समितीकडे प्रस्ताव पाठवावा. संबंधित पंचायत समितीने १५ जुलैपर्यंत जिल्हा परिषदेकडे प्रस्ताव पाठवावा आणि १५ ऑगस्टपर्यंत जिल्हा परिषदेने जी समिती आहे त्यांच्याकडे हे प्रस्ताव पाठवयाचे होते. १५ डिसेंबरपर्यंत सदरचे प्रस्ताव शासनाकडे पाठवायचे होते. यावर समितीने आपल्या जिल्हा परिषदेने हे प्रस्ताव विहित कालमर्यादेत शासनाकडे पाठविले आहेत काय ? असा प्रश्न विचारला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, यामध्ये ५ पंचायत समित्यांपैकी ४ पंचायत समित्यांचे प्रस्ताव आले होते आणि एका पंचायत समितीचे प्रस्ताव आले नव्हते. एकूण १४ पैकी १३ तालुक्यातील पंचायत समित्यांकडून प्रस्ताव रितसर पाठविण्यात आले. मात्र एका पंचायत समितीचे प्रस्ताव दिनांक १ नोव्हेंबर पूर्वीच्या वेळापत्रकानुसार येणे अपेक्षित होते ते पाळण्यात आले नाही. या बाबतीत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती असते. त्या समितीने यासंबंधी अंतिम तारखेपूर्वी निर्णय घेऊन शासनाला अहवाल पाठविला होता व त्यानुसार निधी प्राप्त झाला आहे व त्या त्या ग्रामपंचायतींना वितरित करण्यात आला आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, ज्यांनी असे प्रस्ताव पाठविले नाहीत त्यांच्यावर आपण कोणती कार्यवाही केली ? तसेच त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे होती. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले की, तो एकच तालुका होता. यामध्ये किमान १०० लोकांची एक अल्पसंख्याकांची समिती असणे अपेक्षित आहे. तसेच, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) आणि संबंधित बीडीओ हे याचे प्रमुख असतात. यावर समितीने प्रश्न विचारला की, तेव्हा बीडीओ कोण होते आणि तो तालुका कोणता होता? आपण या संबंधी आढावा घेतला होता काय? आणि घेतला असल्यास कोण कोण बैठकीला आले व कोण आले नाहीत त्यांची यादी समितीला देण्यात यावी. ते का आले नाहीत याबद्दल आपण त्यांच्याकडून माहिती घेतली आहे किंवा कसे ? यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) यांनी समितीला विदीत केले की, तो जामखेड तालुका होता व तत्कालीन बीडीओ यांना बोलाविण्यात आले होते. मात्र ते आलेले नाहीत. यासंबंधी आढावा बैठक घेतली होती व सर्व संबंधितांना बोलाविले होते. या बैठकीला जे अधिकारी उपस्थित आहेत त्यांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या आहेत व जे उपस्थित नाहीत त्यांची यादी समितीस देतो. जे अनुपस्थित होते त्यांच्याकडून ते अनुपस्थित असल्याबाबत कोणताही खुलासा आलेला नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून समितीला सांगण्यात आले की, जे अनुपस्थिती आहे त्यांच्याकडून खुलासा घेण्यात येईल. तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी हे काम घेतले नाही, त्याबद्दल सीईओ तुम्ही आढावा घेतला नाही काय ? आपण विभाग प्रमुखांची आढावा बैठक किती महिन्यातून घेता. विविध विभाग प्रमुखांच्या कामाची प्रगती आपण कधी जाणून घेता. कारण आपल्याकडे प्रचंड काम आहे. आपण जिल्हा परिषदेचा कारभार मिनी मंत्रालयाप्रमाणे चालतो. ज्याप्रमाणे राज्य सरकारची विविध विभाग कार्यरत आहेत त्याप्रमाणे जिल्हा स्तरावर जिल्हा परिषदेमार्फत विविध विभाग कार्यरत आहेत. त्यामुळे असे असताना आपल्या अधिकाऱ्यांकडून अशा पद्धतीने कामकाज होत असेल तर ते योग्य नाही. मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यापूर्वी महापालिकेत होते असे त्यांच्याकडून सांगण्यात आले त्यानुसार समितीला सांगायचे आहे की, महापालिका असो, नगरपालिका असो, पंचायत समिती असो, नगरपंचायत असो किंवा ग्रामपंचायत असो किंवा राज्य सरकार अथवा केंद्र सरकार असो, या सर्व ठिकाणी मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) चे कामकाज एकसारखेच असते. याला वेगळा बेस काहीही नाही.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समिती सांगू इच्छिते की, पंचायती राज समितीचा दौरा येणार असल्याचे आपल्याला किती महिन्यांपूर्वी कळविण्यात आले आहे. समितीच्या मताप्रमाणे या दौऱ्याची माहिती आपल्याला देऊन ३ महिने झाले असावेत. असे असताना आपल्याला त्या खात्याचा प्रमुख म्हणून त्या प्रश्नाशी संबंधित सर्व कागदपत्रे अगोदरच का गोळा करण्यात आले नाहीत. आपण यासंबंधी आढावा घेतला आहे की नाही ? यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला आढावा घेतला आहे असे उत्तर दिले असता समितीने नाराजी व्यक्त करीत विचारणा केली की, मग आपण या विषयासंबंधीची माहिती का घेतली नाही, तुम्हाला याची माहिती जाणून घ्यावी असे वाटले नाही काय ? जामखेड पंचायत समितीचा हा प्रस्ताव का देण्यात आला नाही याबद्दल आपल्याला माहिती घ्यावीशी वाटली नाही काय? आपले कामकाजात लक्ष नाही काय, बाहेर लोकं उपोषण करतात, आपल्याकडे अल्पसंख्याक समाज असताना, त्यांच्यासाठी निधी उपलब्ध असताना आपण अल्पसंख्याक समाजावर अन्याय करीत आहोत असे आपल्याला वाटले नाही काय, केवळ आपल्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे हा लाभ आपण त्यांना देऊ शकलो नाही. यामध्ये तत्कालीन बीडीओ दोषी आहेत आणि तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सुद्धा जबाबदारी होती. जामखेड काही येथून हजार किलो मीटर अंतरावर नाही. त्यामुळे

त्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वतः जाऊन पाहणी करायला हवी होती आणि चौकशी करायला हवी होती. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, त्या अनुषंगाने सन २०१४-२०१५ मध्ये ४२ कामे मंजूर करून घेतली होती आणि त्यानंतर जामखेडचे काम सुद्धा मंजूर झालेले आहे.

तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढील प्रमाणे निर्देश दिले की, सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये जामखेड तालुक्यामध्ये अल्पसंख्याक बांधव असताना सुद्धा लाभार्थ्यांची नावे पाठविण्यामध्ये आपल्या अधिकाऱ्यांकडून दिरंगाई झालेली आहे. त्याचा पाठपुरावा व्हायला पाहिजे होता. मात्र तो झालेला नाही. या बाबतीत इतर तालुक्यातील गट विकास अधिकारी यांनी ज्याप्रमाणे काम केले तसे जामखेडच्या गट विकास अधिकारी यांनी काम करून अनावश्यक होणारा विलंब टाळला असता तर त्या लोकांना न्याय मिळाला असता. त्यामुळे तत्कालीन गट विकास अधिकाऱ्यांनी या लोकांवर अन्याय केलेला आहे. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणी तात्काळ चौकशी करावी व त्यांचे प्रस्ताव न पाठविण्याची कारणे काय आहेत हे तपासून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. त्या तालुक्यामध्ये अल्पसंख्याकावर अन्याय करण्याचे काम झालेले आहे. निधी प्राप्त असताना तो लाभार्थ्यांना मिळू शकलेला नाही. अशा प्रकारचे विषय राज्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असतात. काही वेळा राज्य शासनाकडून निधी सुद्धा मिळत नाही. काही वेळेस निधी देण्यास सरकारकडूनही विलंब होतो. मात्र या ठिकाणी निधी प्राप्त असताना आपण लाभार्थी निश्चित करून तो त्यांना देऊ शकलो नाही, हे योग्य नाही. त्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी आपण या प्रकरणी जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करावी व कार्यवाहीचा अहवाल या समितीला सादर करावा. त्याचप्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांकाना मिळणारा निधी किंवा अनुदान वेळेवर मिळावे, याबाबत सरकारकडून होणारा विलंब टाळावा आणि मंजूर अनुदान लाभार्थ्यांपर्यंत तातडीने वितरित व्हावे याकरिता ही समिती अल्पसंख्याक विभागाच्या सचिवांची साक्ष सुद्धा घेणार आहे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत / पायाभूत सुविधा उपलब्ध करणे ही योजना राबविताना झालेल्या अनियमीततेबाबत सन २०१३-१४ या वर्षामध्ये जामखेड तालुक्यामध्ये अल्पसंख्याक बांधव असताना सुद्धा लाभार्थ्यांची नावे पाठविण्यामध्ये संबंधित अधिकाऱ्यांकडून दिरंगाई झाल्यामुळे निधी प्राप्त असतानादेखील लाभार्थ्यांना मिळु शकला नाही. यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे राज्यातील अल्पसंख्यांकांना मिळणारा निधी किंवा अनुदान वेळेवर प्राप्त व्हावे याबाबत शासनाकडून होणारा विलंब टाळावा आणि मंजुर अनुदान लाभार्थ्यांपर्यंत तातडीने वितरीत व्हावे याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

समितीने उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात खालीलप्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत आहे :—

१. दिनांक १४/०५/२०१३ चे शासन निर्णयामधील (अ) च्या मुद्दा क्र २ नुसार सन २००१ च्या जनगणनेनुसार राज्यातील मुंबई शहर व मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता उर्वरीत ३३ जिल्ह्यांमधील प्रत्येक तालुक्यातील अल्पसंख्याक लोकसंख्येचे संबंधित तालुक्याच्या एकूण ग्रामीण भागाच्या लोकसंख्येशी असलेले प्रमाण विचारात घेऊन त्या त्या तालुक्यामधील योजनेचा लाभ मिळविण्यासाठी पात्र ठरणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या निर्धारित करण्यात आलेली होती. तसेच त्याबाबतचे जिल्हानिहाय व तालुकानिहाय विवरण दिनांक १४/०५/२०१३ चे शासन निर्णयासोबतच्या परिशिष्ट 'अ' व 'ब' मध्ये दर्शविण्यात आले आहे. त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुका वगळता इतर १३ तालुक्यांमधुन १४ ग्रामपंचायती निर्धारित करण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे दिनांक १४/०५/२०१३ चे शासन निर्णयानुसार सदर योजनेंतर्गत जामखेड तालुक्यातील एकही ग्रामपंचायत शासनास निर्धारित करण्यात आल्या नसल्याने प्रस्ताव सादर करता आलेला नाही.

२. दिनांक २२/०९/२०१५ चे शासन निर्णयामधील (ड) नुसार सदर योजनेंतर्गत पात्र ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या मंजुरीबाबत शासनाने ठरवुन दिलेल्या वेळापत्रकानुसार त्या-त्या आर्थिक वर्षात जिल्हा परिषद स्तरावरुन कार्यवाही करणेत येते.

तरी कृपया अनुपालन मान्य होणेस विनंती.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय (योजना - ६)**

जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या अभिप्रायाशी सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने राज्यातील अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मूलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करण्याबाबतच्या योजनेतील झालेल्या अनियमिततेबाबत विभागाने काय कार्यवाही केलेली आहे? अशी विचारणा मुख्य कार्यकारी अधिकारी यांना केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जामखेड तालुक्यामध्ये अल्पसंख्याकांची लोकसंख्या असून देखील सन २०१३-१४ मध्ये एकाही गावाचा समावेश का करण्यात आला नाही, असा समितीचा आक्षेप होता. सन २०१३-१४ साठी दिनांक १४ मे, २०१३ रोजी जो शासन निर्णय निर्गमित केला होता. यावर समितीने ग्रामविकास विभागाच्या सचिवांना विचारणा केली की, आपण उक्त शासन निर्णयाची प्रत समितीला सादर केलेली आहे. आपण विभागाचे सचिव म्हणून या अभिप्रायाशी सहमत आहात काय? यावर विभागिय सचिवांनी विभाग सहमत आहे असे होकारात्मक उत्तर दिले.

तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, उक्त शासन निर्णयामध्ये शासनाने तालुकानिहाय ग्रामपंचायती निर्धारित केल्या आहेत. अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुका वगळता इतर १३ तालुक्यांमधून १४ ग्रामपंचायती निर्धारित करण्यात आलेल्या होत्या. त्यामुळे दिनांक १४.०५.२०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सदर योजनेंतर्गत जामखेड तालुक्यातील एकही ग्रामपंचायत शासन निर्धारित करण्यात आली नसल्यामुळे प्रस्ताव सादर करता आलेला नाही. यावर समितीने पुढीलप्रमाणे प्रश्न उपस्थित केला की, उक्त शासन निर्णयामध्ये या तालुक्यातील ग्रामपंचायती शासन निर्धारित का करण्यात आलेल्या नाहीत? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, जामखेड या तालुक्यातील अल्पसंख्याकांची लोकसंख्या ही तालुक्यातील एकूण लोकसंख्येच्या ०.०९ टक्के असल्यामुळे शासनाकडून एकही ग्रामपंचायत निर्धारित करण्यात आलेली नाही. आता ग्रामपंचायतीच्या एकूण लोकसंख्येनुसार निर्णय घेतला जातो.

## अभिप्राय व शिफारशी

अहमदनगर जिल्ह्यात अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करणे या योजनेअंतर्गत सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात १४ पैकी १३ तालुक्यांमध्ये एकूण १४ ग्रामपंचायतींना रुपये १,३९,९८,८३७/- इतका निधी मंजूर करून वितरीत करण्यात आलेला आहे. या योजनेसाठी निकषात बसत असलेल्या संबंधित ग्रामपंचायतीने १५ जूनपर्यंत पंचायत समितीकडे, पंचायत समितीने १५ जुलैपर्यंत जिल्हा परिषदेकडे, १५ ऑगस्टपर्यंत जिल्हा परिषदेने जिल्हाधिकारी अध्यक्ष असलेल्या समितीकडे व १५ डिसेंबरपर्यंत शिफारशीसह शासनाकडे प्रस्ताव पाठविणे आवश्यक होते. तथापि, जिल्ह्यातील ५ पंचायत समित्यांपैकी ४ पंचायत समित्यांचे प्रस्ताव पाठविण्यात आले परंतु एका पंचायत समितीचा प्रस्ताव पाठविण्यात आला नाही. म्हणजेच १४ तालुक्यांपैकी १३ तालुक्यातील पंचायत समित्यांकडून रितसर प्रस्ताव पाठविण्यात आले. यामध्ये जामखेड तालुक्यामध्ये अल्पसंख्यांक समाजाचे लोक व निधी उपलब्ध असताना या पंचायत समितीचा प्रस्ताव विहित वेळेत पाठविण्यात आलेला नाही. अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे अल्पसंख्यांकांवर अन्याय झालेला असल्याने या प्रकरणाची चौकशी करून जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाई अहवाल समितीस सादर करावा असे समितीने निदेश दिले.

**शासन निर्णयातील तरतुदीनुसार प्रत्येक तालुक्यातील अल्पसंख्यांक लोकसंख्येचे संबंधित तालुक्याच्या एकूण ग्रामीण भागाच्या लोकसंख्येशी असलेले प्रमाण विचारात घेऊन पात्र ठरणाऱ्या ग्रामपंचायतींची संख्या निर्धारित करण्यात येते. त्यानुसार अहमदनगर जिल्ह्यातील जामखेड तालुका वगळून इतर १३ तालुक्यांमधून १४ ग्रामपंचायती निर्धारित करण्यात आल्या होत्या. जामखेड तालुक्यातील अल्पसंख्याकांची लोकसंख्या ही तालुक्यातील एकूण लोकसंख्येच्या ०.०९ टक्के असल्यामुळे शासन निर्णयानुसार या तालुक्यातील एकही ग्रामपंचायत निर्धारित करण्यात आली नसल्याने प्रस्ताव सादर करण्यात आला नाही अशी माहिती विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस प्राप्त झाली. विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने या प्रकरणात शासन निर्णयानुसार योग्य कार्यवाही झाली असल्याचे समितीने सहमती दर्शवली. असे असले तरी याबाबींची सत्यता पडताळण्यासाठी उक्त तालुक्याची एकूण लोकसंख्या व त्यानुसार अल्पसंख्याकांची लोकसंख्या ही तालुक्यातील एकूण लोकसंख्येच्या ०.०९ टक्के असल्याबाबतची सविस्तर माहिती समितीला पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**त्याचप्रमाणे यापुढे अल्पसंख्यांक बांधवावर अन्याय होऊ नये यासाठी अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत/पायाभूत सुविधा उपलब्ध करणे या योजनेअंतर्गत तालुक्यातील अल्पसंख्यांक लोकसंख्येचे संबंधित तालुक्याच्या एकूण ग्रामीण भागाच्या लोकसंख्येशी असलेले प्रमाण योग्य प्रकारे विचारात घेऊनच पात्र ग्रामपंचायती निर्धारित करण्यात याव्यात. तसेच पात्र ग्रामपंचायतींकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांच्या मंजुरीबाबत शासनाने विहित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक आर्थिक वर्षात जिल्हा परिषद स्तरांवरून कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, अहमदनगर

## सन २०१३-२०१४ या वर्षात जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये झालेल्या नियमबाह्य प्रकरणांबाबत

**(१) परिच्छेद क्रमांक ३.११९३(६) (सन २०१३-२०१४)**

| क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | विभाग | परि क्र | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ६ | अहमदनगर | सामान्य प्रशासन विभाग | १७ | ५३,०७,०००/- |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला,—**

आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे खालील प्रमाणे अनुपालन सादर करणेत येत आहे.

सन २०१३-१४ या कालावधीपर्यंत जवाहर रोजगार योजना व इतर योजने अंतर्गत १२१ प्रकरणांमध्ये रक्कम रुपये ५३,०७,०००/- गुंतलेली होती. सदर अपहार प्रकरणांपैकी २९ प्रकरणांत संपुर्ण रक्कम रुपये १२.९९ लक्ष संबंधित पदाधिकारी तसेच कर्मचारी यांच्याकडून वसूल करणेत आलेली आहे. तसेच अपहार प्रकरणांमध्ये गुंतलेल्या पदाधिकारी व कर्मचारी यांच्यावर खालीलप्रमाणे कारवाई करणेत आलेली आहे :—

(१) पोलीसात गुन्हा दाखल करणेत आलेले प्रकरण संख्या- २५

(२) कोर्ट केस-८

(३) ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांना सेवेतुन बडतर्फ करणेत आलेली संख्या-२

(४) मुळवेतनावर आणणेची शिक्षा-६

(५) २ वेतनवाढ कायमस्वरुपी बंद करणे - ३

(६) १ वेतनवाढ २ वर्षासाठी रोखणे- ४

(७) १ वेतनवाढ १ वर्षासाठी रोखणे- १०

दोषी आढळुन आलेल्या सरपंच तसेच ग्रामसेवक यांच्या मालमत्तेवर वसुलपात्र रक्कमा वसूल होण्यास्तव बोजा चढविण्याची कार्यवाही करणेत येत आहे.

दोषी आढळून आलेल्या पदाधिकारी कर्मचारी यांच्याकडून वसुलपात्र रक्कम वसूल करणेकरिता जिल्हा परिषद स्तरावरुन सर्व गट विकास अधिकारी यांना दिनांक ३१/७/२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस तसेच दिनांक २/१२/२०१७ रोजी अंतिम कारणे दाखवा नोटीस बजावणेत आलेली आहे. तसेच विस्तार अधिकारी यांना दिनांक २७/६/२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून पंचायत समिती स्तरावर कलम १४० खालील अपहार प्रकरणांतील रक्कम वसूल करणेची कार्यवाही तसेच त्याअनुषंगाने आवश्यक कारवाई करणेबाबत आदेशीत करणेत आलेले आहे.

तसेच सदर अपहार प्रकरणातील गुंतलेली रक्कम संबंधित पदाधिकारी तसेच कर्मचारी यांचेकडून वसूल करून प्रकरण निकाली काढणेची कार्यवाही जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावर सत्वर करणेत येत आहे.

तरी आक्षेपात नमुद केलेप्रमाणे अनुपालन सादर करणेत आलेले असलेने आक्षेप वगळणेस विनंती आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक :- ४.७९८ (३९)**

**सन २०१३-२०१४ या वर्षात पंचायत समित्यामध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी.**

(१) नियमबाहय बाबीचे स्वरुप--अपहार/अफरातफर प्रकरणांबाबत

(२) अ.क्र.३९

(३) जिल्हा-अहमदनगर

(४) पंचायत समिती--नगर

(५) स्थानिक निधी लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद.क्र.११ रक्कम रु.११६३१३१/-

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात नमुद केलेप्रमाणे खालीलप्रमाणे अनुपालन सादर करणेत येत आहे :—

दिनांक ३१/३/२०१४ रोजी ग्रामनिधी/जवाहर रोजगार योजनेची एकूण २१ प्रकरणामध्ये रक्कम रु.१२९४२७८/-गुंतलेली होती. सदर २१ अपहार प्रकरणापैकी ४ प्रकरणात संपुर्ण रक्कम रु.२८६८७१/-संबंधित कर्मचारी यांचेकडून वसूल करण्यात आली आहे. तसेच अपहार प्रकरणात गुंतलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करणेत आलेली आहे.नगर तालुक्यात कार्यरत २ ग्रामसेवक यांची १ वेतनवाढ बंद करणेत आली असून २ ग्रामसेवक पंचायत समिती कोपरगाव येथे १ व पंचायत समिती अकोले येथे १ कार्यरत असून गटविकास अधिकारी पंचायत समिती कोपरगाव व अकोले यांना कारवाई करणेबाबत कळविले आहे.

शिल्लक १६ प्रकरणांपैकी ७ प्रकरणातील जबाबदार कर्मचारी मयत असून सदर प्रकरणामध्ये गुंतलेली रक्कम रु.४११८७८/-आहे. त्यापैकी रक्कम रु.४३६११/-वसूल झालेली आहे.

९ प्रकरणात जबाबदार कर्मचारी सेवानिवृत्त असून सदर प्रकरणामध्ये गुंतलेली रक्कम रु.५४४६४७/-आहे.त्यापैकी रक्कम रु.९३१८९/- वसूल झालेली आहे.गटविकास अधिकारी पंचायत समिती नेवासा यांना ३ प्रकरणातील रक्कम वसुलीबाबत कळविलेले आहे.शिल्लक प्रकरणांची वसुलीची कार्यवाही चालु आहे.

वरील प्रकरणात जबाबदार कर्मचारी यांना वसुलीबाबत नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य होऊन आक्षेप वगळणेस विनंती.

**(३) परिच्छेद क्रमांक :- ४.७९८ (४०)**

**सन २०१३-१४ या वर्षात पंचायत समित्यामध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी -**

(१) अ.क्र.४०

(२) नियमबाबीचे स्वरुप - अपहार/अफरातफर प्रकरणाबाबत

(३) जिल्हयाचे नाव - अहमदनगर

(४) पं.स. चे नावं - श्रीरामपूर

(५) लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेदक्र.- १७

(६) रक्कम रुपये ४२५०४५/-.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे ग्रामनिधी एकूण ४ प्रकरणा मध्ये गुंतलेली रक्कम रु.४२५०४५/- इतकी अपहार रक्कम त्याची तपशिलवार माहिती पुढीलप्रमाणे.

| ग्रा.पं.चे नाव | ग्रा.से.चे नाव | कायम स्वरुपी | संशयीत रक्कम | |
|---|---|---|---|---|
| वडाळा महादेव | श्री जी.एन .मंडलीक | ० | १६१६८ | निकाली |
| एकलहरे | श्री.एस.एम. पुरी | ० | २६७७५१ | निकाली |
| | श्री.एम.के. जाधव | ० | २८४७७ | |
| | श्री.ए.एम. आहिरे | ० | १५२५ | |
| | श्री. यु.बी. मिसाळ | ० | ४२६५ | |
| | श्री. आर.एफ. जाधव | ० | २२५० | |
| | श्री. एन.आर. नालकर | ० | २६२५ | |
| नायगाव | श्री. जवादे आर.एस. | ५३७८५ | ० | जि. प. कडे समायोजना साठी प्रस्ताव सादर |
| | श्री. देसाई व्ही. ई. | ४०७९८ | ० | |
| घुमनदेव | श्री. पाटील व्ही.एस. | ७४०० | -- | निकाली |
| | **एकूण ..** | **१०१९८३** | **३२३०६२** | |

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे अपहारीत रक्कम रु.४२५०४५/-पैकी रु.१०१९८३/-कायमस्वरुपी व रु.३२३०६२/- संशयीत रक्कम असून कायमस्वरुपी अपहारीत रक्कमेपैकी ग्रामपंचायत घुमनदेव रु.७४००/-चा आक्षेप वगळणेत आलेला आहे व ग्रामपंचायत नायगाव रु.९४५८३/-समायोजन करून व त्रुटींची पूर्तता करून प्रस्ताव मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं) जिल्हा परिषद, अहमदनगर यांना पाठविण्यात आलेला आहे.

संशयीत अपहारित रक्कमेपैकी ग्रामपंचायत वडाळामहादेव रु.१६१६८ व ग्रामपंचायत एकलहरे रु.३०६८९४ समायोजन केलेल्या आदेशास मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद अहमदनगर यांनी मंजूरी दिलेली आहे.त्यांच्या छायांकित प्रती सोबत सादर केलेल्या आहेत.

आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे पूर्तता केलेली असल्याने आक्षेप स्विकृत होणेस विनंती आहे.

**(४) परिच्छेद क्रमांक :- ४.७९८ (४१)**

**नियमबाहय बाबीचे स्वरुप- अपहार /अफरातफर प्रकरणाबाबत.**

अ. क्र. ४१

(१) जिल्हयाचे नांव-अहमदनगर

(२) पंचायत समितीचे नांव-पाथर्डी

(३) लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्र.-५

(४) रक्कम रुपये ६९०७५३/-

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

सन २०१२-१३ चे लेखापरिक्षण कालावधीपर्यंत पंचायत समिती पाथर्डी येथील ग्रामनिधी अंतर्गत एकूण ४४ प्रकरणे प्रलंबित होते. ग्राम निधीतील ४४ प्रकरणांपैकी ३६ प्रकरणामध्ये रक्कम रुपये १,८५,११३ इतकी वसुली करून ते प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत. वसुलीचे चलने सोबत जोडण्यात आलेली आहे. वसुली न झालेली उर्वरित ८ प्रकरणे जुनी असून संबंधित ग्रामसेवक मयत आहेत त्यामुळे वसुली अथवा कारवाई करता आलेली नाही.

अपहारीत ३६ प्रकरणांच्या वसुली प्रकरणी जे ग्रामसेवक कार्यरत आहेत अशा ग्रामसेवका विरुद्ध १ प्रकरणात गुन्हा दाखल केलेला असून रक्कम वसूल केलेली आहे व १ प्रकरणात खातेनिहाय चौकशी करण्यात आलेली आहे.

मागील १० वर्षात सेवानिवृत्त ग्रामसेवक यांना ना-देय प्रमाणपत्र देतांना त्यांचे कडे वसुलपात्र रक्कम नसलेबाबत खात्री करून व वसुलपात्र रक्कम आढळून आल्यास सदर रकमेची वसुली करून तदनंतरच दाखले देण्यात आलेले आहेत.

तरी अनुपाल मान्य होऊन परिच्छेद वगळण्यास विनंती आहे.

**(५) परिच्छेद क्रमांक :- ४.७९८ (४२)**

**सन २०१३-२०१४ या वर्षात पंचायत समित्यामध्ये झालेल्या इतर नियमबाहय बाबी**

| अ.क्र. | नियम बाहय बाबीचे स्वरुप | जिल्हयाचे नाव | पंचायत समितीचे नाव | लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्र. | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ४२ | अपहार/ अफरातफर प्रकरणांबाबत | अहमदनगर | अकोले | १९ | ८२५७१५ |

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

आक्षेपात नमुद केले प्रमाणे ग्रामनिधी स्थानिक निधी विभागाकडील अफरातफर प्रकरणाची नोंदवही अद्यावत करणेत आलेली आहे. त्यानुसार ग्रामनिधीची एकूण ३८ प्रकरणे असून २८ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत शिल्लक १० प्रकरणापैकी ६ प्रकरणाची पुर्तता करून जिल्हा परिषदेकडे सादर करण्यात आलेली आहेत. सदरची रक्कम रुपये ९३७९१.४१ वसूल केलेली आहेत उर्वरित ४ प्रकरणे प्रलंबित असून रक्कम रुपये १२७६९६.५९ रक्कमेची वसुली बाबत संबंधिताना नोटीस देऊन कार्यवाही चालू आहे.

तसेच जवाहर रोजगार योजना/जवाहर समृद्धी योजना/संपूर्ण ग्रामीण योजना २३ प्रकरणा पैकी १० प्रकरणे निकाली काढलेली आहेत उर्वरित १३ प्रकरणापैकी १० प्रकरणाची पुर्तता करून जिल्हा परिषदेकडे मंजूरीसाठी सादर केलेली आहेत.

सदरची रक्कम रु ३४२२३० इतकी असून वसूल केलेली आहे.उर्वरित ३ प्रकरणे प्रलंबित असून रक्कम रुपये २६८२४३ रक्कमेची वसुलीबाबत संबंधितास नोटीस देऊन वसूलीची कार्यवाही चालू आहे.

तरी परिच्छेद स्विकृत होऊन वगळण्यास विनंती आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

**अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली.** साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, सन २०१३-१४ अखेर ४१३ प्रकरणातील प्रलंबित अफरातफरीची रक्कम रुपये १९१.६९ लाख वसुलीचे नियोजन काय आहे व सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीमध्ये अफरातफरीची किती प्रकरणे उघडकीस आली व त्यामध्ये किती रक्कम गुंतलेली होती, त्यापैकी किती प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, यामध्ये ग्राम निधी आणि जवाहर रोजगार योजनांमधील सन २०१३-१४ ते २०१७-१८ या कालावधीत एकूण ४२९ प्रकरणे आहेत. यामध्ये ४ कोटी २८ लाख २२ हजार इतकी रक्कम गुंतलेली आहे. त्यापैकी ७० प्रकरणे निकाली काढली असून त्यामध्ये १ कोटी ४९ लाख १२ हजार इतकी रक्कम वसूल केली आहे. तसेच २५ प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यात फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. ८ प्रकरणांमध्ये कोर्ट केसेस सुरू आहेत. याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी अधिकची माहिती विदीत केली की, २ प्रकरणांमध्ये ग्रामसेवकांना बडतर्फ केलेले आहे आणि त्यांच्यापैकी काही जण सेवानिवृत्त झालेले आहेत. मूळ वेतनावर आणण्याची शिक्षा ६ जणांना दिलेली आहे. २ वेतनवाढ कायम स्वरुपी बंद करण्यात आल्याची ३ प्रकरणे आहेत. १ वेतनवाढ २ वर्षासाठी रोखल्याची कार्यवाही ४ प्रकरणांमध्ये केली आहे आणि १ वेतनवाढ १ वर्षासाठी रोखल्याची कार्यवाही १० प्रकरणांमध्ये केली आहे. यातील ८ प्रकरणांमध्ये कोर्ट केसेस सुरू आहेत. सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमधून ही रक्कम वसूल करण्यात येणार आहे.

तदनंतर समितीने विचारणा केली की, सदर प्रकरण सन २०१३-१४ मधील असून दोषी आढळून आलेल्या ग्रामसेवक व सरपंच यांच्या मालमत्तेवर बोजा चढवून रक्कम वसूल करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे काय? सदर प्रकरणी संबंधितांना दिनांक

३१ जुलै, २०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. त्यानंतर गट विकास अधिकारी यांना अंतिम नोटीस दिनांक २ डिसेंबर, २०१७ रोजी दिली आहे. पंचायत समिती स्तरावरील १४० अपहार प्रकरणातील किती रक्कम वसूल करण्यात आली आहे, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी खुलासा केला की, उक्त प्रकरणांतील ३.२९ कोटी रुपये वसुली करणे शिल्लक आहे. सदर प्रकरणांतील काही लोक मयत झाले आहेत व त्यांचेकडून २५.५७ लाख रुपये रक्कम वसुली करावयाची होती. तसेच, अपहार प्रकरणांतील पदाधिकारी व कर्मचारी यांचेवरील २५ प्रकरणांमध्ये संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहेत, ८ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत, २ ग्रामसेवक/ग्राविकास अधिकारी यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे, ६ कर्मचारी यांना त्यांच्या मूळवेतनावर आणण्याची शिक्षा केली आहे, ३ कर्मचारी यांच्या २ वेतनवाढी कायमस्वरुपी बंद केल्या आहेत, ४ कर्मचारी यांची १ वेतनवाढ २ वर्षांसाठी रोखली आहे व १० कर्मचारी यांची १ वेतन वाढ १ वर्षासाठी रोखण्यात आली आहे. समितीने पुढे अशी विचारणा केली की, अपहार प्रकरणांतील ९० लोकांच्या मालमत्तेवर बोजा चढवणे व त्यांच्या वारसांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्याची कार्यवाही किती दिवसांमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे? उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी विदीत केले की, सदरहू प्रकरणे सन १९६१-६२ ते सन २०१८-१९ पर्यंतची आहेत.

यावर समितीने असे मत व्यक्त केले की, अपहार प्रकरणातील वसुली संदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये प्रकरणे प्रलंबित आहेत. सदरहू प्रकरणांतील वसुली करून प्रकरणे निकाली काढली पाहिजेत. अपहार प्रकरणांतील रक्कम किती दिवसांमध्ये वसूल केली पाहिजे, यासंदर्भात राज्यस्तरावर विभागीय सचिवांशी साक्ष घेण्यात येईल. यावर उपआयुक्त (आस्थापना) आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी विशद केले की, अपहार प्रकरणातील प्रलंबित प्रकरणांचा आयुक्त स्तरावर दरमहा बैठक घेऊन आढावा घेण्यात येतो. अपहार प्रकरणांतील रक्कम निदर्शनास आल्यानंतर तत्काळ कारवाई करणे अपेक्षित आहे.

समितीने अशी विचारणा केली की, अपहार वसुलीची सन १९६२ पासून ते सन २०१३-१४ पर्यंतची एकूण किती प्रकरणे आहेत व सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या कालावधीतील एकूण किती प्रकरणे आहेत, आयुक्त स्तरावरुन उक्त प्रकरणे निकाली काढण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांनी विशद केले की, सन १९६२ पासून सन २०१७-१८ या कालावधीतील एकूण प्रकरणांची संख्या ४२९ असून त्यामधील सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या कालावधीतील ६१ प्रकरणे आहेत. उप आयुक्त (आस्थापना) आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी अधिकची माहिती विशद केले की, काही प्रकरणांतील वसुली झालेली नाही. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आयुक्त स्तरावरून आढावा घेऊन सूचना दिल्या परंतू खालील स्तरावर त्याचे पालन झाले नाही, असे उप आयुक्त यांना म्हणावयाचे आहे काय, उक्त प्रकरणी संबंधितांवर काही कारवाई करण्यात आली नाही, अपहार प्रकरणातील बाब गांभिर्याने घेण्याबाबत सूचना केली व ५७ वर्षांच्या कालावधीतील प्रकरणे प्रलंबित आहेत अपहार प्रकरणांमध्ये ज्यांच्याविरुद्ध आरोप दाखल केले होते त्यातील बरेच लोक सुटले आहेत. अनेक प्रकरणांमध्ये मूळ वेतनवाढ रोखणे व इतर शिक्षा करण्यात आली आहे. जवाहर रोजगार योजनेंतर्गत कोण कोणती कामे हाती घेण्यात आली होती अशीही विचारणा समितीने केली, यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, जवाहर रोजगार योजनेंतर्गत विहीर व इतर कामे घेण्यात आली होती. सदरहू कामांची रक्कम डीआरडीएच्या माध्यमातून देण्यात आली होती. गट विकास अधिकारी यांचे स्तरावरुन कामाचे देयक सादर करण्यात करण्यात आले होते. तद्नंतर समितीने विचारणा केली की, सदरहू प्रकरणांत कामे झाले नसतील तर ग्रामसेवकास का जबाबदार धरण्यात आले आहे. गट विकास अधिकारी यांनी कामाच्या बिलांची तपासणी केलेली आहे. शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांनी कामाची १०० टक्के तपासणी करून सीसी दिलेली आहे. त्यांच्यावर उक्त अपहार प्रकरणी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. ज्यांनी कामाची १०० टक्के तपासणी केली त्यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. अपहार प्रकरणी चुकीच्या लोकांवर कारवाई करण्यात आली आहे. उक्त अपहार प्रकरणी शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई का करण्यात आली नाही यावर उप आयुक्त (आस्थापना) आयुक्त कार्यालय, नाशिक यांनी समितीस विशद केले की, त्यांचेवर कारवाई करण्यात आली नाही.

सन २०१३-१४ मध्ये जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून करण्यात आलेल्या योजनांच्या कामामध्ये अनेक नियमबाह्य बाबी झालेल्या आहेत, अनियमितता झालेली आहे, गैरव्यवहार झालेला आहे. त्यासंदर्भातील काही प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदरहू प्रकरणी कनिष्ठ स्तरावरील संबंधितांवर कारवाई करण्यात आलेली आहे. उक्त प्रकरणांशी संबंधित शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता यांचेवर कारवाई करण्यात आली नाही. सदरहू बाबी मुख्य कार्यकारी अधिकारी व आयुक्तस्तरावरुन पाहणे आवश्यक होते. अपहार प्रकरणातील १ ते ७६ मुद्यांमध्ये उक्त बाबींचा समावेश करणे आवश्यक होते. मुख्य कार्यकारी अधिकारी व आयुक्त स्तरावरुन अफरातफरीच्या प्रकरणी चौकशी करून समितीने सूचित केलेल्या सर्व बाबींचा अंतर्भाव करावा. सदरहू प्रकरणी शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता व कामाचे देयक अदा करणारे मुख्य लेखा व वित्त अधिकारी व गट विकास

अधिकारी यांचेवर कारवाई केली पाहिजे. परंतु केवळ ग्रामसेवक व सरपंच यांचेवर कारवाई करण्यात येते, ही बाब चुकीची आहे. अपहार प्रकरणातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे. त्यामुळे गैरव्यवहाराच्या सर्व प्रकरणांची चौकशी करून गैरव्यवहारातील सर्व संबंधितावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उक्त प्रकरणी केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला २ महिन्यांमध्ये सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले. राज्यामध्ये अपहार प्रकरणांमध्ये कोट्यवधी रुपये रक्कम गुंतलेली असून त्यासंदर्भात राज्यस्तरावर माहिती घेऊन सदर चर्चा करण्यात येईल. त्याकरिता ग्राम विकास व महसूल विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात यावी तसेच आयुक्त कार्यालयाने अपहार प्रकरणी वसूलपात्र रकमांच्या संदर्भात गांभीर्याने लक्ष देण्यात यावे.

समितीने अशी विचारणा केली की, सन २०१३-१४ या वर्षात अहमदनगर, श्रीरामपूर, पाथर्डी, अकोले येथील पंचायत समित्यांमध्ये तफावत रक्कम रु.११.९४ लाख वसूल केली आहेत काय, यावर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदनगर यांनी समितीस खुलासा केला की, त्यापैकी रुपये २,८६,८७९/- इतकी रक्कम वसूल केली आहे. इतर रक्कम वसूल करण्याची कार्यवाही सुरू आहे आणि संबंधितांची वेतनवाढ रोखली आहे. समितीने विचारणा केली की, साडे आठ लाख रक्कम वसूल करावयाची शिल्लक आहे, यामध्ये रक्कम जास्त आहे. त्यामुळे याबाबत गुन्हा दाखल केला आहे काय, ही रक्कम अपहाराची आहे काय यावर गट विकास अधिकारी ,पंचायत समिती, अहमदनगर यांनी खुलासा केला की, अद्याप गुन्हा दाखल केलेला नाही. समितीने गट विकास अधिकारी यांना विचारणा केली की, त्या अधिकाऱ्याची वेतनवाढ रोखून एका वर्षात किती रक्कम वसूल होईल, अपहाराची रक्कम मोठी असल्यामुळे आपण याबाबत गुन्हा का दाखल केला नाही, हे प्रकरण अतिशय गंभीर आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रकरणी तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक होते तरी कार्यवाही का करण्यात आली नाही यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विशद केले की, याप्रकरणी कार्यवाही करणे आवश्यक होते तरी आता तात्काळ कार्यवाही करण्यात येईल.

समितीने निदेश दिले की, या प्रकरणी समिती येण्यापूर्वी कार्यवाही होणे अपेक्षित होते. मात्र तशी कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी तात्काळ जबाबदारी निश्चित करावी व त्याबाबत सखोल चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी आणि तसा अहवाल समितीला १ महिन्याच्या आत सादर करण्यात यावा.

**परिच्छेद क्रमांक ३.११९३ (६) (सन २०१३-१४)**

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या कालावधीत ग्रामविकास निधी आणि जवाहर योजनांमधील अफरातफर/अपहाराच्या एकूण ४२९ प्रकरणांमध्ये रुपये ४ कोटी २८ लाख २२ हजार इतकी रक्कम गुंतलेली आहे. त्यापैकी ७० प्रकरणांमधील रुपये १ कोटी ४९ लाख १२ हजार इतकी रक्कम वसूल केली आहे. उर्वरित ३५९ प्रकरणांमधील २ कोटी ७९ लाख १० हजार रक्कम वसूल करण्यासाठी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून केलेल्या कारवाईचा अहवाल सादर करण्यात यावा व त्याबाबतची सद्यस्थितीत विशद करण्यात यावी.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

आक्षेपात नमूद केल्याप्रमाणे सन २०१७-१८ या कालावधीपर्यंत ग्रामविकास निधी आणि जवाहर योजनांमधील अफरातफर/ अपहाराच्या एकूण ४२९ प्रकरणांमध्ये रुपये ४ कोटी २८ लाख २२ हजार इतकी रक्कम गुंतलेली आहे. त्यापैकी ७० प्रकरणांमधील रुपये १ कोटी ४९ लाख १२ हजार इतकी रक्कम वसूल केली आहे. उर्वरित ३५९ प्रकरणांमध्ये रक्कम रु. २ कोटी ७९ लाख १० हजार इतकी रक्कम गुंतलेली असून त्यापैकी ६६ प्रकरणांमधील रक्कम रु. २०.५१ लक्ष रक्कमेची वसुली/पुर्तता करणेत येऊन प्रकरणे निकाली काढणेत आलेली आहेत.

उर्वरित २९३ प्रलंबित प्रकरणांपैकी ३३ प्रकरणांतील कर्मचारी/पदाधिकरी हे मयत झालेले आहेत. सदर प्रकरणांत रक्कम रुपये ३९,५६,५१२ गुंतलेली असून त्यापैकी रु. १७,५७,०१२ रक्कमेची वसुली/पुर्तता करणेत आलेली आहे व रक्कम रु. २१,९९,५०० वसुली/पुर्तता करणे बाकी आहे. ५४ प्रकरणांतील जबाबदार कर्मचारी हे सेवानिवृत्त झालेले आहेत, त्यात रु. २९,३४,५१७ रक्कम गुंतलेली आहे. पैकी रु. ६,६१,६०८ इतकी रक्कम वसूल करणेत आलेली आहे. व रु. २६,६८,८१९ वसुली/पुर्तता करणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

त्यासाठी दिनांक १९/१/२०२१ रोजी कालबद्ध कार्यक्रमानुसार कार्यवाही करणेबाबत गट विकास अधिकारी यांना आदेशीत केलेले आहे.

तरी अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त - ७)**

जिल्हा परिषद अहमदनगर यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन (ग्रामविकास विभाग) सहमत आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.७९८ (११) ते ४.७९८ (४२) (सन २०१३-१४)**

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१३-१४ या वर्षात अहमदनगर पंचायत समिती मध्ये इतर नियमबाह्य बाबीमध्ये रुपये ११लाख ९४ हजार एवढ्या रकमेची तफावत आढळून येते. त्यापैकी रुपये २ लाख ८६ हजार ८७९ इतकी रक्कम वसूल करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे, या प्रकरणी संबधीताची जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

दि.३१/३/२०१४ रोजी ग्रामनिधी/जवाहर रोजगार योजनेची एकूण २१ अपहार प्रकरणांमध्ये रक्कम रु.११,९५,६५३/- इतकी गुंतलेली होती. सदर २१ अपहार प्रकरणांपैकी ५ प्रकरणातील संपूर्ण रक्कम रु.२,५३,९६२/- संबंधित कर्मचारी यांचे कडून वसुली करण्यात आली असून सदरील प्रकरणे निकाली निघालेली आहेत. उर्वरित १६ प्रकरणांपैकी ८ प्रकरणातील जबाबदार कर्मचारी मयत असून सदर प्रकरणांमध्ये गुंतलेली रक्कम रु.५,२४,८६१/- इतकी आहे, त्यापैकी रक्कम रु.१,०२,७१८/- इतकी वसुली झालेली आहे. उर्वरित ८ प्रकरणात जबाबदार कर्मचारी सेवानिवृत्त असून सदर प्रकरणामध्ये गुंतलेली रक्कम रु.४,१६,८३०/- इतकी आहे.त्यापैकी रक्कम रु ७१५२०/- इतकी रक्कम वसूल झालेली आहे.उर्वरित रक्कम रु ३,४५,३१०/-वसुलीची कार्यवाही चालू आहे. तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन मान्य होणेस विनंती.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त - ७)**

जिल्हा परिषद अहमदनगर यांनी केलेल्या कार्यवाहीशी शासन (ग्रामविकास विभाग) सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या कालावधीत ग्रामविकास निधी आणि जवाहर योजनांमधील अपहाराच्या प्रकरणांतील २ कोटी ७९ लाख १० हजार रुपयांची रक्कम वसूल करण्यात आली आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, लेखापरीक्षणावेळी एकूण ४२९ प्रकरणे होती. त्यामध्ये ४ कोटी २८ लाख रुपये अंतर्भूत होते. त्यानंतर समितीने भेट दिली तेव्हा ३५९ प्रकरणे आणि २ कोटी ७९ लाख १० हजार रुपये वसूल करणे शिल्लक होते. ४२९ प्रकरणांची सद्यःस्थिती समितीला देऊ इच्छितो. उक्त ४२९ प्रकरणांपैकी फक्त ९५ प्रकरणे शिल्लक आहेत. सदर ९५ प्रकरणांतील ३३ प्रकरणातील जबाबदार कर्मचारी मयत झाले आहेत. त्यांच्याकडून ३९ लाख रुपये वसूल करणे शिल्लक होते. त्यापैकी १७ लाख ५७ हजार रुपये वसूल झालेले आहेत. ५४ प्रकरणांतील संबंधित कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. या प्रकरणांमध्ये २९ लाख ३४ हजार रुपये आहेत. त्यापैकी ६ लाख ६१ हजार रुपये वसूल झालेले आहेत. समितीने विचारणा केली की, उर्वरित सर्व रक्कम लवकरात लवकर वसूल करण्यात यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उर्वरित सर्व रक्कम लवकरात लवकर वसूल करण्यात येईल असे स्पष्ट केले.

संचालक स्थानिक निधी (लेखा) यांनी अधिकची माहिती विदीत केली की, हा पूर्ण राज्याचा प्रश्न आहे. दिनांक ८ जून २०१७ रोजी ग्रामविकास विभागाने एक परिपत्रक निर्गमित करून अशा प्रकारच्या प्रकरणांतील गुंतलेली रक्कम सहा महिन्यांच्या आत वसूल करण्याबाबत सूचना केलेल्या आहेत. त्यामुळे सदर परिपत्रकाच्या अनुषंगाने कारवाई करणे बंधनकारक आहे. सेवानिवृत्त झालेल्या

कर्मचाऱ्यांकडे २९ लाख रुपयांची रक्कम अडकलेली आहे. अशा प्रकरणातील अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होत असताना आणि त्यांचे क्लेम फायनल करीत असताना याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. एखादा अपहार किंवा गैरप्रकार झाल्यानंतर किती वर्षांमध्ये वसुली व्हावी व अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये अडकलेली मूळ रक्कम वसूल करावी की ती व्याजासह वसूल करावी, ही धोरणात्मक बाब आहे. महालेखापाल यांच्याकडून काही ठराविक जिल्हे व काही ठराविक संस्थांची निवड करून स्थानिक लेखाकारांनी ऑडीट केलेल्या प्रकरणांचे पुन्हा ऑडीट केले जात आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या प्रकरणांतील रकमेची वसुली ही व्याजासह झाली पाहिजे. एखाद्या प्रकरणामध्ये एखादा अधिकारी/कर्मचारी अमूक रक्कम एकरकमी घेतल्यानंतर देखील आपणाकडून त्या रकमेचे हप्ते पाडून वसुली केली जाते. ही बाब वित्तीय औचित्याला धरुन नाही. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये लवकर निर्णय घेऊन उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे. कारण अशा प्रकारच्या प्रकरणांमध्ये ५-५, १०-१० वर्षे वसुली होत नसेल तर याबाबत विचार करणे आवश्यक आहे. न्यायप्रविष्ठ प्रकरणे वगळून उर्वरित सर्व प्रकरणांवर प्राधान्याने उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे.

समितीने अशी विचारणा केली की, अशा प्रकारच्या प्रकरणांवर कार्यवाही करण्याची जबाबदारी कोणाची आहे? संचालक स्थानिक निधी (लेखा) यांनी विदीत केली की, अशा प्रकारच्या प्रकरणांवर कार्यवाही करणे ही विभाग प्रमुखांची जबाबदारी आहे. मुख्य जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची असली तरी विभागाशी निगडीत असलेले संदर्भांचा पाठपुरावा करणे ही विभाग प्रमुखांची जाबाबदारी आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकची माहिती विशद केली की, संचालक स्थानिक निधी (लेखा) यांनी दिलेल्या सूचनांची नोंद घेतलेली आहे. त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. यावर समितीने होकारार्थी सहमती दर्शविली आहे.

समितीने विचारणा केली की, ३,४५,३१० रुपयांची वसुली झाली आहे काय ? ती वसुली झाली नसेल तर ती पूर्ण करण्यात यावी. या नियमबाह्य बाबी आहेत, सर्व प्रकरणाची वसुली प्रलंबित आहे. याबबात कोणती कार्यवाही करण्यात आली आहे? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की याची कार्यवाही चालू आहे, ती वसुली लवकरच पूर्ण करण्यात येईल. यावर समितीने पुढीलप्रमाणे निदेश दिले की, याकरिता तीन वर्षांचा कालावधी लोटलेला आहे. ही वसुली तातडीने झाली पाहिजे. समितीकडून मिळालेल्या निदेशानुसार मुख्य कार्याकारी अधिकारी यांनी होकारात्मक संमती दर्शविली.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ०४ ते ०६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत अहमदनगर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना भेट देऊन जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, जिल्हा परिषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारिक चर्चा केली. तसेच वित्तिय लेखा परिक्षणांमध्ये आलेल्या आक्षेपांबाबतची तपासणी केली असता समितीच्या निदर्शनास आले की, ग्रामविकास निधी, जवाहर रोजगार योजना व इतर अन्य योजनांच्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व नियमबाह्य बाबी झालेल्या आहेत. त्यामुळे या सर्व प्रकरणांची केलेली चौकशी व त्याअनुषंगाने करण्यात आलेली कारवाई याबाबतची सविस्तर अहवाल समितीस सादर करण्याचे निदेश समितीने दिले.

या प्रकरणांबाबतची अधिक माहिती घेण्यासाठी समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. सदरहू साक्षीत अहमदनगर जिल्ह्यातील गैरव्यवहारांच्या प्रकरणांबाबतची सविस्तर माहिती समितीस सादर करण्यात आली. सन २०१७-२०१८ या कालावधीपर्यंत ग्रामविकास निधी, जवाहर योजना व अन्य योजनांमध्ये एकूण ४२९ गैरव्यवहारांच्या प्रकरणांमध्ये रुपये ४ कोटी २८ लाख २२ हजार इतकी रक्कम गुंतलेली असून त्यापैकी रुपये १ कोटी ४९ लाख १२ हजार इतकी रक्कम वसूल केली आहे. उर्वरित रुपये २ कोटी ७९ लाख १० हजार इतकी रक्कम वसूल करणे शिल्लक आहे. ३३ प्रकरणातील अधिकारी/ कर्मचारी हे मयत झालेले असून या प्रकरणांमध्ये रुपये ३९,५६,५१२/- इतकी रक्कम गुंतलेली असून रुपये १७,५७,०१२/- इतक्या रकमेची वसुली करण्यात आलेली आहे. उर्वरित रुपये २१,९९,५००/- इतकी रक्कम वसूल करणे शिल्लक आहे. ५४ प्रकरणातील अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असून त्यांच्याकडून रुपये २६,६८,८१९/- इतकी रक्कम वसूल करणे शिल्लक आहे.

**अहमदनगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अनेक योजनांमध्ये अनियमितता व गैरव्यवहार झालेले असताना या प्रकरणांची विहित वेळेत चौकशी व त्याअनुषंगाने गैरव्यवहारात गुंतलेल्या रकमेची वसुली त्यासह संबंधितांवर कारवाई होत नसल्याचे, तसेच केवळ ग्रामसेवक व सरपंच यांच्यावरच चौकशी व कारवाई न करता शाखा अभियंता, उप अभियंता, कार्यकारी अभियंता, गट विकास अधिकारी व मुख्य लेखा व वित्त अधिकारी या पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांची देखील चौकशी करून दोषी असल्यास त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, असे समितीचे मत आहे. त्याचप्रमाणे काही प्रकरणांतील गैरव्यवहार करणारे अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले असून त्यांच्याकडून रुपये २६ लाखापेक्षा जास्त रक्कम वसूल करणे शिल्लक आहे. अशा प्रकरणातील अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होत असताना त्यांना "ना-देय" प्रमाणपत्र देताना त्यांच्याकडून वसुलपात्र रकमेची वसुली करणे आवश्यक होते. तसेच या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची चौकशी व त्याअनुषंगाने वसुलीसह**

कारवाई सेवानिवृत्तीनंतर चार वर्षाच्या आत पूर्ण करण्याचीही आवश्यकता होती. तथापि, सेवानिवृत्त होईपर्यंत या अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून दंडात्मक रक्कम वसूल करण्यात आली नाही, ना-देय प्रमाणपत्र न देता काही प्रमाणात त्यांचे सेवानिवृत्ती वेतन रोखून अनियमितता बाबीतील अपहारित रक्कम वसूल करणे आवश्यक असताना देखील तशी कारवाई वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून करण्यात आली नाही, तसेच अनियमिततेतील रक्कम वसूल करणे शिल्लक असताना "ना-देय" प्रमाणपत्र का देण्यात आली यासर्व बाबींची पडताळणी करण्यात आली नाही. ही बाब अत्यंत गंभीर असून दोषी कर्मचाऱ्यांना सरसकट सेवानिवृत्ती वेतन अदा करून त्यांचे विरूद्ध त्यांनी केलेल्या अनियमिततेसंदर्भात प्रलंबित रक्कम वसूल केली नाही या प्रकरणी ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी ना-देय प्रमाणपत्र दिले त्यांचीही चौकशी करण्यात यावी व भविष्यात ना-देय प्रमाणपत्र देण्यासंदर्भात अधिक कडक नियम करावेत अशी समितीची शिफारस आहे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

जिल्ह्यातील अनेक गैरव्यवहाराची प्रकरणे अद्यापही प्रलंबित असून रुपये २ कोटी ७९ लाख १० हजार इतकी रक्कम वसूल करणे शिल्लक आहे. गैरव्यवहारातील मोठ्या प्रमाणातील शिल्लक रक्कम पहाता, "या सर्व प्रकरणांचा आढावा घेऊन एखादा अपहार झाल्यानंतर किती वर्षामध्ये रक्कम वसूल करणे आवश्यक आहे, प्रकरण निहाय मूळ रक्कम वसूल करावी अथवा ती रक्कम व्याजासह वसूल करावी. तसेच काही प्रकरणांमध्ये गैरव्यवहारातील रक्कम हप्ते पाडून वसूल करण्यात येत असल्याने पाच ते दहा वर्षात रक्कम वसूल करण्यात येते. सदरहू बाब वित्तीय औचित्याला धरून नसल्याने एक रक्कमी वसुली होणे आवश्यक आहे. "या सर्व बाबींची तपासणी करून विचारात्मक निर्णय घेऊन न्यायप्रविष्ठ प्रकरणे वगळून उर्वरित सर्व प्रकरणे निकाली काढण्याच्या दृष्टीने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.

ज्या प्रकरणांमध्ये चौकशी पूर्ण झाली आहे, त्या प्रकरणातील संबंधित दोषींवर वसुलीसह वेतन वाढ १ ते २ वर्षासाठी रोखणे, वेतनवाढ कायमस्वरूपी बंद करणे, निलंबित/बडतर्फ करणे, रक्कम वसूल होण्यास्तव बोजा चढविण्याची कार्यवाही करणे. सेवानिवृत्त झालेल्या किंवा होणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांच्या निवृत्तीवेतनाच्या रक्कमेमधून रक्कम वसुली करणे अशा प्रकारची कारवाई तातडीने करण्यात यावी तसेच न्यायालयीन प्रकरणासंदर्भातील प्रकरणे लोक अदालतमध्ये पाठविण्यासंदर्भात व ती तातडीने निकाली काढण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तीन महिन्यांच्या आत समितीस सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.

प्रकरण तीन

**जिल्हा परिषद, अहमदनगर**

**शालेय पोषण आहारासाठी केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतील १३ कोटीपेक्षा जास्त रक्कम आवश्यकता नसताना कोषागारातून काढुन झालेली अनियमितता.**

**परिच्छेद क्रमांक ३.७८/०९ (सन २०१३-२०१४)**

**शालेय पोषण आहार खर्चाबाबत-**

जिल्हा परिषद अहमदनगर सन २०१३-१४ (परिच्छेद क्र.९)शिक्षण विभाग जि.प. अहमदनगरचे लेखा परिक्षणाचे वेळी शालेय पोषण आहारावरील खर्चाची माहिती अर्धसमास पत्र क्र.३ दि.३०.१०.२०१४ अन्वये मागविली असता संबंधीत विभागाने प्रमाणीत केलेली माहिती सादर न करता प्रमाणित नसलेली माहिती लेखापरिक्षणास सादर केली आणि त्यानुसार शालेय पोषण आहारावर एकूण केंद्र शासन रुपये.३९,८९,७१,०००/- व राज्य शासन रुपये १४,३३,२५,०००/-असा एकूण रुपये ५४,२२,९६,०००/- एवढा खर्च केलेला दिसून येतो. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) कोषागारातून आहरित केलेल्या रक्कमेपैकी अखर्चित रक्कम केंद्र शासन रुपये ८,६८,५६,०००/- व राज्य शासन निधी रुपये ५,१३,७२,०००/- असे एकूण १३,८२,२८,०००/- शिल्लक होते. प्रदानाची आवश्यकता नसताना कोषागारातून रक्कम काढणे ही गंभीर अनियमितता आहे.

(२) धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स मुंबई यांना दि.१.१०.२०११ रोजीचा करारनामा केलेला आहे. त्यानंतर सन २०१३-१४ पर्यंत पुरवठादार कायम आहे. करारनामा शर्त १८ प्रमाणे सुरक्षा अनामत रकमेपोटी जमा करायची बँक गॅरंटी ही पुरवठा आदेशापासून १८ महिने कालावधीची होती त्यात सुधारणा केलेची खात्री करता आलेली नाही.

(३) करारनामा शर्त क्र.१७ नुसार विहीत मुदतीत आहाराचा पुरवठा न केल्यास मालाच्या किमतीच्या ०.५ टक्के प्रति आठवडा दंड आकारणी करणे आवश्यक आहे त्यानुसार पंचायत समिती शेवगाव अंतर्गत ऑगस्ट व सप्टेंबर २०१३ मध्ये आणि पंचायत समिती अहमदनगर मध्ये जून ते सप्टेंबर २०१३ या कालावधीत उशिराने मालाचा पुरवठा केल्याबद्दल दंड रुपये १२०,७९१/- वसूल करणे आवश्यक आहे.

(४) देयकावर पुरवठा आदेश व माल पुरवठा दिनांक नमूद नाही. त्यामुळे वेळेत पुरवठा झालेचे खात्री करता आली नाही.

(५) शासन आदेश दि.२.२.२०११ नुसार मालाचा पुरवठा केल्यानंतर १५ दिवसात ९० टक्के रक्कम प्रदान करने व उर्वरीत १० टक्के रक्कम ही धान्यादी मालाचा चाचणी अहवाल व जिल्ह्यातील पोषण आहारा संबंधीच्या तक्रारीचा आढावा घेऊन प्रदान करावयाचे आहे. परंतू या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही.

(६) संगमनेर गटातील शाळांना माल पुरवठा केल्याचे प्रमाणक क्रमांक ११६ दि.६.३.२०१४ व प्रमाणक क्रमांक १५८ दि.१०.३.२०१४ मधील काही शाळांना माल पुरवठा केल्याचा दिनांक हा सन २०१५ ते २०३८ मधील आहे. यावरुन कोणतीही तपासणी न करता प्रदान केल्याचे दिसून येते.

(७) सदर योजनेमुळे प्राथमिक शाळेतील पट नोंदणी व उपस्थिती वाढले बाबतचा फल निश्चिती अहवाल प्राप्त झालेला नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

लेखा परीक्षणाच्या वेळेस पोषण आहार योजना संदर्भातील आवश्यक माहिती सादर केली होती. तथापि, अनावधाने खर्च अहवालाचा गोषवारा स्वाक्षरी न करता सादर करण्यांत आला होता. यापुढे प्रमाणित माहिती सादर करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

अनुपालन अहवाल खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

(१) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत सन २०१३-१४ मध्ये शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचेकडून प्राप्त अनुदानानुसार कोषागारातून रक्कम आहरित केलेली आहे. अखर्चित रक्कम वित्त विभाग, शासन निर्णय दि. ६ जून २००८ (परिशिष्ट क्रमांक ३.१) अन्वये सन २०१४-१५ मध्ये प्रथम प्राधान्याने खर्च करण्यात आलेली आहे.

(२) धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी, शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचेशी दिनांक ०१/१०/२०११ रोजी करारनामा केला आहे. सदर कराराची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी संपली आहे. तद्नंतर निविदा प्रक्रियेद्वारे पुरवठादार निश्चित होईपर्यंत तसेच आहार पुरवठ्यामध्ये खंड पडू नये म्हणून प्राथमिक शिक्षण संचालनालयाने वेळोवेळी मुदतवाढ दिली आहे. करारनाम्यातील शर्तीनुसार वाढीव मुदतीची बँक गॅरंटी घेणेबाबतची कार्यवाही शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत करण्यात येते. अति. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचे, शिक्षण संचालक (प्राथमिक) यांना सादर केलेल्या दिनांक ०५/९/२०१३, दिनांक १०/०१/२०१४ च्या पत्रानुसार बँक गॅरंटीच्या कालावधीमध्ये सुधारणा केलेली आहे.

(३) स्थानिक निधी लेखा परिक्षण परिच्छेदामध्ये वसूलपात्र दंडाच्या रकमेची परिगणना करतांना गोषवाऱ्यातील केंद्रामधील सर्व शाळांच्या (विलंब नसलेल्या शाळांसह) धान्यादि मालाची रक्कम व विलंब झालेल्या आठवड्यांची एकूण संख्या (आठवड्यांची बेरीज) व त्यावरील ०.५० % प्रति आठवडा दंड विचारात घेतला गेल्याने एकूण वसूलपात्र दंडाच्या रकमेत व प्रत्यक्ष वसूल केलेली रक्कम यात तफावत दिसून येते. तथापि, याबाबतची शाळानिहाय वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे आहे. पंचायत समिती शेवगांव अंतर्गत ऑगस्ट व सप्टेंबर-२०१३ (इ.१ ली ते ५ वी ) च्या देयकामधील एक आठवडा विलंब झालेल्या ५५ शाळांना पुरवठा झालेल्या धान्यादि मालाची एकूण रक्कम रुपये ४१८५३१.१० असून सदर रक्कमेवर ०.५० % प्रति आठवडा याप्रमाणे रुपये २०९२.६६ इतकी रक्कम देयकामधून वसूल करण्यांत आलेली आहे.

पंचायत समिती अहमदनगर अंतर्गत ऑगस्ट व सप्टेंबर-२०१३ इ.१ ली ते ५ वीच्या देयकामधील एक आठवडा विलंब झालेल्या ४३ शाळांना पुरवठा झालेल्या धान्यादि मालाची एकूण रक्कम रुपये २४१८१५/- असून सदर रक्कमेवर ०.५० % प्रति आठवडा याप्रमाणे दंडाची रक्कम रुपये १२०९.०७, दोन आठवडा विलंब झालेल्या १८ शाळांना पुरवठा झालेल्या धान्यादि मालाची एकूण रक्कम रुपये १२१७६६.४४ असून सदर रक्कमेवर ०.५० % प्रति आठवडा याप्रमाणे दंडाची रक्कम रुपये १२१७.६६, तीन आठवडा विलंब झालेल्या ३ शाळांना पुरवठा झालेल्या धान्यादि मालाची एकूण रक्कम रुपये ९३०७.०० असून सदर रक्कमेवर ०.५० % प्रति आठवडा याप्रमाणे दंडाची रक्कम रुपये १४०.००, चार आठवडा विलंब झालेल्या ४३ शाळांना पुरवठा झालेल्या धान्यादि मालाची एकूण रक्कम रुपये २५७२६/- असून सदर रक्कमेवर ०.५०% प्रति आठवडा याप्रमाणे दंडाची रक्कम रुपये ५१४.५० असे एकूण रक्कम रुपये ३०८१.२३ पुरवठादार यांचे देयकामधुन वसूल करण्यांत आलेली असून ती योग्य आहे. त्यामुळे लेखा परिक्षण आक्षेपानुसार रक्कम रुपये १२०७९१/- दंड वसूल करण्याची आवश्यकता नाही.

(४) तालुका स्तरावरुन गट शिक्षणाधिकारी यांचेकडून नमूना नंबर १९ मध्ये धान्यादि मालाचे परिपूर्ण देयके, केंद्र निहाय गोषवारा व विहित कालावधीत धान्यादि मालाचा पुरवठा झाल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करून घेतले जाते. त्यानुसार पुरवठा मुदतीत झाल्याची खात्री करुनच देयक अदा करणेत आली आहे.

(५) शासन आदेश दि. ०२.०२.२०११ नुसार मालाचा पुरवठा केल्यानंतर १५ दिवसात पुरवठादाराने ९० टक्के रक्कमेची देयके सादर केलेली नाहीत, त्यामुळे करारनामा दि.१.१०.२०११ अन्वये धान्यादी मालाची देयके तालुकास्तरावरुन प्राप्त झाल्यानंतर प्रयोगशाळेचा तपासणी अहवाल समाधानकारक असल्याबाबत व शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत मालाच्या पुरवठ्याबाबत व दर्जाबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी नसल्याबाबत सर्व सबंधित गटशिक्षणाधिकारी व अधिक्षक (शापोआ) यांनी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार पुरवठा मुदतीत झाल्याची खात्री करुनच १०० टक्के धान्यादि मालाची रक्कम अदा करणेची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(६) संगमनेर गटातील शाळांना पुरवठा केलेला धान्यादी माल हा सन २०१३-१४ या वर्षातीलच आहे असे तालुकास्तरावरील पावत्यांवरुन दिसून येते. तथापि, संगणीकृत गोषवाऱ्यामध्ये नजरचुकीने काही शाळांना माल पुरवठा केल्याचा दिनांक हा सन २०१५ ते २०३८ असा नमूद झालेला आहे. परंतु धान्यादी मालाच्या रकमांची व पावत्यांवरुन पुरवठ्याच्या दिनांकाची तपासणी करुनच देयकांच्या रक्कमा प्रदान केलेल्या आहेत.

(७) शालेय पोषण आहार योजनेमुळे प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इ.१ ली ते इ.८वी च्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

वरीलप्रमाणे अनुपालन अहवाल मान्य होऊन परिच्छेद वगळण्यास विनंती आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०४ ऑक्टोंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कोषागारातून रक्कम केव्हा आहरित केली, रक्कमेची रुपये १३.८२ कोटी अखर्चीत राहण्याचे कारण काय, अंदाजपत्रकामध्ये किती रक्कम मागणी केली होती, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ८ कोटी ६८ हजार आणि ५ कोटी १३ लाख ७२ हजार रुपये असे एकूण रक्कम १३ कोटी रुपये शिल्लक राहिले. नवीन वर्षाच्या सुरुवातीस जो खर्च होईल तो भागविण्यासाठी पुढच्या वर्षात नेला. माहे जून ते ऑगस्ट साठी मागील वर्षाचे अनुदान शासन निर्णय दिनांक ६ जून २००८ अन्वये पुढील वर्षासाठी प्राधान्याने खर्च करण्यासाठी हे पैसे काढण्यात आले होते. दिनांक ६ जून २००८ च्या शासन निर्णयान्वये ही रक्कम काढली होती. पुढील वर्षाचे अनुदान माहे सप्टेंबर मध्ये आले होते. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, कोषागारातून रक्कम काढणे ही गंभीर अनियमितता आहे. १३ कोटी ८२ लाख २८ हजार रुपये शिल्लक होते. प्रदानाची आवश्यकता नसताना कोषागारातून रक्कम काढणे ही गंभीर अनियमितता आहे. तुमच्याकडे (बिल) देयक सादर केलेले नव्हते तरी देखील तुम्ही (पेमेंट) देयकाची रक्कम अदा केलेली आहे. यावर संचालक, स्थानिक निधी लेखापरिक्षा संचालनालय यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विदित केले की, १३ कोटी रुपये खर्च झालेला आहे. एकतर शालेय पोषण आहारासाठी विद्यार्थ्यांची संख्या ठरलेली आहे. दहा टक्के रक्कम इकडे तिकडे होऊ शकते. तुम्हाला रक्कम लागणार नव्हती तर कोषागारातून काढायला नको होती. हे वित्तीय उल्लंघन झालेले आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी निदेश दिले की, माहे सप्टेंबर मध्ये किती मुलांची पटसंख्या आहे त्यानुसार आपण मागणी केली. माहितीच्या अनुषंगाने दहा टक्केचा फरक पडायला नको होता. प्रदानाची आवश्यकता नसताना आपण अतिरिक्त पैसे का काढले, शासनाची आपण दिशाभूल केलेली आहे. तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी काहीच बघितलेले दिसत नाही. कोषागारातून पैसे काढून भरण्याची जबाबदारी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची होती. शिक्षणाधिकाऱ्यांनी तुमच्याकडे बिल टाकल्यानंतर त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी मागणी बरोबर आहे की नाही हे बघणे आवश्यक होते. तुमच्याकडे कोणतेच रेकॉर्ड नाही त्यामुळे ही फार मोठी अनियमितता आहे. मागणी नसतानाही इतकी रक्कम कशाच्या आधारे दिली, याचा चौकशी अहवाल समोर आलेला नाही. तेव्हा तत्कालिन शिक्षणाधिकारी कोण होते? यावर तत्कालिन शिक्षणाधिकारी यांनी ते आता सेवानिवृत्त झालेले आहे असे सांगितले. यावर अधिकाऱ्यांना विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे निट मिळत नाही अशी समितीने नाराजी व्यक्त केली असता, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी समितीस विदित केले की, पोषण आहाराचे हे पैसे आहेत. मार्च महिन्यात १३.८२ कोटी रुपये शिल्लक होते, परंतु हे अनुदान पुढील वर्षी खर्च केलेले आहे. सन २०१३-२०१४ मध्ये राज्य शासनाकडून सप्टेंबर ते नोव्हेंबर मध्ये अनुदान मिळते. हे अनुदान मार्च महिन्यात प्राप्त झाले होते. यातून वर्षभराची रक्कम अदा केलेली आहे. अखर्चित रक्कम पुढील वर्षी खर्च केली जाते. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी दिलेल्या उत्तराने समितीचे समाधान न झाल्याने समितीने मत व्यक्त करून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सूचना केल्या की यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. मूळ मागणी किती होती, किती मागणी केली, सरकारला चुकीची माहिती पाठविली असेल तर याबाबत जबाबदारी निश्चित करावी आणि कारवाईसह अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अहवाल सादर करण्याबाबत होकारात्मक आश्वासन दिले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, सुरक्षा अनामत रकमेचे पैसे जमा करण्यासाठी बँक गॅरन्टीमध्ये काय सुधारणा केली, त्यांनी नवीन बँक गॅरन्टी दिली आहे का? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस संचालक महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड यांच्यामध्ये करारनामा झाला होता अशी माहिती दिली यावर समितीने असे मत व्यक्त केले, धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी सुरक्षा रक्कम १८ महिन्याच्या आत भरली पाहिजे. परंतु १८ महिन्याच्या आत सुरक्षा रक्कम भरली नाही.

यानंतर समितीने निदेश दिले की, धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचेशी करारनामा केला आहे. सदर कराराची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी संपली होती. तद्नंतर निविदा प्रक्रियेद्वारे पुरवठादार निश्चित होईपर्यंत आहार पुरवठ्यामध्ये खंड पडू नये म्हणून प्राथमिक शिक्षण संचालनालयाने वेळोवेळी मुदत वाढ दिली आहे. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार १८ महिन्याच्या आत बँक गॅरन्टी शिक्षण, संचालक यांनी घेणे आवश्यक होते. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह फेडरेशनचे एम.डी, शिक्षण विभागाचे सचिव, संचालक, शिक्षण विभाग यांची साक्ष घेण्यात येईल अशी सूचना केली.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

धान्यादि मालाचा पुरवठा करण्यासाठी, शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचेशी केलेल्या करारनाम्याची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर २०१२ रोजी संपली होती. तथापि, प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून वेळोवेळी मुदतवाढ दिली जात होती. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार १८ महिन्यांच्या आत बँक हमी संचालक, शिक्षण विभाग यांनी न घेतल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशी नुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करून कोणती कारवाई करण्यात आली आहे, याबाबतचा कारवाईसह अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शालेय पोषण आहार योजनेची अंमलबजावणी करण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक २००९/ प्र.क्र.१३६/प्राशि-४/दिनांक १५/०७/२००९ अन्वये नियुक्त केलेल्या समितीमार्फत शालेय पोषण आहार राज्यातील सर्व शाळांना शाळास्तरापर्यंत / केंद्रीय स्वयंपाकगृहापर्यंत तांदूळ वाहतूक करणे तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये धान्यादि मालाचा पुरवठा करणेसाठी मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेमधून महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई या निविदाधारकाची न्युनतम दराचा निविदाधारक म्हणून निवड करण्यात येवून मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक, नागपूर व लातूर या ६ शैक्षणिक विभागासाठी नियुक्ती करण्यात आलेली होती.

त्यानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांनी महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचेशी दि.०१/११/२०११ रोजी करारनामा केला होता.

सदर पुरवठादाराची नियुक्ती ही प्रथम पुरवठा आदेश दिल्यापासून पुढे एक वर्षासाठी करण्यात आली असल्याने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१२ रोजी सदर कराराची मुदत संपलेली होती.

तद्नंतर निविदा प्रक्रियेद्वारे पुरवठादार निश्चित होईपर्यंत तसेच आहार पुरवठ्यामध्ये खंड पडू नये म्हणून शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य पुणे यांनी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे वेळोवेळी मुदत वाढ दिली आहे.

प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे पत्र जा.क्र./शापोआ/ प्राशिस/पुरवठा/२०१२-१३/टे-३०३/ मुदतवाढ कालावधी

१. ७१६२ दि.२२/१०/२०१२ - नोव्हेंबर २०१२

२. ७६८७ दि.०१/१२/२०१२ - डिसेंबर २०१२ ते जानेवारी २०१३

३. ९१ दि.२८/०१/२०१३ - फेब्रुवारी २०१३ ते मार्च २०१३

४. १३८९ दि.०३/०४/२०१३ - एप्रिल २०१३ ते मे २०१३

५. २७४९ दि.१२/०६/२०१३ - जून-२०१३ ते जुलै २०१३

६. ४०३० दि.०६/०८/२०१३ - ऑगस्ट -२०१३ ते सप्टेंबर २०१३

७. ४९१५ दि.१९/०९/२०१३ - ऑक्टोंबर २०१३ ते नोव्हेंबर २०१३

८. ६१६६ दि.२२/११/२०१३ - डिसेंबर २०१३ ते जानेवारी २०१४

९. ३८६ दि.२३/०१/२०१४ - फेब्रुवारी २०१४ ते मार्च २०१४

१०. १६५५ दि.१८/०३/२०१४ - एप्रिल २०१४ ते मे २०१४

११. २६७९ दि.१५/०५/२०१४ - जून २०१४ ते जुलै २०१४

पुरवठादार यांचेकडून बॅंक हमी घेणे बाबतची कार्यवाही शिक्षण संचालक (प्राथमिक) , महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयामार्फत करण्यात येते.

अतिरिक्त कार्यकारी संचालक, महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांनी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य पुणे यांना पाठविलेले पत्र क्रमांक महासंघ/ व्यापार/१६६८/२०१३-१४ दि.१०/०१/२०१४ अन्वये दि.अकोला अर्बन को.ऑप.बँक लि.औरंगाबाद यांचेकडील बँक गॅरंटी क्रमांक १८८ रक्कम रुपये ५०,००,०००/- ची मुदत दिनांक ३१/०५/२०१४ पर्यंत वाढवून देण्यात आलेली आहे.

तद्नंतर सन २०१४ मध्ये शालेय पोषण आहार योजनेची अमंलबजावणी करण्यासंदर्भात शासन निर्णय क्रमांक २००९/प्र.क्र.१३६/ प्राशि-४/दिनांक १५/०७/२००९ अन्वये नियुक्त केलेल्या समितीमार्फत शालेय पोषण आहार राज्यातील सर्व शाळांना शाळास्तरापर्यंत / केंद्रीय स्वयंपाकगृहापर्यंत तांदूळ वाहतूक करणे तसेच ग्रामीण भागातील शाळांमध्ये धान्यादि मालाचा पुरवठा करणेसाठी मागविण्यात आलेल्या जाहीर निविदेमधून महाराष्ट्र स्टेट को.ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई या निविदाधारकांची न्युनतम दराचा निविदाधारक म्हणून निवड करण्यात येवून मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक व लातूर या ५ शैक्षणिक विभागासाठी नियुक्ती करण्यात आलेली होती

त्यानुसार शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को. ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि.मुंबई यांचेशी दि.११/०६/२०१४ रोजी करारनामा केला होता.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

### शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-

सन २०११-२०१२ मध्ये राज्यातील ६ शैक्षणीक विभागामध्ये शालेय पोषण आहार योजनांतर्गत ग्रामीण भागात धान्यादी मालाचा पुरवठा करणे व शहरी व ग्रामिण भागात तांदळाचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई यांची नियुक्ती निविदा प्रक्रियाद्वारे करण्यात आली होती.

निविदा अर्जातील अटी व शर्तीनुसार संबंधित नियुक्त संस्थेने सुरक्षा अनामत रकमेसाठी पुरवठा आदेशापासुन १८ महिने कालावधीसाठी ग्राहय असणारी बँक गॅरंटी जमा करणे आवश्यक होते. त्यानुसार महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई या संस्थेने दिनांक १२/१२/२०११ रोजी दिनांक ३०/४/२०१३ पर्यंतची बॅक गॅरंटी प्राथमिक शिक्षण संचालनालय पुणे येथे जमा केली होती. सदर बँक गॅरंटीची मुदत सपंल्यामुळे वाढीव बँक गॅरंटी जमा करण्याबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून कळविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित बॅकेकडून दिनांक ३१/१२/२०१४ रोजी वाढीव बॅक गॅरंटी प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडे पुरवठादार संस्थेकडून सादर करण्यात आली आहे. बॅक गॅरंटीची मुदत संपल्यामुळे वाढीव बॅक गॅरंटी जमा केल्याशिवाय धान्यादी मालाच्या पुरवठयाची देयके अदा करण्यात येऊ नयेत असे स्पष्ट आदेश संबंधित शिक्षण अधिकारी (प्राथ.) यांना शिक्षण संचालक (प्राथ.) यांच्या स्तरावरुन देण्यात आले होते. त्या नुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने साक्षीच्या वेळी अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना विचारणा केली की, पोषण आहाराबाबत पुरवठादारांना पुरवठा करावयाचा होता त्या कालावधीकरिता बँक गॅरंटी का घेतली नाही असा विषय होता. तसेच करारनामा संपल्यानंतरही पुरवठादाराला मुदतवाढ देण्यात आली होती. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, एक-एक वर्षासाठी करार केला जातो. एफसीआय कडून तांदूळ उचलला जातो व धान्य पुरवठा केला जातो, त्या कालावधीकरिता बँक गॅरंटी घेतली जाते यावर समितीने अशी विचारणा केली की, ज्या ठिकाणी माल पाठवला जातो तेथे त्यांना माहिती नसते. धान्य चांगल्या प्रतीचे आले आहे की, नाही त्याची तपासणी झाली की नाही, प्रयोगशाळेमध्ये त्याची तपासणी झाली की नाही हे सर्व महत्वाचे आहे. मात्र ते होत नाही. या ठिकाणी मुदत संपल्यानंतरही त्यांना मुदतवाढ दिलेली आहे. यामुळे चुकीचे काम झाले आहे. पुरवठादाराने माल सप्लाय केला. त्यांनी परवानगी घेतली नाही. नंतर पंचायती राज समितीच्या लक्षात हा मुद्दा आल्यानंतर मुदतवाढ दिलेली आहे. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला असे विदित केले की, त्यांना शासनाने मुदतवाढ दिली होती. हा करार ऑक्टोबर २०१२ पर्यंत होता, नोव्हेंबर २०१२ पासून मुदतवाढ देण्यात आली होती. ही मुदतवाढ जुलै, २०१४ पर्यंत देण्यात आली होती समितीने या संदर्भात काय नियमावली आहे अशी विचारणा केल्यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केल की, सर्वसाधारणपणे असे अपेक्षित आहे की, नवीन निविदा प्रक्रिया झाली पाहिजे. मात्र काही अपवादात्मक परिस्थितीत मुदतवाढ देण्यात आल्याची घटना या पूर्वीही घडली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, सदर प्रकरणात ५ ते ६ वेळा मुदतवाढ दिलेली आहे. हे आपल्या नियमात बसत नाही. ७ वेळा मुदतवाढ देण्याचे काय कारण होते . अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, विभागाकडून आता असे करण्यात येत नाही, त्यावेळी असे काय झाले या संबंधीचा कागदपत्रे विभागाकडे नाहीत. सध्याचे धोरण असे आहे की नवीन टेंडर प्रक्रिया केली पाहिजे तसेच नवीन टेंडर करण्यासाठी कधी ३ ते ६ महिने लागतात. काही वेळा कोर्टात प्रकरण गेल्यास बराच कालावधी जातो. मध्ये खंड पडू नये या करिता मुदतवाढ दिली जाते. यावर समितीने मत व्यक्त केले की, ही प्रक्रिया चुकीची झालेली आहे. आपण या बाबत समाधानी आहे काय

, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीस विदित केले की, या ठिकाणी मुद्दा वेगळा होता. त्यांनी बँक गॅरंटी देणे अपेक्षित असते. त्यांनी ती उशिराने दिलेली आहे. या संबंधी कारवाई केलेली आहे, तसे तपासले आहे. समितीने अशी विचारणा केली की, काही कालावधीकरिता मुदतवाढ दिल्यानंतर टेंडर प्रक्रिया करण्यासाठी काय उपाययोजना केली होती ? सात वेळा मुदतवाढ दिली. याच एजन्सीला काम मिळाले पाहिजे, यामध्ये कोणाला विशेष रस होता काय , तपासून आपल्याला सांगण्यात येईल. आता मुदतवाढ दिली जात नाही अशी माहिती अपर मुख्य सचिव,शिक्षण विभाग यांनी समितीस दिली.

समितीने हा प्रश्न प्रलंबित ठेवून यामध्ये मार्केटींग फेडरेशनला देखील समाविष्ट करावे लागेल. त्या संबंधी अभिप्राय आलेला नाही. एखाद्या एजन्सीला काम मिळावे अशी शंका या ठिकाणी दिसून येत आहे. म्हणून हा मुद्दा प्रलंबित ठेवू. महाराष्ट्र मार्केटींग फेडरेशनचे व्यवस्थापकिय संचालक यांना पुढील बैठकीला बोलावू. आपण त्याचे डिटेल्स घ्यावे. ग्राम विकास विभागाने अभिप्राय का दिला नाही हे, सर्व आले पाहिजे, असे निदेश समितीकडून सचिवांना देण्यात आले.

उपरोक्त मुद्यांची उर्वरित साक्ष दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना विचारणा केली की, शालेय पोषण आहार खर्चाबाबतचा प्रश्न होता. धान्य मालाचा पुरवठा करण्यासाठी माननीय शिक्षण संचालक, (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड मुंबई, यांचेशी केलेल्या करारनाम्याची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी संपली होती. तथापि, प्राथमिक शिक्षण संचालनालयाकडून वेळोवेळी मुदतवाढ दिली जात होती. करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार १८ महिन्यांच्या आत बँक हमी संचालक, शिक्षण विभाग यांनी न घेतल्याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, असल्यास चौकशीनुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून कोणती कार्यवाही करण्यात आलेली आहे, उक्त कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर केलेला आहे काय, यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांनी समितीस विदित केले की, उक्त प्रकरणी जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी आता अहवाल सादर केलेला आहे. त्या अहवालाशी विभाग सहमत आहे.

सदर निविदा कालावधी हा एक वर्षाचा असतो आणि त्याप्रमाणे त्यांच्याशी करार केला जातो. पुढील वर्षी नवीन निविदा प्रक्रिया केली जाते. मागील काही वर्षात काहीना काहीतरी न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवल्यामुळे सुमारे दीड वर्षासाठी नवीन निविदा अंतिम होऊ शकली नाही. त्यामुळे पूर्वीच्याच म्हणजे व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई, यांना वेळोवेळी दोन-दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर प्रकरण सन २०१२ मधील आहे. मुदतवाढीच्या कालावधीमध्ये बँक हमीचा कालावधी संपला होता. त्यानंतर नवीन करार करण्यात आला. त्यावेळी बँक हमी देखील घेण्यात आली आहे. तांदळाचा पुरवठा करीत असल्यामुळे आपण त्यांच्याकडून बँक हमी घेतो. त्यांनी त्यांच्या कराराच्या कालावधीमध्ये बँक हमी दिली होती. परंतु मुदतवाढीच्या कालावधीमध्ये बँक हमीची मुदत संपुष्टात आली. त्यामुळे जोपर्यंत व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई, वाढीव बँक हमी जमा करणार नाहीत, तोपर्यंत त्यांची देयके अदा करण्यात येऊ नयेत, असे शासनाने असे निदेश दिले होते. त्यामुळे उक्त कालावधीतील त्यांचे कोणतेही देयके अदा करण्यात आले नाहीत. काही कालावधीनंतर त्यांनी वाढीव बँक हमी जमा केली. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई, यांच्या सोबत केलेल्या कराराची मुदत संपणार हे विभागास माहिती होते. तसेच एका वर्षाची बँक हमी आहे, हे देखील आपणास माहिती होते. सर्व कागदपत्रांची पडताळणीकरुनच सदर कंपनीस मुदतवाढ देणे आवश्यक होते. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांनी समितीस विदित केले की, निविदेचा कालावधी एक वर्षाचा होता तरी देखील व्यवस्थापक, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लिमिटेड, मुंबई, यांच्याकडून बँक हमी मात्र दीड वर्षासाठी घेण्यात आली होती. त्यानंतर त्यांना दोन-दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली. सदर सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांची बँक हमीची मुदत संपुष्टात येत असल्याचे लक्षात घेऊन त्यांच्याकडून वाढीव कालावधीची बँक हमी घेणे आवश्यक होते. सदर प्रकरण सन २०१२ मधील आहे. तेव्हा वाढीव बँक हमी का घेण्यात आली नाही, हे स्पष्ट होत नाही. अभिलेख्यावरुन असे दिसून येते की, त्यांची बँक हमी संपल्यानंतर त्यांना देयके अदा करून नयेत, असे शासनाचे निदेश होते. उशिराने का होईना त्यांनी वाढीव बँक हमी जमा केली. त्यानंतर त्यांचे देयके अदा केलेली आहेत.

समितीने अशी विचारणा केली की, देयके प्रलंबित ठेवणे ही नंतरची प्रक्रिया आहे. परंतु बँक हमी आहे की नाही, याबाबी तपासून मुदतवाढ देणे आवश्यक होते. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी कसे काय घडले हे आता माहिती होत नाही. परंतु यापुढे अशी चूक होणार नाही, याची आम्ही पूर्ण काळजी घेऊ. शक्यतो मुदतवाढ देण्यात येऊ नये, असा आम्ही निर्णय घेतलेला आहे. वेळोवेळी मुदतवाढ दिल्यामुळे अशा प्रकारच्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

समितीला दिनांक २२.१०.२०१२ रोजीचे शिक्षण संचालनालय (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अशा आशयाचे पत्र सादर केले. समितीने सदर पत्राचे वाचन केले. "प्रति,१.शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सर्व २. शिक्षणाधिकारी,बृहन्मुंबई, महानगरपालिका, मुंबई, विषय : शालेय पोषण आहार योजना माहे नोव्हेंबर, २०१२ च्या नियमित पुरवठ्याबाबत. संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्र.शापोआ / सुधायो / प्राशिसं / ३०३ / २०११-१२ / १७७७ (अ), दिनांक १/११/२०११. शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत तांदळाची वाहतूक व धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी नियुक्त पुरवठादाराची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी संपत आहे. तांदळाची वाहतूक आणि ग्रामीण भागात इतर धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी निविदा प्रक्रियेद्वारे पुरवठादार निश्चित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आहार पुरवठयात खंड पडू नये म्हणून सध्याचे पुरवठादार दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन लि., मुंबई व महाराष्ट्र कन्झ्यूमर्स फेडरेशन लि., मुंबई यांना माहे नोव्हेंबर, २०१२ साठीचे पुरवठा आदेश त्वरित देण्यात यावेत. आहारात खंड पडून विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित राहणार नाहीत याबाबतची दक्षता घ्यावी."

पत्राच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, नवीन निविदा काढण्यासाठी काही तांत्रिक अडचणी होत्या का किंवा काही न्यायालयीन अडचणी होत्या काय, उक्त विषयासंबंधी अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी असे विदित केले की, विभागाकडून दरवर्षी नवीन निविदा काढण्यात येतात. परंतु न्यायालयीन प्रकरणांमुळे व आपआपसातील वादामुळे, कोणी आक्षेप घेतात तर काही तक्रार करण्यात येते किंवा काहीना काहीतरी कारणास्तव निविदा काढण्यास उशीर होत आहे. त्यामुळे पुर्वीच्या पुरवठादारास मुदतवाढ देणे भाग पडलेले आहे. सन २०१२ मध्ये देखील अशा प्रकारच्या कारणांमुळे दीड वर्षे मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच त्यानंतर मात्र नवीन निविदा काढण्यात आली होती.

तद्नंतर समितीने मत व्यक्त करून खालीलप्रमाणे समितीला आढळुन आलेल्या बाबी निदर्शनास आणुन दिल्या की, सदर करारनाम्याची प्रत संबंधित सर्व मुख्याध्यापक यांच्याकडे असणे आवश्यक आहे. तसेच धान्याच्या दर्जाबाबत मुख्याध्यापक यांना माहिती देणे आवश्यक आहे. पुरवठा करण्यात आलेले धान्याची रँडमली तपासणी केली पाहिजे. समितीने अनेक जिल्ह्यांना भेटी दिलेल्या आहेत. सदर भेटी दरम्यान अनेक ठिकाणी अतिशय निकृष्ठ दर्जाचे धान्य पुरवठा केले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. थोडक्यात सांगावयाचे झाले तर ते धान्य जनावर देखील खाऊ शकत नाही, अशा प्रकारचे धान्य दिले जात आहे. अनेक ठिकाणी पोत्याचे वजन कमी असल्याचे आढळून आले. अशा प्रकारच्या प्रकरणाची आपल्या स्तरावर दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. निकृष्ठ दर्जाचे व कमी वजनाच्या धान्याचा पुरवठा करणाऱ्या कंपनीचे नाव काळ्या यादीमध्ये टाकण्यात यावे, अशी समितीची सूचना आहे. काही ठराविक पुरवठादार अशा प्रकारचे काम करीत आहेत. यांना काळ्या यादीमध्ये टाकले तरी ते नवीन नावाने नवीन परवाना घेतात आणि पुन्हा कंत्राट मिळवितात. मागील १०-१५-२० वर्षापासून ते अशा प्रकारचे काम करीत आहेत आणि अशा प्रकारचे काम करण्याची त्यांना सवय झालेली आहे. आता आपण सर्व शाळांना वजन काटे उपलब्ध करून दिलेले आहेत. पूर्वी अशा प्रकारचे वजन काटे नव्हते. त्यावेळी पुरवठा दाराने सांगितलेले वजन ग्राह्य धरुन धान्य उतरुन घेतले जात होते. बऱ्याच ठिकाणी समितीने तांदळाच्या पोत्यांचे वजन करून पाहिलेले आहे. पुरवठादार काट्यामध्ये खोडाखोड करून ५० किलो मागे तीन ते चार किलो धान्य कमी देत आहेत. समितीने अनेक मुख्याध्यापकांना विचारले की नियमांनुसार तांदळाचे एक पोते किती किलो वजनाचे असावे, त्यावर अनेक मुख्याध्यापकांनी सांगितले की, ५० किलोचे पोते असावे. समितीच्या मते ते ५० किलो ५०० ग्रॅमचे असणे आवश्यक आहे. असे असताना देखील सदर पाते ४७ ते ४८ किलोचे असते. प्रत्येक पोत्यातील धान्य गोळा करून त्या धान्याची काळ्या बाजारामध्ये विक्री केली जाते. त्यामुळे आता यापुढे असे होऊ नये. तसेच शासनाने ठरवून दिलेल्या दर्जाचे धान्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोच झाले पाहिजे, अशा प्रकारचे नियोजन करण्यात यावे. समितीने विविध जिल्ह्यांना भेट देऊन पाहणी केली. उक्त पाहणीमध्ये ज्या ज्या बाबी निदर्शनास आल्या त्यावर उपाययोजना करण्याबाबत समितीमार्फत विभागाला शिफारशी करण्यात येणार आहेत. उक्त शिफारशीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी समितीची सूचना आहे. तसेच ही बैठक संपल्यानंतर देखील आपण संबंधितांना आवश्यक सूचना देण्यात याव्यात.

समितीने दिलेल्या सूचनेवर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी मागील एक-दोन वर्षांमध्ये सदर मुद्दे ग्राह्य धरलेले आहेत. तसेच त्या अनुषंगाने विभागाने बऱ्याच सुधारणा देखील केलेल्या आहेत. आता यानंतर करारनाम्यातील नियम देखील अतिशय कडक करीत आहोत. कोणत्या नियमांचे उल्लंघन केल्यानंतर किती दंड आकारला जाईल, याबाबत देखील सूचना देणार आहोत असे सकारात्मक आश्वासन दिले यावर समितीने होकारात्मक संमती दर्शविली.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-२०१४ या वर्षात अहमदनगर जिल्हा परिषदेने शालेय पोषण आहारावर केंद्र शासनाची रुपये ३९,८९,७१,०००/- व राज्य शासनाची रुपये १४,३३,२५,०००/- असे एकूण रुपये ५४,२२,९६,०००/- एवढी रक्कम खर्च केलेली आहे. कोषागारातून

आहरित केलेल्या रकमेपैकी अखर्चित रक्कम केंद्र शासन रुपये ८,६८,५६,०००/- व राज्य शासन निधी रुपये ५,१३,७२,०००/- असे एकूण १३,८२,२८,०००/- शिल्लक होते. प्रदानाची आवश्यकता नसताना कोषागारातून १३ कोटी पेक्षा जास्त रक्कम काढण्यात आली आहे. धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई यांच्याशी दि. ०१.१०.२०११ रोजी करारनामा केलेला होता. त्यानंतर सन २०१३-१४ पर्यंत पुरवठादार म्हणून कायम ठेवण्यात आलेले आहे. परंतु करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार सुरक्षा अनामत रकमेपोटी जमा करायची बँक गॅरंटीही पुरवठा आदेशापासून १८ महिने कालावधीची होती त्यात सुधारणा करण्यात आलेली नाही. पंचायत समिती स्तरावर उशिराने मालाचा पुरवठा केल्याबद्दल पुरवठादाराकडून दंडात्मक रुपये १,२०,७९१/- इतकी रक्कम वसूल करणे आवश्यक आहे.

याबाबत जिल्हा परिषदेकडून देण्यात आलेल्या स्पष्टीकरणात नमूद केले आहे की, कोषागारातून आहरित केलेली अखर्चित रक्कम सन २०१४-१५ मध्ये प्रथम प्राधान्याने खर्च करण्यात आलेली आहे. सदर कराराची मुदत दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजी संपली होती. तद्नंतर वेळोवेळी मुद्तवाढ देण्यात आलेली आहे. त्यानुसार बॅक गॅरंटीच्या कालावधीमध्ये सुधारणा केलेली आहे. पंचायत समित्यांना विलंबाने पुरवठा केल्याबाबत पुरवठादाराकडून रुपये ३०८१.२३ इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे.

**तालुकास्तरावर गट शिक्षणाधिकारी व शालेय पोषण आहार अधीक्षक यांनी निश्चित केलेल्या पाककृतीनुसार ठरवून दिलेल्या धान्याच्या प्रमाणानुसार परिगणना करून आवश्यकतेनुसार शाळेतील एकूण विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या मालाचा शाळानिहाय मागणी पत्रानुसार पुरवठाधारकास पुरवठा आदेश देण्यात येतो. यासाठी प्रत्येक महिन्यात पटसंख्या निश्चित केल्याचे अभिलेखे अद्ययावत ठेवण्यात येतात. त्यानुसार पुरवठादाराकडून प्राप्त झालेल्या धान्यादी मालाची देयके अदा करण्यासाठी कोषागारातून रक्कम काढणे आवश्यक आहे. शालेय पोषण आहारासाठी विद्यार्थ्यांची संख्या निश्चित असताना त्यात १०% कमी जास्त फरक होऊ शकतो. असे असताना सन २०१३-१४ या वर्षांत केंद्र शासन व राज्य शासन यांच्याकडून प्राप्त झालेल्या निधीतील रु.१३,८२,२८,०००/- इतकी रक्कम आवश्यकता नसताना कोषागारातून काढण्यात आलेली आहे. लेखा परिक्षणास खर्च अहवालाचा गोषवारा स्वाक्षरी न करता सादर करण्यात आला होता. वित्तीय मार्गदर्शक सुचनांचे उल्लंघन झाले असल्याने या व्यवहारात काही अनियमितता झाली आहे काय, अशी शंका उपस्थित होते. यासाठी 'यावर्षीची अखर्चित रक्कम पुढील वर्षी खर्च करताना शासनाची परवानगी घेण्यात आली होती काय, आवश्यक नसताना कोषागारातून १३ कोटी पेक्षा जास्त इतक्या मोठ्या प्रमाणात रक्कम काढता येते काय, सन २०१३-१४ या वर्षाची केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त निधीतील १३.८२ कोटी इतकी रक्कम कुठल्याही प्रकारचे नियोजन न करता शालेय पोषण आहाराच्या वितरणासाठी काढण्यात आल्याची माहिती समितीसमोर आलेली आहे. या प्रकरणी लेखा परिक्षणास कागदपत्रे न दाखविणे, रक्कम कोणकोणत्या बाबींवर खर्च करण्यात आली, तसेच शालेय पोषण आहार वितरणाची नोंदवही अद्यावत नसणे इत्यादीबाबत चौकशी करून समितीला अहवाल पाठविण्याचे निदेश देऊनही समितीला सदरची माहिती जिल्हा परिषदेकडून मिळाली नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीने दिलेल्या निदेशाचे पालन केले नाही. याबाबत समिती नापसंती व्यक्त करते या प्रकरणी चौकशी करून १३.८२ कोटी रु. रक्कम खर्च कशी व कोणकोणत्या बाबींवर करण्यात आली. तसेच या प्रकरणातील नस्ती व नोदवह्या अद्ययावत का ठेवण्यात आल्या नाहीत. त्या लेखा परिक्षणास का दाखविण्यात आल्या नाहीत. इत्यादी प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांची जबाबदारी असूनही त्यांनी ती पार पाडलेली नाही. या प्रकरणी निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर दोषनिश्चिती करण्यात यावी व संबंधितांवर दोषी असल्यास कडक स्वरुपाची कारवाई करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**राज्यातील सहा शैक्षणिक विभागांमध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत धान्यादी माल व तांदळाचा पुरवठा करण्यासाठी महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई यांची दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत नियुक्ती करण्यात आली होती. तदनंतर पुढील पुरवठादार निश्चित होईपर्यंत आहार पुरवठ्यामध्ये खंड पडू नये म्हणून याच पुरवठादारास काही कालावधीसाठी मुदतवाढ देणे योग्य होते. तथापि, याप्रकरणात कराराची मुदत संपलेली असताना माहे ऑक्टोबर, २०१२ ते माहे जुलै, २०१४ या २१ महिन्यांच्या कालावधीत एकूण ११ वेळा पुरवठादारास मुदतवाढ देण्यात आलेली आहे. यामध्ये करारनाम्यातील अटी व शर्तीनुसार अनामत रक्कमेपोटी जमा करावयाच्या बँक गॅरंटींच्या कालावधीत देखील सुधारणा करण्यात आलेली नाही. या पुरवठादाराची माहिती तपासली असता असे निदर्शनास येते की, पंचायत समिती, शेवगांव अंतर्गत ५५ शाळांना एक आठवडा, पंचायत समिती, अहमदनगर अंतर्गत असलेल्या ४३ शाळांना एक आठवडा, १८ शाळांना दोन आठवडा, ३ शाळांना तीन आठवडा, ४३ शाळांना चार आठवडा विलंबाने धान्यादी मालाचा व तांदळाचा पुरवठा केलेला असताना दंडात्मक रुपये १,२०,७९१/- इतकी रक्कम वसूल करण्याऐवजी**

रुपये ३०८१/– इतकी रक्कम वसूल करण्यात आलेली आहे असे असतानाही या पुरवठादारास ११ वेळा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. म्हणजेच एखाद्या पुरवठादारास काम मिळाले पाहिजे या हेतूने सदरहू कार्यपद्धती राबविण्यात आलेली आहे. जिल्ह्यातील शालेय पोषण आहाराच्या धान्यादी मालाचा पुरवठादार नियुक्त करणे, तालुकास्तरावर असलेल्या शाळांना नियमित मालाचा पुरवठा करणे व करारनाम्यातील अटी व शर्तीचे पालन करणे या सर्व कार्यपद्धतीबाबत समिती असमाधान व्यक्त करीत आहेत. यास्तव शालेय पोषण आहार वितरण प्रकरणी अस्तित्वात असलेल्या करारनाम्यातील अटी व शर्तींचे पालन जिल्हा परिषदेतील आहार वितरण व्यवस्थेतील अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून होताना दिसून येत नाही. त्यामुळे आहार वितरण व्यवस्थेत अनेक प्रकारच्या त्रुटींबरोबरच गैरव्यवहार होताना दिसून येतात. या प्रकरणी देखील शाळांना अती विलंबाने धान्यादी मालाचा पुरवठा वितरण व्यवस्थेतील कंत्राटदारांनी केला असल्याने शालेय विद्यार्थी शालेय पोषण आहारापासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे शासनाने ज्या उद्देशाने सदरची योजना राबविण्याचा निर्णय घेतला तो उद्देश सफल झाला नाही. विलंबाने पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराकडून केवळ ३०८१/– रुपये इतकी दंडाची रक्कम वसूल करणे ही बाब अनाकलनीय वाटत असून कंत्राटदाराला प्रशासनाकडून पाठिशी घालण्याचा हा प्रकार असल्याचे दिसून येते. त्यात या कंत्राटदाराला तब्बल ११ वेळा मुदतवाढ देण्यात आली आहे. ही बाब देखील गंभीर आहे. यामुळे कंत्राटदार संस्था जरी निम शासकीय असेल किंवा यंत्रणेवर शासनाचे नियंत्रण असले तरी जे अधिकारी कंत्राटदार म्हणून या संस्थेत काम करीत आहेत. त्यांनी करारनाम्यानुसार मालाचा पुरवठा वेळीच करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने विलंबाने पुरवठा करणे, तसेच पुरवठादारास त्याने अनेक अनियमितता करून सुद्धा तब्बल ११ वेळा मुदतवाढ देणे या प्रकरणी समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून यामध्ये शालेय पोषण आहार वितरणास झालेला विलंब हा कदापिही क्षम्य नाही. यास्तव कंत्राटदार संस्थेतील अधिकारी व शासनातील व जिल्हा परिषदेतील संबंधित अधिकारी यांची निष्पक्षपणे चौकशी करण्यात यावी व दोषी असलेल्या संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा.

समितीने राज्यातील अनेक जिल्ह्यांना भेटी दिल्या असता समितीच्या असे निदर्शनास आले की, अनेक ठिकाणी अत्यंत निकृष्ठ दर्जाचा धान्यादी माल व तांदळाचा पुरवठा तालुकास्तरावरील शाळांना करण्यात येत आहे. धान्यादी मालाच्या पोत्यावरील नमूद असलेल्या ५० किलो अंकामध्ये फेरफार करून प्रत्यक्षात ४७ ते ४८ किलो वजनांची पोती शाळांना पुरवठा करण्यात येतात व या प्रत्येक पोत्यातील दोन ते तीन किलो माल गोळा करून काळ्या बाजारात विक्री करण्यात येतो. असे असताना या पुरवठादारांस काळ्या यादीत टाकण्यात आल्यानंतरही वेगवेगळया नावाने निविदा सादर करीत असल्याने त्यांनाच वारंवार कंत्राट मिळत असून ते मागील १० ते २० वर्षापासून अशा प्रकारे अवैध कामे करीत आहेत. यास्तव शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्रत्येक महिन्याला पुरवठादाराच्या गोदामाला भेट देऊन तांदूळ व धान्यादी मालाचा दर्जा, साठवणूक, वितरण व शिल्लक याबाबतच्या नोंदीची तपासणी करावी, शाळेचे मुख्याध्यापक/शिक्षक व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष/सदस्य यांच्या उपस्थितीत डिजीटल वजन काटयावर मालाचे वजन करून मालाचा दर्जा व्यवस्थित असल्याची खात्री करून पोहोच पावतीवर तसे स्पष्ट नमूद करण्यासह शाळेच्या नोंदवहीवर प्राप्त मालाची नोंद करावी. गोडाऊनमधून मालाचा पुरवठा शाळांना झाल्यानंतर मालाचा नमुना तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यास आवश्यक असून ज्या नमुन्यांचा माल गोडाऊनमध्ये आहे त्याच दर्जाचा व नमुन्यांचा माल शाळांना दिला आहे काय ते तपासावे, शालेय पोषण आहाराचा धान्यादी माल व तांदुळ काळया बाजारात विकला जाऊ नये यासाठी विद्यार्थी ज्या प्रमाणात आहार घेतात त्यानुसार जेवढा लागेल तेवढयाच मालाची मागणी करावी व साठा शिल्लक असल्यास तेवढा कमी करून पुढील मागणी करावी. तसेच करारनाम्यातील अटी व शर्तींचा भंग करणाऱ्या पुरवठादारास कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकावे व त्या पुरवठादाराने वेग वेगळ्या नावाने निविदा टाकल्यानंतरही त्याला पुन्हा कंत्राट मिळणार नाही याची दक्षता घेण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्याच्या आत समितीस सादर करावी.

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, अहमदनगर

### विशेष घटक योजनेंतर्गत मुलींना उपस्थिती भत्ता अनुदान वाटपाबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.७९/१४ व ३.८०/६९ (सन २०१३-२०१४)**

जिल्हा परिषद, अहमदनगर सन २०१३-२०१४ (परिच्छेद क्र.१४) सदर योजनेत सन २०१३-१४ मध्ये रक्कम रु.२०१८०००/- खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

लाभार्थ्यांना उपस्थिती भत्ता वाटप करताना शासन नियमानुसार शाळेत ७५ टक्के उपस्थिती असणे आवश्यक आहे. उपस्थिती भत्ता योजनेची अंमलबाजावणी शासननिर्णयानुसार होते किंवा नाही हे पाहण्यासाठी विस्तार अधिकारी ५० टक्के, गटशिक्षणाधिकारी २५ टक्के व शिक्षणाधिकारी १० टक्के पाहणी करावयाची असून तशा प्रकारचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे तथापि उपस्थिती भत्त्याचे दर दोन महिन्यांतून एकदा प्रदान करावयाचे असताना तशी कार्यवाही केलेली नाही. उपस्थिती भत्ता वाटप करताना ७५ टक्के उपस्थिती असल्याबाबतचा अहवाल दर तीन महिन्यांनी सादर करावयाचा असताना अशी कार्यवाही झाली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

विस्तार अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी यांनी शाळा भेटीच्या वेळी उपस्थिती भत्ता योजनेची पाहाणी केलेली आहे. विद्यार्थिनींची ७५ टक्के उपस्थिती असल्याची खात्री करुनच योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे.

शिक्षण उपसंचालक, प्राथमिक (महाराष्ट्र राज्य पुणे, यांचे कडील अंतिम अनुदान ज्ञापन क्र.१ दि.११.१२.२०१३ अन्वये सन २०१३-२०१४ मध्ये इ.१ ली ते इ.४ थी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता (विशेष घटक योजना) रक्कम रु.४९,००,०००/- मंजूर करण्यात आली असून त्यामधून आवश्यकते नुसार २०,१८,०००/- कोषागारातून आहरीत करून उर्वरित रक्कम रु.२८,८२,०००/- तरतूद समर्पित करण्यात आलेली आहे.

सन २०१३-२०१४ मध्ये उपस्थिती भत्ता विशेष घटक योजना रक्कम रु.२०,१८,०००/- तालुकास्तरावर या कार्यालयाचे वाटपपत्र दि.३.२.२०१४ अन्वये वित्तप्रेषनाद्वारे वितरित करण्यांत आलेली आहे. सदरचा उपस्थिती भत्ता हा लाभार्थी विद्यार्थीनींना शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांच्या उपस्थितीत वाटप करण्यात आला. उपस्थिती भत्ता रक्कम प्राप्त झाल्याबाबत संबंधित लाभार्थ्याची स्वाक्षरी शाळास्तरावर घेण्यात आलेली आहे. शिक्षण उपसंचालक (प्राथमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडून दर दोन महिन्यांनी अनुदान प्राप्त न होता सन २०१३-२०१४ मध्ये विशेष घटक योजनेसाठी एकदाच तरतूद प्राप्त झालेली असून ती आवश्यकतेनुसार वाटप करण्यात आलेली आहे. वाटपाबाबतचे मुख्याध्यापकांचे अहवाल गटशिक्षणाधिकारी यांचे दप्तरी ठेवण्यांत आलेले असून तसे प्रमाणपत्र गटशिक्षणाधिकारी यांचेकडून घेण्यात आलेले आहे.

वरील प्रमाणे अनुपालन मान्य होऊन सदरचा परिच्छेद वगळण्यास विनंती आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०४ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, विशेष घटकांना उपस्थिती भत्ता दर दोन महिन्यांनी अदा केला आहे का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, विद्यार्थीनीची ७५ टक्के उपस्थिती असल्याची खात्री करुनच योजनेचा लाभ देण्यात येतो. प्रत्येक दिवसाचा एक रुपया उपस्थिती भत्ता दिला जातो. सन २०१३-२०१४ मध्ये डिसेंबर महिन्यात उपस्थिती भत्ता आला होता. दोन महिन्याकरिता शासनाकडून अनुदान प्राप्त झालेले नव्हते. या संदर्भात संचालक, स्थानिक निधि लेखापरिक्षा संचालनालय यांच्याकडून सांगण्यात आले की, दर दोन महिन्यांनी उपस्थिती भत्ता दिला जातो. मुली उपस्थित राहतात काय, हा प्रश्न आहे. शासन स्तरावर हा प्रश्न आपल्याला विचारात घ्यावा लागेल. योजनेचा उद्देश सफल होण्यासाठी शासनाने एकत्रित देण्याऐवजी तीन महिन्यांनी हा भत्ता दिला पाहिजे. यावर समितीने निदेश दिले की, विशेष घटकातील तसेच आदिवासी क्षेत्रातील मुलींसाठी उपस्थिती भत्ता दर दोन महिन्यांनी मिळाला पाहिजे म्हणून या विषयासंबंधी शिक्षण विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

विशेष घटक योजनेंतर्गत मुलींना विदयार्थिनींची ७५ टक्के उपस्थिती असल्याची खात्रीकरुन उपस्थिती भत्ता अनुदान दर दोन महिन्यांनी अदा करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाची तसेच आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी घटकातील मुलींना उपस्थिती भत्ता अनुदान वाटपाबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शिक्षण उपसंचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील अंतिम अनुदान ज्ञापन क्र.१ दिनांक ११/१२/२०१३ अन्वये सन २०१३-१४ मध्ये इ.१ ली ते ४ थी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विदयार्थीनींना विशेष घटक योजनेअंतर्गत उपस्थिती भत्त्यासाठी रक्कम रु.४९.०० लक्ष मंजूर करण्यात आलेली आहे.

शिक्षण उपसंचालक(प्राथमिक),महाराष्ट्र राज्य् पुणे यांचेकडून दर दोन महिन्यांनी अनुदान प्राप्त् न होता सन २०१३-१४ मध्ये विशेष घटक योजनेसाठी एकदाच तरतूद प्राप्त् झालेली असून मागणी प्रमाणे तात्काळ वितरीत करण्यात आली आहे.

तसेच सन २०१३-१४ मध्ये इ.१ ली ते ४ थी च्या वर्गात शिक्षण घेणाऱ्या विदयार्थीनींना आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी योजनेअंतर्गत उपस्थिती भत्त्यासाठी शिक्षण उपसंचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य् पुणे यांचेकडील अंतिम अनुदान ज्ञापन क्र. १ दि. ११/०९/२०१३ अन्व्ये रु.६,४९,०००/- दि. २१/११/२०१३ अन्वये रु.६,४९,०००/- व पत्र दि. ११/१२/२०१३ अन्व्ये रु.२,५९,६००/- अशी एकूण रक्कम रु.१५,५७,६००/- मंजूर करण्यात आलेली आहे.

वरील प्रमाणे अनुपालन मान्य होण्यास विनंती आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**शालेय शिक्षण विभागाचा अभिप्राय :-**

शासन निर्णय दिनांक १० जोनवारी १९९२ (परिशिष्ट क्रमांक ४.१) अन्वये इयत्ता १ ली ते ४ थी मधील शाळेत जाणाऱ्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्रा व्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचीत जाती ,भटक्या व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषे खालील विद्यार्थीनीना नियमित शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन प्रत्येक मुली मागे १ रुपया या दराने मुलींच्या पालंकाना उपस्थिती भत्ता दिला जातो. हा भत्ता वर्षभरासाठी मुलगी जितके दिवस शाळेत हजर असेल त्या प्रमाणे दिवसासाठी १ रुपया या दराने दिला जातो. साधारणपणे एक वर्षासाठी सरासरी २२१ ते २३० रुपये एका विद्यार्थीनीस मिळतात.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १३ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग यांनी माहिती दिली की, विशेष घटकातील मुलींना उपस्थिती भत्ता अनुदान वाटपाबाबतचा मुद्दा आहे. यावर अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी समितीला विदित केले की, दर दोन महिन्यांनी भत्ता देण्याऐवजी तो एकत्रित देण्यात आला, या संबंधीचा मुद्दा होता. याबाबत तपासणी केली असता असे दिसून आले की, शासनाकडून अनुदान दर २ महिन्यांनी आले नाही ते एकत्रित आलेले असल्यामुळे शासनाकडून जसे अनुदान मिळाले तसेच ते त्यांनी खाली वाटले आहे. यामध्ये दुसरे काही कारण नाही. सचिवांकडून मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने होकारात्मक सहमती दर्शवली.

**अभिप्राय व शिफारशी**

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील, आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचीत जाती, भटक्या व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील इयत्ता १ ली ते ४ थी च्या वर्गात शिक्षण घेण्याऱ्या विद्यार्थिनींना नियमितपणे शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन १ रूपया या दराने त्यांच्या पालकांना उपस्थिती भत्ता दिला जातो. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात अहमदनगर जिल्हा परिषदेकडून रुपये २०,१८,०००/- इतका खर्च करण्यात आला आहे. लाभार्थ्यांना उपस्थित भत्ता वाटप करताना उपस्थिती, अधिकाऱ्यांकडून पाहणी करून अहवाल सादर करणे व दर दोन महिन्यातून एकदा प्रदान करणे याबाबत योग्य कार्यवाही करण्यात आलेली नाही.

या महत्त्वाच्या विषयाबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार जिल्हा परिषद व विभागाकडून सविस्तर माहिती सादर करण्यात आली. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी व विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस माहिती मिळाली की, 'सन २०१३-२०१४ मध्ये विशेष घटक योजनेसाठी शासनाकडून एकदाच एकत्रित अनुदान प्राप्त झालेले असून आवश्यकतेनुसार वाटप करण्यात आलेले आहे. शाळा भेटीच्या वेळी या योजनेअंतर्गत ७५% विद्यार्थिनीची उपस्थितीची खात्री करूनच योजनेचा लाभ देण्यात आलेला आहे'.

**आदिवासी उपयोजना क्षेत्रातील व आदिवासी क्षेत्राव्यतिरिक्त अन्य भागातील अनुसूचीत जाती, भटक्या व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील विद्यार्थिनी नियमितपणे शाळेत उपस्थित राहून त्यांचा शैक्षणिक दर्जा वाढावा यासाठी उपस्थिती भत्ता ( विशेष घटक योजना ) योजना राबविण्यात येते. या योजनेचा उद्देश सफल होण्यासाठी शासन निर्णयातील नियमानुसार अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून उपस्थिती भत्ता वेळीच देण्याबाबत सकारात्मक कार्यवाही होणे अपेक्षित आहे. असे समितीचे मत आहे. आदिवासी उप योजना क्षेत्रातील व आदिवासी क्षेत्राव्यतिरिक्त अन्य भागातील अनुसूचित जाती, भटक्या व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील विद्यार्थीनी नियमितपणे शाळेत उपस्थित रहाव्यात शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबावी, मुलींनी शिक्षणाच्या प्रवाहात यावे. यासाठी शासनाने सदर प्रवर्गातील मुलींना प्रत्येक दिवशी रु.१/- प्रमाणे उपस्थिती भत्ता देण्याची योजना राबविण्याचा निर्णय घेतला. उक्त निर्णयानुसार जिल्हा परिषदेतील शाळांमध्ये उपरोक्त नमूद केलेल्या प्रवर्गातील मुलींसाठी शासनाकडून दर वर्षी उपस्थिती भत्ता देण्याबाबतची तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. असे असताना संबंधित अधिकारी प्राप्त झालेला उपस्थिती भत्ता मुलींना वेळीच देत नाहीत. या प्रकरणी जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांनी उपस्थिती भत्ता शासन निर्णयाप्रमाणे वेळीच देण्यासाठी त्यासाठी उपलब्ध होणारी तरतूद वेळीच मिळण्याची कार्यवाही विहित मुदतीत करणे आवश्यक आहे. या प्रकरणी ती झाली नसल्यामुळे संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून दोषी असलेल्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच एक रुपया भत्ता हा सध्याच्या काळात खुपच कमी वाटतो त्यात योग्य ती भरीव वाढ करण्याच्या दृष्टिने शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा. त्याचप्रमाणे समानतेचे तत्व अंगाकारून सर्वच मुलींना प्रत्येक दिवशीचा उपस्थिती भत्ता देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

## प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, अहमदनगर

### मजलेश्वर ते बक्तरपूर (ता.शेवगांव) या रस्त्याचे मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.

**परिच्छेद क्रमांक ३.२०७/०१ (सन २०१३-२०१४)**

जिल्हा परिषद अहमदनगर सन २०१३-१४ (परिच्छेद क्रमांक १) सदर कामासाठी सन २०१३-१४ मध्ये रक्कम रुपये १४,३१,१७१/- खर्च नोंदविलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहीता १९६८ चे नियम १५० नुसार तांत्रीक मंजूरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रक तयार करुन त्यांचे तंत्रशाखेत परीनिरीक्षण करणे आवश्यक असतांना तशी कार्यवाही केलेली नाही.

सदर कामाचे मंजुर नकाशे, कॉरीचार्ट,दर पृथ्थकरण, अंदाजपत्रकासोबत व नस्तीमध्ये आढळून आलेले नाही.

त्यामुळे गौणखनिज वाहतुक व खदानीचे अंतर तसेच लीड चार्जेस सह घेतलेले दर योग्य असल्याची खात्री झाली नाही,शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, क्र. तेविआ/२०१०/प्रक्र.२२/वित्त -४ दिनांक ३० ऑगस्ट २०१० (परिशिष्ट क्रमांक ५.१) नुसार जिल्हा परिषद पातळीवरील गुणवत्ता नियंत्रणासाठी त्रयस्त पक्ष नियंत्रण पक्ष गठीत करुन कामाचा दर्जा व गुणवत्ता तपासणे आवश्यक आहे, त्रयस्त पक्ष नियंत्रण गठीत करुन होणारे कामे दर्जेदार व गुणवत्ता पुर्वक करणेबाबत दक्षता ठेवलेली नाही. शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग जिपर-२००९/प्रक्र./१८०/पंरा-८ दिनांक ३१ डिसेंबर २००९ नुसार निविदेमध्ये दोष दायीत्व कालावधी नमुद केलेला नाही. सदर कामासाठी खडीचा नमुना दिनांक २६/०३/२०१२ रोजी तपासणीस पाठवुन दि. ३०/०३/२०१२ रोजी अहवाल प्राप्त आहे. मात्र कामाचा आदेश दि. ०२/०७/२०१३ रोजी दिले आहेत, कामाचे फलक फोटो उपलब्ध न झाल्याने रक्कम रुपये ६४०१/- वसुलपात्र आहे,

तांत्रीक मान्यता आदेशानुसार अंदाजपत्रका सोबत संबंधीत गावाचा अंतर्गत रस्ते, दर्शक प्रस्तावित रस्ते, दर्शक नकाशे जोडला नसल्याने हा रस्ता रस्तेविकास आराखडयात असल्याची खात्री झालेली नाही.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ चे नियम ६७ नुसार कामाची प्रगती नोंदवही. नमुना नंबर २३ व नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना नंबर ६९ ठेवलेली नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती लेखासहीता नियम १५० नुसार तांत्रीक मंजुरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रक तयार करून त्यांचे तंत्रशाखेत परिनिरीक्षण करण्यात येऊन कार्यवाही केलेली आहे, सदरकामाचे मंजूर नकाशे, कॉरी चार्ट, दरपृश्यकरण अंदाजपत्रकासोबत घेण्यात आलेले आहे.

ग्रामविकास व जलसंधारण विभाग क्र. तेविआ/२०१०/प्रक्र.२२/ वित्त विभाग ४ दि. ३० ऑगस्ट २०१० नुसार जिल्हा परिषद पातळीवरील गुणवत्ता नियंत्रणासाठी विहीत प्रक्रिया अंगीकारुन आऊट सोर्सिंग पद्धतीने नियंत्रीत पक्ष गठीत करुन राज्य गुणवत्ता निरिक्षक यांची १४/१/२०१४ रोजी नेमणुक करण्यात आली आहे. सदरचे काम दिनांक २७/१२/२०१३ रोजी पूर्ण झाल्याने राज्य गुणवत्ता निरिक्षक यांचे मार्फत तपासणी केली नाही. तथापी कामासाठी वापरले जाणाऱ्या साहीत्याचे नमुने प्रधानमंत्री ग्रामसडक योजना प्रयोगशाळेतुन तपासणी करुन घेतली असून साहीत्य चांगले असण्याबाबतचा अहवाल प्राप्त झालेला आहे. कामाचा दर्जा व गुणवत्ता चांगली आहे.

शासन निर्णय ग्रामविकास विभाग जलसंधारण विभाग क्रमांक २००९/प्रक्र १८०/पंरा-८/३१ डिसेंबर २००९ (परिशिष्ट क्रमांक ५.२) नुसार सुचीत केलेप्रमाणे ग्रामीण रस्त्याचे बाबतीत दोष निवारण कामाच्या निविदेमध्ये दोषनिवारण कालावधी एक वर्षाचा असल्याचे कार्यारंभ आदेशात नमुद केले आहे.

सदरचे काम सुरू करणेबाबत ग्रामस्थांनी मागणी केल्याने काम सुरू करण्यात आले होते तसेच सद्यस्थितीत रस्त्यासाठी वापरलेले साहीत्याचे नमुने घेऊन पुन्हा तपासणी करुन घेण्यात आली असून तपासणी अहवाल सादर करण्यात आला, असून योग्य आहे. कामाचा फलक फोटो घेण्यात आलेला आहे त्याची सत्यप्रत सादर करण्यात आली आहे त्यामुळे रुपये ६४०१ वसूल पात्र नाही. तांत्रीक मान्यता आदेशानुसार अंदाजपत्रका सोबत संबंधीत कामाचा रस्ते विकास आराखडा अंतर्गत रस्तेदर्शक नकाशा जोडण्यात आलेला आहे. त्याची सत्यप्रत सोबत सादर करण्यात आली आहे. सदर काम रस्ते विकास आराखडयात असलेची खात्री केलेली आहे.

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहीता १९६८ चे नियम ६७ नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना नंबर २३ व १९६८ नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना नंबर ६९ नोंद घेण्यात येऊन अद्ययावत करण्यात आलेली आहे. व त्याची सत्यप्रत सादर केली आहे वरीलप्रमाणे. परिच्छेद मुद्याचे अनुपालन सादर करीत आहे. तरी सदरचा परिच्छेद वगळणेस विनंती आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ०४ ऑक्टोंबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, मजलेश्वर ते बक्तरपूर ता.शेवगांव रस्ता मजबुतीकरण, डांबरीकरण या कामाचा आदेश दिनांक २/७/२०१३ रोजी दिलेला असताना त्यापूर्वी दिनांक २६/३/२०१३ रोजी नमुना तपासणीकरिता कसा पाठविला? कागदपत्रे लेखा परीक्षणावेळी सादर न करणाऱ्यांविरुद्ध कोणती प्रशासकीय कारवाई केली आहे? अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, तांत्रिक शाखा वेगळी असल्यामुळे लेखा परीक्षणाच्या वेळी अंदाजपत्रके व इतर कागदपत्रे दाखविता आली नाहीत. ती कागदपत्रे नंतर दाखविण्यात आली. कामाचा आदेश देण्यापूर्वी खडीचा नमुना पाठविण्यासंबंधी शेवगावच्या सोसायटीला दुसरे काम देण्यात आले होते. त्यावेळी सोसायटीकडून चुकीने दुसऱ्या कामाच्या अनुषंगाने या कामाच्या खडीच्या नमुन्याचे पत्र पाठविण्यात आले व तो नमुना तपासून घेण्यात आला. परंतु नंतर दोन्ही कामांचे खडीचे नमुने तपासणीकरिता पाठवून ते तपासून घेतलेले आहेत व त्यानंतर पेमेंट केलेले आहे. समितीने विचारणा केली की, गुणवत्ता प्रमाणपत्र प्राप्त न होताच साहित्याचा वापर करण्यात आला आहे काय? मालाचा दर्जा चांगला आहे हे कशाच्या आधारावर ठरविण्यात आले आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, सदर कामाची नंतर वर्कऑर्डर दिल्यानंतर त्या साहित्याचा टेस्टींग रिपोर्ट पाठविलेला आहे व तो तपासून घेतला आहे. समितीने पुढे विचारणा केली की, कामाकरिता साहित्याचे नमुने तपासणीकरिता न पाठवता त्यांचा वापर करण्यात आला आहे. कामाचा आदेश देण्यापूर्वी खडीचा नमुना तपासून घेतला आहे काय? अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, त्या संदर्भात पत्र पाठवित असताना कट-पेस्टचा वापर केल्यामुळे चुकून कार्यवाही झाली होती.

समितीने विचारणा केली की, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता १९६८ चे नियम ६७ नुसार कामाची प्रगती नोंदवही नमुना नंबर २३ व १९६८ चे नियम १९७ नुसार पूर्ण झालेल्या कामाची नोंदवही नमुना नंबर ६९ मध्ये नोंद घेऊन अद्ययावत केली आहे काय? त्या नोंदवह्या समितीला दाखविण्यात याव्यात तसेच यासंबंधी सन २०१७-१८ व २०१८-१९ च्या नोंदवह्या समितीला दाखवाव्यात. विभागाकडून समितीला सदर माहिती दाखविण्यात आली.

समितीने विचारणा केली की, मझलेश्वर ते बक्तपूर तालुका शेवगाव रस्ता मजबुतीकरण डांबरीकरणाच्या कामात अनेक त्रुटी आढळून आल्या आहेत तरी तत्कालीन कार्यकारी अभियंता कोण होते ? कार्यकारी अभियंता बांधकाम दक्षिण विभाग यांनी विशद केले की, कोणतेही काम करीत असताना वर्कऑर्डर दिल्यानंतर नमुन्यांची तपासणी करणे अत्यावश्यक आहे. परंतु सदर प्रकरणी नंतर साहित्याची तपासणी झाली आहे. तसेच श्री.तुकाराम गायकवाड त्यावेळी तत्कालीन कार्यकारी अभियंता होते. तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी समितीस अधिकची माहिती विदीत केली की, मी त्यावेळी उप अभियंता म्हणून कार्यरत होतो. दिनांक १/७/२०१३ ते २९/७/२०१३ या काळात माझ्याकडे कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. माझ्याकडे सदर फाईल आल्यानंतर दिनांक २/७/२०१३ रोजी कामाची वर्कऑर्डर दिली होती. मी सन २०१७ मध्ये सेवानिवृत्त झालो आहे. सदर प्रकरणी माझ्या कार्यकाळात टेस्ट रिपोर्ट झालेला नाही.

समितीने विचारणा केली की, गौण खनिज वाहतूक व खदानीचे अंतर तसेच लीड चार्जेससह घेतलेले दर योग्य असल्याची खात्री झाली नाही. याचा अर्थ गौण खनिजाचे साहित्य वापरत असताना लीज व रॉयल्टी परवाना घेतलेला नाही. त्यामुळे रॉयल्टीचे पैसे बिलातून कपात केलेले आहेत. अशाप्रकारे अवैध उत्खनन करुन गौण खनिजाचा वापर केलेला आहे. तसेच अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट असलेल्या लीड चार्जेसनुसार मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदी घेण्यात आल्या आहेत काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, लेखा परीक्षणाच्या वेळी कामाचे मंजूर नकाशे, कॉरी चार्ट, दर पृथःकरण नस्तीमध्ये नसल्यामुळे ते तपासणीकरिता उपलब्ध झाले नव्हते. त्यामुळे लीड चार्जेस घेतल्याची खात्री झाली नाही. कामाचे मंजूर नकाशे, कॉरी चार्ट, दर पृथःकरण अंदाजपत्रकामध्ये सोबत घेण्यात आले.

समितीने विचारणा केली की, १५ लाख रुपयांच्या सदर कामासंबंधी कधी निविदा काढण्यात आली आहे? तसेच रॉयल्टीचा पुरावा जोडला आहे काय ज्या कामावर सध्या ही खडी टाकली आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, यामध्ये रॉयल्टीचे पैसे बिलातून कापून घेतले आहेत.

समितीने विचारणा केली की, उत्खननाचा परवाना नसताना बेकायदेशीरपणे काम केलेले आहे. त्या कंत्राटदाराला अधिकचे पेमेंट दिले आहे. रॉयल्टीचे पैसे बिलातून कापले आहेत. देयकातून पैसे कापले म्हणजे विना परवाना गौण खनिजाचा वापर केला आहे. ती खाण मान्यताप्राप्त होती काय? अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रश्नाचे उत्तर देण्यास असमर्थता दर्शविली. समितीने सुचीत केले की, समितीकडे प्रत्येक लेखा आक्षेपनिहाय पुस्तकामध्ये माहिती उपलब्ध आहे असे असताना आपल्याला याचे उत्तर देता येत नाही. हे योग्य नाही. ते काम १५ लाख रुपयांचे असून विना निविदा दिलेले आहे. ते काम कोणत्या संस्थेला देण्यात आले आहे असे समितीने विचारणा केली असता अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले की, ते काम एका मजूर संस्थेला देण्यात आले आहे व त्यासाठी ई निविदा काढण्यात आली होती. या कामी दिनांक १६.१.२०१३ ते दिनांक २१.१.२०१३ या कालावधीत ई निविदा काढण्यात आली होती व त्यामध्ये ३ निविदाधारकांनी भाग घेतला होता. सर्वात कमी असलेल्या एक मजूर संस्थेला ते काम देण्यात आले होते.

समितीने मत व्यक्त केले की, परवाना असलेल्या खाणीमधून माल उचलला आहे. पण त्यासाठी चार्ज आकारला हे सिद्ध होत नाही आणि त्या आकारानुसार त्यांनी उत्खनन करुन गौण खनिज काढल्याचे सिद्ध होत नाही. तरीही त्याला या रस्त्याचे काम करताना अधिकचा पैसा दिलेला आहे. संपूर्ण राज्यामध्ये जुनी पद्धत सुरू आहे तर आपण त्याला गौण खनिजामधून अशा पद्धतीने पैसे कापून सवलत का दिली ? समितीला माहिती देताना सांगितले की ही खनिज मजूर सहकारी संस्था आहे. त्यांना निविदा काढून काम देण्यात आले आहे तर या मजूर सहकारी संस्थेमध्ये निदान मजूर तरी आहेत काय, यासाठी नियमानुसार तो निविदाधारक व्यक्ती स्वतः मजूर असावा लागतो. त्याच्याकडे मजूर असल्याचे जॉबकार्ड आहे काय आणि ते तपासले आहे काय, अशा मजूर संस्थेचे सचिव आणि अध्यक्ष हे सुद्धा प्रत्यक्ष रस्त्यावर टोपले घेऊन काम करणारे असले पाहिजेत. मात्र अशा संस्थेचे पदाधिकारी कधीच रस्त्यावर प्रत्यक्ष काम करताना दिसत नाहीत. ते फक्त त्या संस्थेच्या नावाखाली कामे मिळवितात अशा प्रकारच्या मजूर सहकारी संस्थेला काम कसे देण्यात येते केवळ डीडीआरच्या शिफारशीनुसार करण्यात येते. आणि तो डीडीआर सुद्धा या बाबी तपासत नाही.

समितीने निदेश दिले की, मझलेश्वर ते बक्तपूर ता. शेवगांव या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणामध्ये झालेल्या कामासंबंधी जिल्हा परिषदेने समाधानकारक उत्तर दिलेले नाही. त्यामुळे या प्रकरणी जे कोणी तत्कालीन अधिकारी असतील त्यांची चौकशी होणे आवश्यक आहे. प्रस्तुत रस्त्याचे काम गुणवत्ता चाचणीवर आधारित झालेले नाही. त्यामुळे ते काम कधी झाले, त्या कामाची निविदा कधी काढली होती, त्यामध्ये कोणी कोणी भाग घेतला होता, निविदा कशी मंजूर झाली, निविदाधारकाने मोठ्या प्रमाणावर विना परवाना गौण खनिज कसा वापरला, गौण खनिजाची रॉयल्टीची रक्कम देयके अदा करताना त्यामधून कशी कापली, या सर्व प्रकरणी कशी अनियमितता झाली. जी कागदपत्रे उपलब्ध व्हायला हवी होती ती का दाखविण्यात आली नाहीत. या संपूर्ण प्रकरणी कोणते अधिकारी दोषी आहे व कार्यवाहीसाठी कोण कारणीभूत आहे ते तपासणे आवश्यक आहे. या प्रकरणात नियमबाह्य काम झालेले आहे म्हणून या बाबतीत तत्कालीन जे कोणी अधिकारी असतील त्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन कार्यवाहीसह या समितीला १ महिन्याच्या आत अहवाल सादर करण्यात यावा.

यावर समितीने सूचित केले की, संबंधित कंत्राटदाराने परवाना असलेल्या खाणीतून खडी काढली आहे. मात्र त्या कंत्राटदाराला त्या गौण खनिजावर स्वामीत्वधनाची रक्कम (रॉयल्टी) मागितली पाहिजे. या कामी सक्षम अधिकाऱ्याची वर्क ऑर्डर झाल्यानंतर संबंधित कंत्राटदाराने गौण खनिज उचलण्याचे परवाना पत्र मागितले पाहिजे. खनिकर्म अधिकाऱ्याकडून अशा परवान्याचे पत्र द्यायचे असते. पण हे कधीच पाहिले जात नाही. जेव्हा त्या ठेकेदाराची गाडी पकडली जाते तेव्हा तहसीलदार किंवा पोलीस त्याच्यावर १० हजारापासून १ लाखापर्यंत दंडात्मक कार्यवाही करतात. नाईलाजाने तो ठेकदार ही दंडाची रक्कम भरतो. मात्र त्याच्यावर कार्यवाही होत नाही किंवा त्याच्या व्यवसायावर कार्यवाही होत नाही. या प्रकरणी रॉयल्टी का वसूल केली नाही, रॉयल्टी वसूल करण्याची जबाबदारी संबंधित तहसीलदार आणि मायनिंग ऑफिसर यांची असते. अशा वेळी त्या तहसीलदारावर जबाबदारी निश्चित होणे गरजेचे असते. मात्र त्या ठेकेदारावर ती जबाबदारी निश्चित होऊ शकत नाही. त्या ठेकेदाराची वर्क ऑर्डर झाल्यानंतर त्याला परवाना देण्याची जबाबदारी तहसीलदार व संबंधित मायनिंग ऑफिसरची असते त्यामुळे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. त्यामुळे एका बाजूला शासनाच्या महसूलाचे नुकसान होते व दुसरीकडे तो गरीब माणूस नाहक भरडला जातो. कारण प्रत्येक वेळी त्याची गाडी अशा पद्धतीने पकडली जात असते. या प्रकरणी सर्व संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन १ महिन्यामध्ये कार्यवाहीसह समितीला अहवाल सादर करावा. त्याचप्रमाणे हा विषय राज्यातील इतर जिल्ह्याशी सुद्धा संबंधित असल्यामुळे या प्रकरणी संबंधित सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

मजलेशहर ते बक्तरपुर, ता. शेवगांव या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणाच्या कामामध्ये झालेल्या अनियमितते प्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय असल्यास सदरहु चौकशीत काय आढळुन आले व त्यानुसार संबंधीतांची जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

मजलेशहर ते बक्तरपुर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता.शेवगांव या कामाबाबत दिनांक १९/९/२०१८ रोजी तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी चौकशी केलेली आहे. सदर चौकशी अहवालानुसार खालील बाबी आढळुन आलेल्या आहेत.

१. प्रशासकिय मान्यता दिनांक १५/१२/२०१२ रक्कम रु.१५०००००/

२. तांत्रिक मान्यता दिनांक २०/१२/२०१२ रक्कम रु.१४१६३८४/

३. कामाची निविदा रक्कम- रु.१३४८९६१/

४. निविदाधारकाचे नांव-चे.गणेश मजुर सहकारी संस्था मर्या., तळणी, ता.शेवगांव

५. काम सुरू झालेचा दिनांक २/७/२०१३

६. काम पूर्ण दिनांक २७/१२/२०१३

७. कामाचा दोषनिवारण कालावधी- १ वर्ष

तपासणीचे वेळी काम पूर्ण झालेले असून ते सुस्थितीत असलेचे दिसून आले.

प्रत्यक्ष साईटवर दिनांक १९/९/२०१८ रोजी सदर रस्त्याचा नमुना खडडा घेवून त्यातुन निघालेल्या खडीकरणाच्या साहित्याचे चाचणी अहवाल जिल्हा प्रयोगशाळा (प्रधानमंत्री ग्रामसडक योजना अहमदनगर) यांचेकडून दिनांक २४/९/२०१८ रोजी प्राप्त झाले असून चाचणी अहवालाचा निष्कर्ष पाहता चाचणीमध्ये सर्व कामासाठी वापरात आलेल्या खडीचे निष्कर्ष योग्य आहेत. तसेच सदर रस्त्यासाठी वापरण्यात आलेल्या डांबराचे निष्कर्ष देखील चाचणी अहवालानुसार योग्य आहेत.

तथापि, सदर कामासाठी वापरणेत आलेल्या खडीचे चाचणी निष्कर्ष काम सुरू करणेपुर्वी घेऊन काम सुरू करणे आवश्यक होते. या प्रमाणे कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या तत्कालीन उप अभियंता व शाखा अभियंता यांना लेखी नोटिस देऊन सक्त समज देण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय**
**(बांध ३-) जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी सहमत आहे.**

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने मजलेश्वर ते बक्तरपूर तालुका शेवगाव रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण केल्याबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, हा मजलेशहर ते बक्तरपूर हा जो रस्ता आहे, त्याची प्रशासकीय मान्यता १५.१२.२०१२ रोजीची व १५ लाख रुपयांची होती. कामाची निविदा १३.४८ लाख रुपयांची होती. काम सुरू करण्यापूर्वी कच्च्या मालाची तपासणी केलेली नाही, काम सुरू करण्यापूर्वी ही तपासणी तेथे झालेली नाही. तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी चौकशी केलेली आहे. दौऱ्याच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना याबाबत चौकशीचे निदेश दिले होते या संदर्भात काही बाबी आढळून आल्या आहेत काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, तत्कालीन कार्यकारी अभियंता यांनी याबाबतची चौकशी केलेली आहे. रस्त्याचे काम जे २०१३ मध्ये पूर्ण झालेला आहे. एक वर्ष कामाचा दोष निवारण कालावधी आहे. सन २०१८ मध्ये देखील रस्ता सुस्थितीत होता. अलिकडेच कार्यकारी अभियंत्यांनी रस्त्याला भेट दिली. रस्ता सुस्थितीत होता. जो कर्मचारी काम सुरू करण्यापूर्वी सॅम्पल पाठवून त्यांची चाचणी करणे गरजेचे होते, ते केले गेलेले नाही. त्याला सक्त समज देण्यात आली आहे.

समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अशी विचारणा केली की, यामध्ये आपण फक्त समज दिली आहे परंतु तांत्रीकदृष्ट्या टेक्नीकली तो कच्चा माल तपासून पाहणे ही आपली जबाबदारी आहे. त्यांनी कर्तव्यात कसूर केलेली आहे. त्यांनी त्यांची जबाबदारी व्यवस्थतीत पार पाडली नाही. सरकारच्या नियमानुसार कच्च्या मालाची तपासणी करण्याची प्रोसेस त्यांनी राबविलीच पाहिजे. त्यांना केवळ सक्त समज देऊन कसे भागेल ? सदर कर्मचारी दुसऱ्या कोणत्या कामात देखील अशाच पद्धतीने काय करेल या कर्मचाऱ्याच्या कामात सक्त समज देऊन काही सुधारणा आढळून आल्या आहेत काय? आता सदर कर्मचारी कार्यरत आहेत का ? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, त्यांना समज मी जॉईन होण्यापूर्वीच दिलेली आहे. सदर कर्मचारी आता कार्यरत आहे.

## अभिप्राय व शिफारशी

मजलेश्वर ते बक्तरपूर (ता. शेवगांव) या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी सन २०१३-२०१४ या वर्षात रुपये १४,३१,१७१ इतका खर्च करण्यात आलेला आहे. या रस्त्यास तांत्रिक मंजुरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रक तयार करून त्यांचे तंत्रशाखेत परीनिरीक्षण करण्यात आलेले नाही. या कामाचे मंजूर नकाशे, कॉरीचार्ट व दर पृथ्थकरण अंदाजपत्रकासोबत आढळून आलेले नाहीत. त्रयस्त पक्ष नियंत्रण गठित करून काम दर्जेदार व गुणवत्तापूर्वक करून घेण्याबाबतची दक्षता घेण्यात आलेली नाही. सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या खडीचा नमुना दिनांक २६/३/२०१२ रोजी तपासणीस पाठवून दिनांक ३०/३/२०१२ रोजी अहवाल पात्र झाला मात्र या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक २/७/२०१३ रोजी देण्यात आलेला आहे. म्हणजेच या रस्त्याच्या मजबुतीकरण व डांबरीकरण या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी खडीचा नमूना चुकीच्या पद्धतीने म्हणजेच दिड वर्षापूर्वी घेण्यात आलेला आहे.

तसेच गौण खनिज वाहतूक व खाणीचे अंतर तसेच लीड चार्जेससह घेतलेले दर योग्य असल्याची लेखापरिक्षणात खात्री झाली नाही. त्यासंबंधी जिल्हा परिषदेकडून सादर करण्यात आलेल्या स्पष्टीकरणामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. याचा अर्थ स्पष्ट आहे की, गौण खनिजांचा वापर करीत असताना त्याचा परवाना घेतलेला नाही. त्यामुळेच स्वामित्वधनाची रक्कम देयकातून कपात करण्यात आली नाही. गौण खनिज वाहतूक, खाणीचे अंतर व लीड चार्जेससह घेतलेले दर योग्य नाहीत. अवैध उत्खनन करून गौण खणिजाचा वापर केलेला आहे. या रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता झालेली असल्याने या प्रकरणाची चौकशी करून सर्व संबंधितांवर कारवाई करण्यात यावी व याबाबतचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा असे समितीने निदेश दिले.

विभागीय सचिवांच्या साक्षीत समितीस अशी माहिती प्राप्त झाली की, 'मजलेश्वर ते बक्तरपूर या रस्त्याच्या कामाची चौकशी कार्यकारी अभियंता यांच्या अंतर्गत करण्यात आली. तपासणीत काम पूर्ण झाल्याचे व रस्ता सुस्थितीत असल्याचे निदर्शनास आले. प्रत्यक्ष साइटवर सदर रस्त्याचा नमुना खड्डा घेऊन त्यातून निघालेल्या खडीकरणाच्या साहित्याचे व रस्त्यासाठी वापरण्यात आलेल्या डांबराचे घेण्यात आलेल्या चाचणीचे निष्कर्ष अहवाल योग्य आहेत. तथापि, सदर कामासाठी वापरण्यात आलेल्या खडीच्या चाचणीचे निष्कर्ष काम सुरू करण्यापूर्वी घेऊन काम सुरू करणे आवश्यक होते. परंतु या प्रमाणे कार्यवाही न झाल्याने या अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या उप अभियंता व शाखा अभियंता यांना लेखी नोटीस देऊन सक्त समज देण्यात आलेली आहे.

**या रस्त्याच्या कामाच्या देयकातून स्वामित्वधनाची रक्कम कपात करण्यात आली असल्याने विनापरवाना गौण खनिजाचा वापर केल्याचे निदर्शनास येते. याबाबत कोणत्याही शासकीय नियमावली प्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने या कामासाठी किती प्रमाणात गौण खनिजाचे उत्खनन करण्यात आले हे ही स्पष्ट होत नाही. वास्तविक, उत्खनन करण्यात आलेल्या गौण खनिजाच्या प्रमाणात स्वामित्वधनाची रक्कम संबंधीतांकडून वसूल करणे आवश्यक होते. या संदर्भात लेखा परिक्षणात आक्षेप आलेला असतानाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समितीसमोर समर्पक उत्तरे देता आली नाहीत. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. व याप्रकरणी लेखा आक्षेप संदर्भात योग्य चौकशी झाली नाही असे समितीस वाटते. या प्रकरणी जुजबी चौकशी करून दोषीतांना पाठीशी घातल्याचे व त्यांना चौकशी अधिकारी यांनी संरक्षण दिले असल्याचे समितीला वाटते म्हणून या प्रकरणाची पुन्हा निष्पक्ष व त्रयस्त यंत्रणेकडून चौकशी करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**यापुढे ग्रामीण रस्ते विकास व मजबुतीकरण या योजनेअंतर्गत रस्त्यांची काम उत्कृष्ट दर्जाची होण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता नियमांतील तरतुदींनुसार कोणत्याही कामांना तांत्रिक मंजुरी देण्यापूर्वी तपशिलवार नकाशे व अंदाजपत्रक तयार करून त्यांचे तंत्रशाखेत परिनिरीक्षण करण्यासह कामाची सुरूवात होण्यापूर्वी त्या कामावर वापरण्यात येणाऱ्या साहित्यांचा चाचणी अहवाल प्राप्त झाल्यानंतरच काम सुरू करण्यात यावे. तसेच कोणत्याही कामासाठी गौण खनिजाची अवश्यकता असल्यास उत्खनन करण्यापूर्वी रितसर त्याचा परवाना घेऊन उत्खनन केलेल्याच्या प्रमाणात स्वामित्वधनाची रक्कम अदा करण्याची दक्षता घ्यावी, याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्याच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, अहमदनगर

## मौजे चिचोंडी पा. (ता.अहमदनगर) येथील कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा कामातील अनियमितता

**परिच्छेद क्रमांक ३.५१०/२ (सन २०१३-१४)**

जिल्हा परिषद अहमदनगर, सन २०१३-१४ (परिच्छेद क्रमांक २) - सदर कामावर रक्कम रु. २५,८८,७६४/- इतका खर्च करण्यात आलेला आहे. याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्र. लपाओ/१०९९/सी आर/५/ २६, दिनांक २१/१/१९९९ नुसार कोल्हापुर बंधाऱ्याचे गावतळयाचे व्यवस्थापन ग्रामपंचायतकडे हस्तांतरीत करणे आवश्यक आहे, तशी कार्यवाही करणेत येत नाही.

हस्तांतरीत टिपणी आढळुन आली नाही. आवश्यक कार्यवाही करावी.

कोल्हापुर बंधाऱ्यांची शासन निर्णय क्र. जिपर -२०००/प्र.क्र./८३७ /३५ दि. ८/५/२००२ नुसार ठेकेदाराने कामाचा व कामगारांचा विमा काम सुरू होणेपुर्वी उतरविणे आवश्यक असतांना त्याप्रमाणे कार्यवाही करणेत आलेली नाही .

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ चे कलम १०० अन्वये व महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग निर्णय जीपअ /२०००/प्र. क्र. १५६ /पंरास/८, दिनांक २९/१/२००४ अन्वये ७/१२ व महसुली उतारे प्राप्त करून नमुना नोंदवही नंबर ३९ मध्ये नोंदी घेण्यात याव्यात.

मोजमाप पुस्तिकेतील पान नं. ५ मधील कामाचा मासिक प्रगती अहवाल लिहीलेला नाही.

मोजमाप पुस्तीकेतील शेवटच्या बेरजेत चुकीची बेरीज केल्याने रुपये ९,३६०/- चे जादा प्रदान झालेले आहे. जादा प्रदान रकमेची वसुली करण्यात यावी.

जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम १४८ नुसार कामाची विहीत कालमर्यादा संपण्यापुर्वी मुदतवाढ देणे आवश्यक आहे. कामाची मुदत दिनांक २६.१२.२०१२ रोजी संपत होती. परंतु काम मुदतीत पूर्ण होत नसल्याने मुदत वाढ अर्जास मंजुरी देऊन दिनांक २६/६/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजुर करून रु. ९४०/- दंडाची आकारणी केली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

कोल्हापूर बंधाऱ्याचे व्यवस्थापनासाठी संबंधित ग्रामपंचायतीकडे हस्तांतरण करण्यात आले आहे.

कनिष्ठ तांत्रिक अधिकारी शासकीय विमा निधी म. रा. मुंबई यांचेकडील परिपत्रक.क्र. प्रविनि-२३०७ /जि.प./ अहमदनगर / विमा/ संकिर्ण अभि-२, दि. १६ नोव्हेंबर, २००७ नुसार कंत्राटदारांना कार्यारंभ आदेश देतांना त्यांचेकडून निविदा रक्कमेच्या १ टक्के रक्कम विमा हप्ता अथवा किमान विमा हप्ता रु.२२६/- या पैकी जी जास्त असेल ती रक्कम संबंधित कंत्राटदाराकडून कार्यारंभ आदेश निहाय धनाकर्षाच्या स्वरुपात संबंधित कार्यालयाकडे पाठविणे आवश्यक आहे.

सदरचे परिपत्रकात जे कंत्राटदार वर्क ऑर्डर घेतांना कंत्राटी कामाच्या १ टक्के रक्कमेचा धनाकर्ष देऊन विमा पत्र घेणार नाहीत अशा कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून कंत्राटी कामाच्या निविदा रक्कमेचा १ टक्के रक्कम विमा हप्ता अथवा किमान विमा हप्ता रु २२६/- या पैकी जी जास्त असेल ती रक्कम भरण्याची तरतुद आहे. त्यानुसार कंत्राटदाराचे प्रथम देयकातुन १ टक्के रक्कम कपात करणेत आली आहे.

सदर बंधाऱ्याचे काम नदीपात्रात करण्यात आले असून इतर कोणत्याही जागेचा वापर करण्यात आला नाही. त्यामुळे ७/१२ उतारा घेण्याची आवश्यकता नाही. सदर बंधाऱ्याची नमुना नोंदवही नंबर ३९ मध्ये नोंद घेण्यात आलेली आहे.

मोजमाप पुस्तिकेतील पान नं. ५ मधील कामाचा मासिक प्रगती अहवाल लिहीलेला आहे.

मोजमाप पुस्तीकेतील शेवटच्या पानावरील सहा. लेखाधिकारी जि. प. ल. पा. विभाग अहमदनगर यांनी पुनश्चः बेरीज केली असता ती बरोबर आढळुन आली त्यामुळे रक्कम रु. ९,३६०/- जादा प्रदान झालेली नाही.

कामाची विहित कालमर्यादा संपण्यापुर्वी मुदतवाढ न घेतल्यामुळे दंडाची आकारणी करण्यात आलेली आहे. यापुढे कामाची विहीत कालमर्यादा संपण्यापुर्वी मुदतवाढ मंजुर करण्याची दक्षता घेणेत येत आहे.

तरी सदरचा खुलासा मान्य करून परिच्छेद वगळणेस विनंती आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कोल्हापूर पद्धतीचा बंधारा मौजे चिचोंडी पाटील ता. जि. अहमदनगर या कामासंदर्भात कामगारांचा विमा काम सुरू होण्यापूर्वी उतरविण्यात आला आहे काय? शासन आदेशानुसार कामगारांचा विमा केव्हा उतरविला पाहिजे ? दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी एकाच दिवशी २ प्रमाणकाने रक्कम अदा करण्याचे कारणे काय आहेत? ९४० रुपये इतका कमी दंड कोणत्या निकषानुसार करण्यात आला आहे? अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ठेकेदाराने कामगारांचा विमा उतरविला नसल्याने त्याच्या देयकातून १ टक्का रक्कम कपात करण्यात आली आहे. याबाबत समितीने विचारणा केली की, कामाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कामगारांचा विमा काढण्यात आला आहे. सदरहू प्रकरणे काम पूर्ण झाल्यानंतर विम्याची रक्कम कपात करून विमा कंपनीकडे जमा केली आहे. विमा कंपनीला विनाकारण १ टक्का रक्कम अदा करण्यात आली आहे. सदरहू प्रकरणाचे देयक मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेकडे सादर केल्यानंतर त्यांनी आक्षेप का घेतला नाही? काम सुरू होण्यापूर्वी कामगारांचा विमा काढला पाहिजे. काम पूर्ण झाल्यानंतर विमा काढण्याची आवश्यकता नाही परंतू विमा काढून विमा कंपनीचा फायदा करून देण्यात आला. त्यामुळे वायफळ खर्च झालेला आहे. विमा कोणाकडून काढण्यात येतो ? अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, कामगारांचा विमा ऑनलाईन पद्धतीने काढण्यात येतो. सदरहू प्रकरणी भविष्यात काळजी घेण्याकरिता लेखी सूचना देण्यात येतील.

समितीने निदेश दिले की, आता देखील अनेक कामांचा विमा काढण्यात येत नाही. काम झाल्यानंतर विमा काढण्याची प्रक्रिया करण्यात येते. त्यामुळे विमा कंपनीला फायदा होत आहे. सदरहू वायफळ खर्चास कोण जबाबदार आहे? या प्रकरणी जे जबाबदार असतील त्यांचेकडून पैसे वळते करून घेण्यात यावे. काम झाल्यानंतर विम्याची रक्कम कपात केली ही चुकीची पद्धत आहे. अशा चुकीच्या पद्धतीने करोडो रुपये विमा कंपनीला देण्यात आले आहे. यानंतर अशी चुकीची पद्धत होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. बंधाऱ्याची कामे, रस्त्यांची कामे केली असतील आणि काम झाल्यानंतर विम्याची रक्कम कपात केली असेल तर तसा संपूर्ण अहवाल समितीला सादर करण्यात यावा. समिती यासंदर्भात संबंधित विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा मौजे चिचोंडी पाटील ता.जि. अहमदनगर हे काम पूर्ण झाल्यानंतर चुकीच्या पद्धतीने करोडो रुपये विमा कंपनीला अदा केल्याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात आली आहे काय ? असल्यास चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा मौजे चिचोंडी पाटील,ता.जि.अहमदनगर या कामाच्या कंत्राटी कामाचा विमा कपाती बाबत विमा संचालनालय, शासकीय विमा निधी,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडिल पत्र प्रविनि २३०७/जिप/अहमदनगर/विमा/संकीर्ण अभि-२, दिनांक १६ नोव्हेंबर २००७ मधील बाब क्रं.३ अन्वये जे कंत्राटदार कंत्राटी कामाचा विमा या कार्यालयाकडून घेणार नाहीत तसेच आपणास विमा पॉलिसी घेतल्याचा पुरावा सादर करणार नाहीत किंवा जे कंत्राटदार वर्क ऑर्डर घेताना कंत्राटी कामाच्या १ टक्के रक्कमेचा धनाकर्ष (डिडि) देऊन विमापत्र घेणार नाहीत अशा कंत्राटदाराच्या प्रथम देयकातुन कंत्राटी कामाच्या निविदा रक्कमेच्या १ टक्का रक्कम विमा हप्ता म्हणुन कपात करावी व कपात रक्कमेचा धनाकर्ष /धनादेश या कार्यालयाकडे पाठवावा असे नमुद असलेने सदर कामाच्या कंत्राटी विम्याची कपात करण्यात आलेली आहे.

कोल्हापुरी पद्धतीचा बंधारा मौजे चिचोंडी पाटील,ता.जि.अहमदनगर कामाची निविदा रक्कम रुपये २४६१३८०/- इतकी असून सदर कामाच्या प्रथम देयकातुन निविदा रक्कमेच्या १ टक्के प्रमाणे रक्कम रु.२४६१४/- प्रमाणक क्रमांक २६८ दिनांक २६/३/२०१३ रोजी कापण्यात आली आहे.तसेच सदरच्या कामात मंजुर प्रशासकीय मान्यता रक्कमेच्या आत निविदा रक्कमे मध्ये वाढ झाल्याने

त्यांच्या व्दितीय धावते देयकातुन प्रमाणक क्रं.१००१ दिनांक ३१/३/२०१३ रक्कम रु.२९६ व तृतीय व अंतीम देयकातुन प्रमाणक क्र. ९८५ दिनांक ३१/३/२०१४ रोजी रक्कम रु.१०३४/- असा एकूण रक्कम रु.२५९४४/- इतका कंत्राटी कामाचा विमा कपात करण्यात आलेला आहे.

सदरच्या कामात कपात करण्यात आलेली विम्याच्या रक्कमेचा भरणा विमा संचालनालय, महाराष्ट्र राज्य गृह निर्माण भवन, (म्हाडा), वांद्रे (पुर्व) मुंबई यांच्या कडे अनुक्रमे दिनांक २२/५/२०१३ व २०/६/२०१४ रोजी धनाकर्षाद्वारे भरण्यात आलेला आहे.या पुढे कंत्राटी कामाचा विमा काम सुरू होणे पुर्वी घेणेची दक्षता घेणेत येईल.

तरी उपरोक्त प्रमाणे अनुपालन विचारात घेऊन परिच्छेद वगळण्यास विनंती आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**मृद व जलसंधारण विभागाचा अभिप्राय :**- जिल्हा परिषद अहमदनगर यांनी केलेल्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, कोल्हापूर पद्धतीचा बंधारा मौजे चिचोंडी पाटील, ता. जि. अहमदनगर हे काम पूर्ण झाल्यानंतर चुकीच्या पद्धतीने विमा कंपनीला रक्कम अदा केलेली आहे, याबाबत चौकशी केली आहे काय? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, काम चालू करण्यापूर्वी वर्क ऑर्डरच्या दरम्यान विमा काढला पाहिजे. विमा संचालनालयाच्या सूचना देखील तशाच आहेत. वर्क ऑर्डर देताना विमा काढलेला नसेल तर त्याच्या बिलातून एक टक्का रक्कम वळती करून घेऊन ती विमा संचालनालयाकडे दिला पाहिजे, या कामाच्या बाबतीत आणि एकूणच काम सुरू करण्यापूर्वी विमा काढला पाहिजे, परंतू तिचे पालन होत नव्हते. समितीने दिलेल्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

समितीने विचारणा केली की, विमा काम सूरू करण्यापूर्वी काढण्यात यावा की काम केल्यानंतर काढावा,ग्रामविकास विभाग यावर काही कार्यवाही करणार आहे काय? या संदर्भात शासनाला काही कळविण्यात येणार आहे का? याबाबत शासनाची काय भूमिका आहे? मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, विमा काम सुरू होण्यापूर्वीच काढला गेला पाहिजे. यावर अपर मुख्य सचिव मृद व जलसंधारण विभाग यांनी समितीस अधिकची माहिती विशद केले की, शासकीय विमा निधीच्या आदेशात आधी जर विमा जमा केला नसेल तर नंतर कापून घेण्यात यावा असे त्यामध्ये नमूद आहे. काम संपल्यानंतर विम्याची रक्कम आपण कापणार असेल तर नक्कीच विम्याचा लाभ त्या कामगारांना मिळणार नाही. कोणत्याही बिलातून विम्याची रक्कम कपात करु द्या, अशाच सूचना आहे. १६ नोव्हेंबर, २००६ च्या आदेशामध्ये या बाबत कोणताही दंड नाही. नंतरची रक्कम जी आहे ती देखील केवळ एक टक्काच आहे.

तद्नंतर याबाबत संचालक स्थानिक निधी लेखा यांनी स्पष्ट केले की, विमा संचलनालयाचे जे संदर्भ आहेत, त्यामध्ये कामाचा विमा आणि कामगाराचा विमा हे दोन संदर्भ येतात. सन २०१० चे विमा संचलनालयाच्या परिपत्रकात २५ लाख रुपयांपर्यंतचे काम असेल, तर त्याचा विमा तो एक टक्का रक्कम पहिल्या आरए बिलातून कापून घ्यावा. तेथे याकरिता संधी दिलेली आहे. परंतु २५ लाखापेक्षा जास्त रकमेचे काम असेल तर त्यामध्ये ०.५ टक्के रक्कम वर्क ऑर्डरच्या आधी द्यावी लागते, असे त्यामध्ये स्पष्ट नमूद केले आहे. कारण विमा एवढ्यासाठीच काढायचा आहे की, तो ॲडव्हान्समध्ये घेऊनच ते काम सुरू करायचे आहे, डयुरिंग एझिक्यूशन त्या कामागारावर काही आपत्ती आली तर त्याकरिता नुकसान भरपाई त्या विमा कार्यालयाकडून त्यांना मिळाले पाहिजे. त्या विभागाला देखील ही नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. डीएलपी झाल्यानंतर ऑडिटमध्ये रेफरन्स आल्यानंतर बऱ्याच वेळा ते कापले जातात. नंतर त्याचा भरणा केला जातो. तसेच, केवळ ऑडिटमध्ये परिच्छेद निघतो परंतु त्या रकमेला तसा काही रिलेव्हन्स राहत नाही, केवळ ते शासनाच्या तिजोरीमध्ये जमा होत राहतो. यावर अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी स्पष्ट केले की, हे काम २५ लाख रुपयांपेक्षा कमी आहे. यासंदर्भात समितीस विभागाकडून उत्तर देण्यात आले की, पहिल्या आर.ए.बिलातून कापले तरीही चालते परंतु बऱ्याच वेळा फायनल बिलातूनच ती रक्कम कापली जाते. याबाबत अपर मुख्य सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांनी विशद केले की, खरे तर फायनल बिलातून कपात करताना दोन टक्के कापायला पाहिजे, असे केल्याने ठेकेदार ही चूक पुन्हा करणार नाही. याकरिता पेनल्टी घेणे आवश्यक आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-१४ या वर्षात मौजे चिचोंडी पा. (ता.अहमदनगर) येथील कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा या कामासाठी रुपये २५,८८,७६४/- इतकी रक्कम खर्च करण्यात आलेली आहे. कंत्राटदाराने कामाचा व कामगारांचा विमा काम सुरू होण्यापूर्वी उतरविणे आवश्यक असताना त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली नाही. तसेच कामाची मुदत दिनांक २६/१२/२०१२ रोजी संपत होती परंतु काम मुदतीत होत नसल्याने मुदतवाढ अर्जास मंजुरी देऊन दिनांक २६/६/२०१३ पर्यंत मुदतवाढ मंजुर करून नाममात्र रुपये ९४०/- इतकी दंडाची रक्कम आकारण्यात आलेली आहे.

सदरहू कामाचा व कामगारांचा विमा काम सुरू होण्यापूर्वी न काढता काम सुरू झाल्यानंतर काढण्यात आलेला आहे. कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून विमा रक्कम कपात करण्यात आलेली आहे. वास्तविक विहित वेळेत विमा न उतरविता विमा रक्कम कपात केल्याने यामध्ये विमा कंपनीचा फायदा होत असल्याचे निदर्शनास येत असल्याने याबाबतची चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी असे समितीने निदेश दिले.

या विषयासंदर्भात घेण्यात आलेल्या विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी समितीच्या असे निदर्शनास आले की, २५ लाख रूपयांपर्यंत काम असेल तर कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून कंत्राटी कामाच्या निविदा रक्कमेच्या १ टक्के रक्कम विमा हप्ता अथवा किमान विमा हप्ता रू. २२६/- या पैकी जी जास्त असेल ती रक्कम व २५ लाखापेक्षा जास्त रकमेचे काम असेल तर त्यामध्ये ०.५ टक्के इतकी विमा रक्कम कार्यारंभ आदेश देण्याआधी भरण्याबाबतचे सन २०१० चे विमा संचालनालयाचे परिपत्रक आहे. त्यानुसार सदरहू रस्त्याचे काम रुपये २५ लाखापेक्षा कमी असल्याने विम्याची रक्कम कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून कपात करण्यात आलेली आहे.

**कामाचे कार्यादेश दिल्यानंतर काम सुरू झाल्यानंतर कंत्राटदाराच्या प्रथम देयकातून विम्याची रक्कम कपात केल्यास व त्या दरम्यानच्या कालावधीत एखादी दुर्देवी घटना घडल्यास संबंधीतांना विम्याचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे विमा उतरविण्याचा उद्देश सफल होऊ शकणार नाही. यास्तव कामाची एकूण रक्कम पंचवीस लाखापर्यंत असली किंवा त्यापेक्षा जास्त असली तरीही प्रत्येक कामाचा व कामावर असलेल्या कामगारांच्या विम्याची रक्कम कार्यारंभ आदेश देण्यापूर्वी शासकीय कोषागारात भरणे अत्यावश्यक आहे. समितीने राज्यातील अनेक ठिकाणी भेटी दिल्या उक्त भेटीमध्ये लेखा आक्षेपात काम पूर्ण झाल्यानंतर विम्याची रक्कम कपात केली जाते असे आक्षेप काढण्यात आले. त्यावर कोणत्याही जिल्हा परिषदेने समाधानकारक उत्तर दिले नाही. कामाचा कार्यादेश देण्यापूर्वी संबंधित कंपनीने त्या त्या कामाची विम्याची रक्कम संबंधित अधिकाऱ्याकडे शासकीय कोषागारात भरणे आवश्यक आहे व संबंधित योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांनी अशी रक्कम विमा कंपनीकडून कामाचे कार्यादेश निघण्यापूर्वी जमा करून घेणे आवश्यक आहे. याचे कारण संबंधित काम करणाऱ्या मजुराच्या शरीरास काही इजा झाल्यास अथवा त्याचा मृत्यू झाल्यास त्याला विमा कंपनीद्वारे योग्य ती भरपाई मिळावी असा आहे. शासनाने देखील हे धोरण अवलंबिलेले आहे. असे असताना संबंधित अधिकारी विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांशी संगनमत करून उक्त कंपनीला अदेय फायदा देण्यासाठी विम्याची रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर कपात करतात. सदरची बाब अत्यंत गंभीर असून योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर या प्रकरणी जबाबदारी निश्चित करणे आवश्यक आहे. तथापि, शासनाकडून अशा अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यास दिरंगाई करण्यात येते. त्यामुळे विम्याची रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर भरण्याची प्रक्रिया वाढीस लागली आहे. ही बाब टाळण्यासाठी या प्रकरणी शासनाने फेर आढावा घेऊन ज्या ज्या लेखा आक्षेपात असे प्रकार घडले आहेत त्या सर्व आक्षेपातील विमा कंपन्याची रक्कम जप्त करावी. तसेच अशा विमा कंपन्यांना पुन्हा या योजनेत सहभागी होण्यापासून रोखण्यात यावे व त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे. तसेच जे अधिकारी काम पूर्ण झाल्यानंतर विम्याची रक्कम जमा करून घेतात अशा अधिकाऱ्यांवर त्यांचेवर दोषनिश्चिती करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, अहमदनगर

## ‘अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास’ या योजनेंतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामांसह या योजनेतील अनियमिततेबाबत

**परिच्छेद क्रमांक ३.९०९/१४ (सन २०१३-१४)**

जिल्हा परिषद अहमदनगर, सन २०१३-२०१४ (परिच्छेद क्रमांक १४ ) जिल्हा परिषद अहमदनगर येथील सन २०१३-१४ च्या लेखापरीक्षणात समाज कल्याण विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायतीला वेळोवेळी अनुदान अदा केले असून दिनांक ३१/३/२०१४ अखेर रक्कम रुपये २८,७१,५२,८००/- अखर्चित असलेचे दिसून येते.

सन २००५-०६ पासून बहुतांश कामाच्या रकमा शिल्लक असून त्यामुळे शासकीय रकमेचे मोठे नुकसान झालेले आहे. वास्तविक ग्रामपंचायतीस कामासाठी १ वर्षाची मुदत दिली असताना ८ ते ९ वर्षापुर्वीची कामेदेखील अपुर्ण आहेत. तसेच ग्रामपंचायतीस दिलेल्या प्रथम हप्त्याचा विनियोग झाला किंवा नाही याचाही विभागाने आढावा घेतलेला नाही. विविध ग्रामपंचायतीना दिलेले अनुदान व त्याअनुषंगाने सदर कामाचे मुल्यांकन याचा विचार करता रक्कम रुपये १,२८,४२०/- मुल्यांकनापेक्षा जादा अनुदान अदा झालेले आहे.

तसेच नियमाप्रमाणे विहीत मुदत संपल्यानंतर संबंधीत पंचायत संस्था/यांच्याकडून आर्थिक अनुदान मागणी करून अखर्चित रक्कम व्यपगत करून शासन सदरी भरणा करावी व तसे अनुपालन दर्शवावे. तोपावेतो सन २०१३-१४ मधील खर्च रुपये ५,६६,३८,३१३/- लेखा परिक्षणात आक्षेपाधीन ठेवणेत येत आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास (पुर्वीचे नांव दलित वस्तीत सुधार योजना) या योजनेत ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामाबाबत पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण सादर करणेत येत आहे.

जिल्हा परिषद अहमदनगर येथील सन २०१३-१४ च्या लेखापरीक्षणात समाज कल्याण विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायतीला वेळोवेळी अनुदान अदा केले असून त्यापैकी दिनांक ३१/३/२०१४ अखेर रक्कम रुपये २८,७१,५२,८००/- अखर्चित दिसत होती. तथापी महाराष्ट्र शासन, वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांकःसंकीर्ण-१००२/प्र.क्र.१२८ /अर्थोपाय, दिनांक ६ जून, २००८ नुसार एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला परंतु अखर्चित राहिलेला निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात आलेली आहे. त्यानुसार सदरची अखर्चित दिसत असलेली रक्कम रुपये-२८,७१,५२,८००/- दि. ३१ मार्च, २०१५ पुर्वी तालुकास्तरावर वित्तप्रेषणाद्वारे वर्ग करण्यात आलेली आहे.

सन २००५-०६ पासून बहुतांश कामाच्या रकमा हया विभागातील नोंदवहीतील नोंदी पूर्ण नसल्यामुळे शिल्लक दिसत होत्या. सद्यःस्थितीत नियमीत नोंदी पूर्ण केल्या जातात.

८ ते ९ वर्षापुर्वीची अपुर्ण दिसत असलेली कामे ही पूर्ण झालेली आहेत, तथापी निधी खर्च करण्यास मंजुरी अभावी अपुर्ण दिसत होती. सदरच्या अपुर्ण कामांना वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक- २५ ऑगस्ट, २०१५ (परिशिष्ट क्रमांक ७.१) नुसार मुदतवाढ आल्याने दि. ३१/०३/२०१६ अखेर निधी खर्च करून सदरची कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. २०१४ पुर्वी नियमीत आढावा घेणेत आला नव्हता. तथापी सदयस्थितीत नियमीत आढावा घेणेत येत आहे.

सदर कामांचा आढावा नियमित मासिक सभेमध्ये घेण्यात येतो. सदरची कामे विहीत मुदतीत पूर्ण करून घेणेबाबत सर्वतोपरी प्रयत्न केले जातात.

ग्रामपंचायतीने सादर केलेल्या अनुदान मागणीच्या प्रस्तावास अनुसरुन जिल्हा परिषदेने संबंधित तालुक्याचे गट विकास अधिकारी यांच्याकडेस त्या-त्या कामाच्या प्रशासकिय मंजुरी नुसार ९० टक्के रकमा वर्ग करणेत आल्या होत्या. तथापी सदर कामांचे अंतिम मुल्यांकनामध्ये या कार्यालयाने अदा केलेल्या रकमेपेक्षा कमी रकमेचे मुल्यांकन झाल्यामुळे रक्कम रुपये-१,२८,४२०/- एवढी वसूलपात्र रक्कम संबंधित ग्रामपंचायतींकडून वसूल करण्यात येऊन चलनाने शासन सदरी भरणा करण्यात आली आहे.

तपासणीच्या वेळी अखर्चित रक्कम खर्चाच्या मंजुरी अभावी पंचायत समिती / ग्रामपंचायत स्तरावर पूर्ण झालेल्या कामांच्या देयकापोटी शिल्लक असलेली दिसत होती. वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांकः संकिर्ण-१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय दिनांक २५ ऑगस्ट, २०१५ नुसार अखर्चित रक्कम खर्च करण्यास मुदतवाढ आल्याने सदरची अखर्चित रक्कम रुपये- २८,७१,५२,८००/- ही दिनांक ३१/०३/२०१६ पुर्वी खर्च करण्यात आलेली असून अपूर्ण कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. त्यामुळे सन २०१३-१४ मधील रुपये ५,६६,३८,३१३/- आक्षेपाधीन न ठेवता सदरचा परिच्छेद वगळण्यात यावा अशी विनंती आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२०१/११ (सन २०१३-१४)**

पंचायत समिती राहुरी जिल्हा अहमदनगर सन २०१३-२०१४ (परिच्छेद क्र ११) पंचायत समितीने एकूण ८७ ग्रामपंचायतींना दलीत वस्ती सुधार योजनेंतर्गत एकूण रु. ३,४७,४२,६००/- एवढे अनुदान वितरित करण्यात आल्याचे दिसून आले याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहे.

सन २०१३-१४ व तत्पुर्वीचे वर्षातील कामासाठी एकूण रुपये ३,४७,४२,६००/- एवढे अनुदान ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आलेले आहे. या कामाचे मुल्यांकन व काम पुर्णत्वाचे दाखले आढळून आले नाही. त्यामुळे कामे विहीत मुदतीत पूर्ण झाल्याची खात्री होत नाही.

अनुदानाची पडताळणी केली असता मंजुर तरतुद पुर्णतः ग्रामपंचायतीस प्रदान केली असून शासन नियमानुसार आयकर,मूल्यावर्धीत कर,विमा, कामगार कल्याण कर, गौण खनिज स्वामीत्व धन इत्यादी कपाती शासन खाती भरणा करणे बाबत कार्यान्वीत यंत्रणेने कार्यवाही केली आहे किंवा नाही या बाबत कोणतेही अभिलेख नसल्याने खात्री झाली नाही.

महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग परिपत्रक क्रमांक १ दवसु/लेप/अक्षेप/का१२ /६५१ दिनांक १६/१२/१९९७ नुसार दलीत वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर कामे ६ महीन्यात पूर्ण करणे बाबत सुचित केले आहे. तथापि मंजूर कामावर मोठया प्रमाणावर अनुदान प्रदान केलेले असताना देखील कामे अपूर्ण अवस्थेत असल्याचे दिसून येते तरी शासन उद्दीष्टानुसार सदर कामांच्या लाभापासुन ग्रामीण दलीत जनता वंचीत राहणार नाही या बाबत दक्षता घेणे आवश्यक आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला :—**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ३,४७,४२,६००/- इतके अनुदान वर्ग करणेत आले असून कामनिहाय कामाचे मुल्यांकन व काम पूर्ण झालेचे पूर्णत्वाचे दाखले प्राप्त करून घेऊन.

दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजुर असलेली सर्व कामे ही ग्रामपंचायत स्तरावर होत आहे. या बाबत विहीत मुदतीत काम पूर्ण झाले बाबत ग्रामपंचायती कडून काम पुर्णत्वाचा दाखला नमुना नं ६५ प्राप्त करून घेतला आहे. तसेच विहीत मुदतीत काम पूर्ण झाले आहे.

शासन नियमानुसार आयकर,मुल्यावर्धीत कर,विमा, कामगार कल्याण कर, गौण खनिज स्वामीत्वधन इत्यादी कपाती ग्रामपंचायत स्तरावर केल्या असून शासन खाती भरणा केला आहे.

या योजनेतील शासन निर्णय वित्त विभाग संकीर्ण १०.०२/प्र.क्र.-१२८/अर्थोपाय मुंबई ३२ अन्वये प्राप्त निधी लगतच्या वर्षात खर्च करणेस मान्यता आहे. त्यामुळे दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजूर कामे विहीत मुदतीत पूर्ण केले आहेत. काम पूर्ण असले बाबत ग्रामपंचायतींकडून (नमुना नं.६५) काम पुर्णत्वाचे दाखले सादर करीत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील दलित जनता लाभापासून वंचीत राहीलेली नाही.

तरी अनुपालन मान्य होऊन आक्षेप वगळणेस विनंती आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

**अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की,** सन २०१३-२०१४ वर्षातील जिल्हा परिषद अहमदनगर समाज कल्याण विभागांतर्गत अनुसुचित जाती व नवबौद्ध घटकाच्या वस्तीचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायतीला अनुदान अदा केलेली अखर्चित रक्कम रु.२८.७१ कोटी पुढील वर्षी खर्च केली आहे. सदर रकमेतून किती कामे घेतली व किती कामे पूर्ण केली आहेत ? सदर रक्कम ग्रामपंचायतीस अदा केली आहे की गट विकास अधिकारी व ग्रामसेवकांच्या संयुक्त खात्यामध्ये वर्ग

केली आहे. सदर रकमेपैकी किती रक्कम अखर्चित आहे? इतकी मोठी रक्कम अखर्चित राहण्याची कारणे काय आहेत? समाजकल्याण अधिकारी यांनी स्पष्ट केले की, दुसऱ्या वर्षी हा निधी खर्च झाला आहे. समितीने विचारणा केली की, मुल्यांकनापेक्षा अधिकची रक्कम प्रदान करण्यात आली आहे काय? अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासनाकडे मुदतवाढ मिळावी म्हणून प्रस्ताव पाठवून मागणी केली होती. शासनाने तो निधी खर्च करण्यासाठी मुदतवाढ दिली आणि त्यानुसार ती रक्कम खर्च केली आहे. काही कामे ९० टक्के रक्कम दिल्यानंतर उर्वरित १० टक्के रक्कमेची मागणी केली नाही आणि त्यामुळे ती रक्कम भरणा झालेली नाही. काही बाबतीत ८८ टक्के रकमेचे काम झालेले आहे आणि त्यामुळे उर्वरित रक्कम त्यांच्या पातळीवर शिल्लक होती ती मागवून घेतली व शासनाला परत केली. म्हणजे कामाच्या अंतिम मुल्यांकनामध्ये या कार्यालयाने अदा केलेल्या रकमेपेक्षा कमी रकमेचे मुल्यांकन झाल्यामुळे शिल्लक राहिलेली रु.१,२८,४२०/- इतकी रक्कम संबंधित ग्रामपंचायतीकडून वसूल करून ती चलनाने शासनाकडे भरणा करण्यात आली आहे. समितीने अशी विचारणा केली की, जी कामे अपूर्ण आहेत ती कामे पूर्ण करण्यात आली आहेत काय? समाजकल्याण अधिकारी यांनी विशद केले की, कामे अपूर्ण राहिली नाहीत.

समितीने विचारणा केली की, सदर कामे पूर्ण कसे करण्यात आली आहेत ? ते काम शासनाच्या ठरलेल्या इएसआरप्रमाणे झाले आहेत काय? अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले की, उपलब्ध असलेल्या त्याच रकमेत काम पूर्ण झाले होते. ते काम संबंधित ग्रामपंचायतीने टेंडर ने केले होते.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर कामाचे अंदाजपत्रक तयार झाले त्यानंतर तांत्रिक मंजुरी मिळाली आणि तांत्रिक मंजुरीच्या अधिन राहून वर्क ऑर्डर आणि करारनामा झाला तर निधी शिल्लक कसा राहिला ? एक तरी काम अपूर्ण राहिले आहे काय? अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, एकूण ७ कामे अशी आहेत की त्यांच्यावरील खर्चामध्ये बचत झाली आहे. समितीने विचारणा केली की, एकदा सीसी झाल्यानंतर त्या कामावर बचत कशी होईल. ते टेंडर बिलो असेल तर सेव्हींग होईल. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, जी रक्कम दिली होती त्याच्यापेक्षा कमी रक्कम खर्च झाला आहे. समितीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, सीसी म्हणजे जेवढा आपला करारनाम्यामध्ये स्कोप असेल तेवढा खर्च झालाच पाहिजे. पैसे सेव्हींग झाले म्हणजे काम अपूर्ण आहे. त्या कामाची सीसी होऊ शकत नाही. अपूर्ण कामाची आपण सीसी केली आहे काय?

अपूर्ण कामाची सी.सी.केली नाही. मौजे निंबाळे येथे ८,२६४/-, राजपूरमध्ये १५०७६/-, मजगांवमध्ये १६८७४/-, देवबावटीमध्ये १९०३५/-, पिंपळवाडीमध्ये २,०९०/- लांजेवाडीमध्ये १६,९६०/- आणि कोल्हेवाडीमध्ये ५०,२६३/- इतका निधी शिल्लक राहिला आहे. असे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट केले की, समितीने संचालक स्थानिक निधी लेखा यांना विचारणा केली की, जर आपला निधी शिल्लक राहिला असेल तर ते काम अपूर्ण आहे. कारण ग्रामपंचायतच्या नावाने करारनामा आहे आणि ते टेंडर बिलो झाले नाही. ग्रामपंचायतीने जर ते स्वतंत्र टेंडर केले नाही हे काम सीएसआरनुसार झाले आहे. जसे काम होते तेवढे काम झाले आणि सीसी मिळाली म्हणजे काम पूर्ण झाले आहे. संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी स्पष्ट केले की, ज्या स्टेजला काम पूर्ण झाले आहे त्या स्टेजला ते फायनल केले आहे. यामध्ये १० टक्के रकमेबाबत समाजकल्याण अधिकाऱ्यांनी तपासणी करायची आहे.

समितीने मत व्यक्त केले की, मुदतीत निधी खर्च होऊ शकला नाही म्हणून तो निधी परत केला आहे. त्या १० टक्के रकमेला समाजकल्याण अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली नाही. जेव्हा गट विकास अधिकाऱ्याला अधिकार देण्यात येतो तेव्हा ती १० टक्के रक्कम खर्च झाली आहे काय हे समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रमाणित करण्याची गरज नाही. कारण करारनामा संबंधित गट विकास अधिकारी आणि संबंधित ग्रामपंचायत यांच्यामध्ये होतो. प्रशासकीय मान्यता अतिरिक्त उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून देण्यात येते. समाजकल्याण अधिकारी प्रस्ताव मागवितो, समितीपुढे ठेवतो आणि जनरल बॉडीकडून त्याला मान्यता घेतो हा १० टक्के निधी अंतिम मंजुरीचा अधिकार समाजकल्याण अधिकाऱ्याची जी जबाबदारी शासन निर्णया नुसार दिली आहे त्यामुळे नुकसान होते. कारण विहित मुदतीत त्यांनी खर्च केले नाहीत म्हणून ते परत पाठविले आहेत. विहित मुदतीत ते काम झाले नाही कारण ते काम कमी करून त्या कामाची सीसी करून उर्वरित निधी त्यांनी परत करून टाकला. ९० टक्के काम पूर्ण झाल्यावर शेवटचे १० टक्के काम तपासण्याचे काम समाजकल्याण अधिकारी यांचे आहे. यासाठी या अधिकाऱ्यांकडे कोणते तांत्रिक मनुष्यबळ आहे? पंचायत समितीचेच मनुष्यबळ वापरत असेल तर समाज कल्याण अधिकाऱ्याची मंजुरीची का आवश्यकता आहे. निधी परत गेल्यामुळे सर्व दलित वस्त्यांमधील कामे अपूर्ण आहेत. म्हणून या प्रकरणी समाजकल्याण विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात यावी. यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदीत केले की, जर त्या कामांची परिस्थिती पाहिली असती तर हा निधी खर्च होऊ शकला नसता. समितीने समाजकल्याण अधिकारी यांना विचारणा केली की, आपण किती कामांना भेटी दिल्या आहेत? असल्यास त्याची माहिती समितीस सादर करावी. गेल्या वर्षी त्यांनी ५० ते ६० कामांना भेट दिली आहे. त्यांच्याकडे डायरी आहे. असे समाज कल्याण अधिकारी यांनी स्पष्ट केले.

समितीने निदेश दिले की, दलित वस्ती सुधार योजनेमध्ये ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करून दिलेला निधी फार मोठ्या प्रमाणात अखर्चित राहतो व परत जातो. त्यामुळे मागासवर्गीयांच्या वस्त्यांमध्ये ज्या प्रमाणात विकास कामे व्हायला हवीत ती न झाल्यामुळे मागासवर्गीय लोक विकासापासून वंचित राहतात. हे रोखण्यासाठी गट विकास अधिकारी (बीडीओ) आणि समाजकल्याण अधिकाऱ्यांनी वेळोवेळी त्या कामांच्या ठिकाणी भेटी देऊन तपासण्या केल्या पाहिजेत. असे केले तर शासनाचा निधी अखर्चित राहू शकत नाही. मात्र अशा प्रकारच्या तपासण्या अधिकाऱ्यांकडून होत नसल्यामुळे प्राप्त झालेला निधी मोठ्या प्रमाणात अखर्चित राहतो. हा निधी अखर्चित राहू नये यासाठी सर्व अधिकाऱ्यांची लक्ष देण्याची गरज आहे. मात्र अधिकारी या वस्त्यांकडे लक्ष देत नसल्यामुळे तो समाज वंचित राहतो. या संदर्भात सामाजिक न्याय विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल.

समितीने अशी विचारणा केली की, दलित वस्तीच्या ३.४७ कोटी रुपये निधीतून किती कामे घेण्यात आली, ती केव्हापर्यंत पूर्ण करण्यात आली, उक्त योजनेचा निधी शासन निर्णयानुसार गट विकास अधिकारी व ग्रामसेवक यांच्या संयुक्त खात्यामध्ये न ठेवता ग्रामपंचायतीकडे वर्ग का करण्यात आला, अंतिम देयक अदा करणेपूर्वी सदर कामाची तपासणी समाजकल्याण अधिकारी यांनी केली आहे काय ? गटविकास अधिकारी पंचायत राज समिती राहुरी यांनी विशद केले की, दलित वस्तीची सर्व काम विहीत कालावधीत पूर्ण करण्यात आली असून ती ग्रामपंचायत स्तरावरुन करण्यात आली आहेत. उक्त ८७ कामांचे नमुना ६५ मध्ये पूर्णत्व प्रमाणपत्र घेण्यात आले आहे. सदरहू कामांवरील खर्च दिनांक ६ जून, २००८ च्या शासन निर्णयानुसार करण्यात आला आहे. तसेच नियमानुसार करण्यात आलेल्या कपाती बाबतचे चलन प्राप्त करून घेण्यात आले आहे. समितीने विचारणा केली की, सन २००८ मध्ये कॅगने आक्षेप घेतल्यानंतरही ग्रामपंचायतीच्या बिलातून वॅट रक्कम कपात करण्यात येत आहे.याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस माहिती अवगत करण्याबाबत विचारणा केली असता. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी स्पष्ट केले की, त्यांना यासंदर्भात माहिती नाही. समितीने निदेश दिले की, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्यांना अनेक बाबींची माहिती नाही. त्यांना अभ्यास करण्याची आवश्यकता आहे मुख्य लेखा व वित्त अधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना जिल्हा परिषदेच्या संदर्भातील सर्व कामकाज व नियमांची माहिती असणे आवश्यक आहे. सदरहू प्रकरणी राज्यस्तरावर विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**परिच्छेद क्रमांक ३.९०९/१४ (सन २०१३-१४)**

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

दलित वस्ती सुधार योजनेमध्ये ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध् करून दिलेला निधी फार मोठ्या प्रमाणात अखर्चित राहतो व शासनाकडे परत जातो. त्यामुळे मागासवर्गीयांच्या वस्त्यांमध्ये तेथील लोकांना विकासकामापासून वंचित रहावे लागत असल्याप्रकरणी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून केलेल्या कार्यवाहीची माहिती सादर करण्यात यावी.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करणे (पूर्वीचे दलित वस्ती सुधार योजना) या योजनेत ग्रामपंचायत स्तरावरील विकास कामाबाबत पुढीलप्रमाणे अनुपालन सादर करणेत येत आहे :—

जिल्हा परिषद अहमदनगर येथील सन २०१३-१४ मध्ये समाज कल्याण विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायतीला वेळोवेळी अनुदान अदा केले असून त्यापैकी दिनांक ३१/३/२०१४ अखेर रक्कम रुपये २८,७१,५२,८००/- अखर्चित दिसत होती. सदरचा निधी हा ३१ मार्च २०१४ रोजी प्राप्त झालेला असल्यामुळे अखर्चित दिसून येत होता. तथापि महाराष्ट्र शासन वित्त विभागाकडील शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-१००२/ प्रक्र १२८ /आर्थोपाय , दिनांक ६ जून २००८ नुसार एखादया आर्थिक वर्षात मुक्त केलेला परंतु अखर्चित राहिलेला निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षाअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात आलेली आहे, त्यानुसार सदरचे अखर्चित दिसत असलेली रक्कम रुपये २८,७१,५२,८००/- दिनांक ३१ मार्च २०१५ पुर्वी तालुकास्तरावर वित्त प्रेषणाद्वारे वर्ग करण्यात येऊन ग्रामपंचायतींमार्फत खर्च करण्यात आलेला आहे.

अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :- जिल्हा परिषद अहमदनगर यांनी केलेल्या अभिप्रायास शासन सहमत आहे.

**परिच्छेद क्रमांक ४.२०१/११ (सन २०१३-१४)**

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

राहुरी पंचायत समिती दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत एकूण रु. ३.४७ कोटी घेण्यात आलेल्या कामाबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

सदर कामे विहित कालावधीत पूर्ण करून कामाची तपासणी समाज कल्याण अधिकारी यांनी केली आहे काय?

सन २००८ मध्ये महालेखा परीक्षक यांनी आक्षेप घेतल्यानंतरही ग्रामपंचायतचे देयकातून व्हॅट( मुल्यवर्धित कर ) रक्कम कपात करणेची कारणे काय आहेत ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात रु.३.४७ कोटी इतके अनुदान गट विकास अधिकारी पं.स. राहुरी यांचेकडे वर्ग करणेत आले आहे. कामनिहाय कामाचे मुल्यांकन व काम पूर्ण झालेचे पूर्णत्वाचे दाखले प्राप्त करून दप्तरी ठेवण्यात आलेले आहेत.

दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत मंजुर असलेली सर्व कामे ही ग्रामपंचायत स्तरावर होतात. विहीत मुदतीत काम पूर्ण झाले बाबत ग्रामपंचायती कडून काम पुर्णत्वाचा दाखला नमुना नं ६५ प्राप्त करून घेतला आहे. तसेच कामाची तपासणी समाज कल्याण अधिकारी यांनी वेळोवेळी केली आहे.

स्थानिक निधी लेखा अहमदनगर यांचेकडील सन २०१३-१४ चे लेखा परिक्षणात घेतलेला आक्षेप क्र. ११ व सार्वजनिक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र. बिडीजी -२००५ /प्रक्र/ ३२४ इमारती -२ दि. ३/३/२००६ अन्वये ४ टक्के मुल्यवर्धीत कर वसूल करणे आवश्यक आहे असे नमुद केले आहे. त्यामुळे मुल्यवर्धीत कर कपात करून शासन खाती भरणा करणेत आला आहे.

अनुपालन मान्य होणेस विनंती आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :- जिल्हा परिषद अहमदनगर यांनी केलेल्या अभिप्रायास शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, दलित वस्ती सुधार योजनेमध्ये ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध करून दिलेला निधी फार मोठया प्रमाणात अखर्चित राहतो व शासनाकडे परत जातो. त्यामुळे मागासवर्गीयांच्या वस्त्यांमध्ये तेथील लोकांना विकासकामांपासून वंचित राहावे लागत असल्यामुळे सर्व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून कार्यवाही करण्यात आली आहे काय? आयुक्त समाजकल्याण विभाग यांनी विशद केले की, ३१.०३.२०१४ अखेर २८,७१,५२,००० रुपये अखर्चित आढळून आले होते. हा निधी ३१ मार्च,२०१४ रोजी तेथेच प्राप्त झाल्यामुळे अखर्चित दिसून येत होता, परंतु सन २००६ आणि २००८ चा जो शासन निर्णय आहे, त्यातून एक वर्ष पर्यंत अधिक खर्च करण्याची मुभा आहे. लगतच्या वर्षात देखील खर्च करण्याची मुभा आहे. त्या अनुषंगाने ३१ मार्च,२०१५ पूर्वी सर्व २८ कोटी रुपये खर्च करण्यात आले आणि ग्रामपंचायतीमार्फत तशा प्रकारचा अनुपाल अहवाल देखील घेण्यात आलेला आहे.

समितीने मत व्यक्त केले की, बरीच कामे निवडत असताना कामांचे प्रस्ताव पाठवित असताना एका रस्त्याचा प्रस्ताव पाठविला, पर्यायाने तो रस्ता होत नाही किंवा तेथील स्थानिक अडचणींमुळे ते करत नाहीत. यासंदर्भात आयुक्त समाज कल्याण यांनी जिल्हा स्तरावर त्यांच्या स्तरावरून तशा सूचना देण्यात याव्यात. कोणतेही काम मंजुर करीत असताना अधिकचा आराखडा मंजूर करण्यात यावा. पर्यायाने तो जर झाला नाही तर तो पैसा दुसऱ्या ठिकाणी खर्च करता येईल, असे नियोजन करण्यात यावे अधिकचा आराखडा मंजूर करीत असताना एकच काम मंजूर न करता लोकसंख्येच्या निकषानुसार अधिकचे एक-दोन कामे मंजुर करून ठेवले पाहिजेत. ग्रामसेवकाने आराखडा मंजुर करीत असताना अधिकचा बनवून तो मंजुर करून घेतला तर अखर्चित निधी राहणार नाही. आयुक्त समाज कल्याण विभाग यांनी विशद केले की, जिल्हापरिषदांना तशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

समितीने आयुक्त समाज कल्याण यांना विचारणा केली की, काही अधिकारी स्थानिक स्तरावर हे काम करीत आहेत. सर्वसाधारण भागातून जाणारा रस्ता आता दलित वस्तीतून जात आहे, तो रस्ता घेता येत नाही, तो दलित वस्तीतील असला पाहिजे, मुख्य प्रवाहात दलित वस्तीला आणायचे तर तो रस्ता यामध्ये घेण्यात यावा. आयुक्त समाज कल्याण विभाग यांनी विशद केले की, त्यामध्ये असे आहे की, जोड रस्त्याचे (कनेक्टींग रोड) प्रोव्हिजन ऑलरेडी शासन निर्णयामध्ये आहे. परंतु कधी कधी त्याचा दुरुपयोग होतो, असेही निदर्शनास येते नागपूर जिल्ह्यातील एका गावात ते पेरिफरल प्लेस होते. नागरीकरण होत असताना संबंधित गाव शहरालगतच आहे, अशी स्थिती तेथे होती. तेथे प्लॉटिंग देखील केले होते.अशा वेळी आम्हाला संबंधितांवर कारवाई देखील करावी लागली होती. आम्ही त्यावेळी त्या लोकांवर कारवाई देखील केली होती. असा तो ग्रे एरिया तो तसा राहतो. जोड रस्ते (कनेक्टींग रोड) घ्यावेत, अशा प्रकारच्या सूचना अगोदरच आपल्या शासन निर्णयामध्ये आहेत. समितीने सूचना केली की, स्मशान भूमीची कामे त्यामध्ये घेतली पाहिजेत, बऱ्याच ठिकाणी ती अडचण येते. काम करण्याकरिता स्कोप नसतो परंतु दायित्त्व शिल्लक असते. त्यात स्मशान भूमीचे काय समाविष्ट भूमी जर ॲड केली तर ती एक सुविधा होऊ शकते. आयुक्त, समाज कल्याण विभाग यांनी या सूचनेची नोंद घेतली.

समितीने विचारणा केली की, दलित वस्ती सुधार योजना ग्रामपंचायतीस अनुदान प्रदानातील अनियमिततेबाबत जे प्रलंबित कामे होती ती पूर्ण झाली आहेत काय, आयुक्त समाज कल्याण यांनी खुलासा केला की, जेव्हा समितीने राहुरी येथे भेट दिली होती त्यावेळी समितीस कामाचे मुल्यांकन पूर्ण झाल्याचे दिसले नाही, त्या अनुषंगाने नमुना ६५ मध्ये ते काम पूर्ण केलेले आहे. त्याच पद्धतीने नमुना ६५ मध्ये त्याची तपासणी देखील केलेली आहे. स्थानिक निधी लेखा, अहमदनगर यांच्याकडून आक्षेप तपासून तो अंतिम केलेला आहे. त्यामध्ये चार टक्के व्हॅट वसूल करायचा होता स्थानिक निधी, लेखा परीक्षण, अहमदनगर यांच्या सुचनेनुसार तो व्हॅट देखील वसूल करण्यात आलेला आहे. यामुळे यांची पूर्तता झालेली आहे. संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी अधिकची माहिती विशद केली की, ही वसुली त्या वेळी व्हायला पाहिजे. शासनाचा जेवढा महसूल मागे असतो, तो कालांतराने वसूल केला तर त्यावर दंड देखील भरावा लागतो. देयक अदा करताना जेवढा आवश्यक कपात करावयाची असते, ते झाले पाहिजे, हे पाहणे गरजेचे आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१३-२०१४ च्या लेखापरिक्षणात अहमदनगर जिल्हा परिषदेतील समाज कल्याण विभागांतर्गत अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास करण्यासाठी ग्रामपंचायतींना वेळोवेळी अनुदान अदा केले असून दिनांक ३१/३/२०१४ अखेर रुपये २८,७१,५२,८००/- इतकी रक्कम अखर्चित राहिली आहे. ग्रामपंचायतींना कामांसाठी १ वर्षाची मुदत दिली असताना ८ ते ९ वर्षाची कामे देखील अपूर्ण असल्याने सन २००५-०६ पासून बहुतांश कामांच्या रक्कमा शिल्लक आहेत. विविध ग्रामपंचायतींना दिलेले अनुदान व कामांचे मुल्यांकन केले असता रुपये १,२८,४२०/- इतकी रक्कम जादा अदा केलेली आहे. तसेच सन २०१३-१४ व तत्पुर्वीचे वर्षातील कामासाठी राहुरी पंचायत समिती अंतर्गत रुपये ३,४७,४२,६००/- एवढे अनुदान ग्रामपंचायतीकडे वर्ग करण्यात आलेले आहे. या कामाचे मुल्यांकन व काम पुर्णत्वाचे दाखले आढळुन आले नाही. त्यामुळे कामे विहीत मुदतीत पूर्ण झाल्याची खात्री होत नाही.

याबाबत समितीने जिल्हा परिषदेकडून मागविलेला खुलाशात नमूद केले आहे की, "दिनांक ६ जून,२००८ रोजीच्या शासन निर्णयास अधीन राहून गत वर्षातील अखर्चित रक्कम रुपये २८,७१,५२,८००/- दिनांक ३१ मार्च, २०१५ पुर्वी तालुकास्तरावर वित्तप्रेषणाद्वारे वर्ग करण्यात आलेले आहे. तथापि, सन २००५-०६ पासुन बहुतांश कामाच्या रकमा हया विभागातील नोंदवहीतील नोंदी पूर्ण नसल्याने व सन २०१४ पूर्वी नियमित आढावा घेण्यात आला नव्हता त्यामुळे रकमा शिल्लक दिसत होत्या. सद्यःस्थितीस नियमित नोंदी पूर्ण करण्यात येत असून नियमित आढावा घेत आहे. तसेच सदर कामांचे अंतिम मुल्यांकनामध्ये अदा केलेल्या रक्कमेपेक्षा कमी रक्कमेचे मूल्यांकन झाल्यामुळे रुपये १,२८,४२०/- वसुलपात्र रक्कम संबंधित ग्रामपंचायतींकडून वसूल करून शासनाच्या खाती जमा करण्यात आली आहे. तसेच सन २०१३-१४ या आर्थीक वर्षात रु. ३.४७ कोटी इतके अनुदान गट विकास अधिकारी पंचायत समिती राहुरी यांचेकडे वर्ग करणेत आले आहे. कामनिहाय कामाचे मुल्यांकन व काम पूर्ण झाल्याचे पूर्णत्वाचे दाखले प्राप्त करून दप्तरी ठेवण्यात आलेले आहेत".

**दलित वस्त्यांना मुलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे व त्यानुषंगाने वस्त्यांच्या त्यांचा सर्वांगीण विकास करणे यासाठी अनुसूचित जातीच्या वसाहतीत सदरहू योजना राबवण्यासाठी शासनाकडून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्तीचा विकास (दलित वस्ती सुधार योजना) योजनेतंर्गत ग्रामपंचायतींना उपलब्ध करून देण्यात आलेला निधी ग्रामिण स्तरावर योग्य समन्वय ठेऊन नियोजितरित्या विकास कामांकरीता खर्च न केल्यास मोठया प्रमाणात सदरहू निधी अखर्चित राहतो व परत शासनाकडे जातो. त्यामुळे दलित वस्त्यांमध्ये ज्याप्रमाणात विकासाची कामे झाली पाहिजेत ती न झाल्यामुळे मागासवर्गीय लोक विकासापासून वंचित राहतात व या योजनेची फलनिष्पती**

**होत नाही. यास्तव अहमदनगर जिल्हास्तरावर या योजनेची २८ कोटीपेक्षा जास्त रक्कम अखर्चित राहणे, विभागातील नोंदवहीतील नोंद नियमित पूर्ण न करणे व सदर कामांचा नियमित आढावा न घेणे निश्चितच गंभीर बाब असल्याने याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.**

ग्रामपंचायत स्तरावर अनेक कामे प्रस्तावित असताना फक्त एकाच कामाचा प्रस्ताव पाठविला जातो. काही कारणास्तव किंवा तेथील स्थानिक अडचणींमुळे ते काम करता न आल्यास सदर कामाचा निधी अखर्चित राहतो. असा निधी लगेच नंतरच्या अहवाल वर्षानंतर खर्च करण्यात येतो. यासाठी शासनाकडून निधी उशिरा मिळण्याचे कारण सांगितले जाते. त्याचप्रमाणे असा निधी नंतरच्या वर्षात खर्च करण्याबाबतचे शासनाचे निदेश आहेत असेही सांगितले जाते व त्यामुळे असा निधी नंतरच्या वर्षात बऱ्याच वेळा खर्च केला जातो. त्यासाठी जिल्हा परिषदेद्वारे या कामामध्ये वेळापत्रक पाळले जात नाही व त्यामध्ये अनेक त्रुटी ठेवल्या जातात. दलित वस्तीस दिला जाणारा निधी हा संबंधित लोकांना सुविधा देण्यासंदर्भातील अत्यंत महत्वाचे शासनाचे धोरण असून यासाठी ग्रामपंचायतीद्वारा निधी दिला जातो. ग्रामपंचायतीमध्ये कौशल्य असणारे अधिकारी नसतात त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाखा अभियंत्यांना, गट विकास अधिकारी, उप अभियंता, समाजकल्याण अधिकारी यांच्यामार्फत सदरच्या योजना राबविल्या जातात. सदरच्या योजना राबविताना उक्त अधिकारी कामाचा आराखडा मंजूर न करताच कामे करणे, क्षुल्लक कारणावरुन गावातील व्यक्तींने कामात अडचण आणल्यास ते काम तसेच प्रलंबित ठेवणे व त्या कामातील अडचण दूर न करणे, अनेक वेळा निश्चित कामावरील निधी दुसऱ्याच कामावर खर्च करणे, नोंदवही अपूर्ण असणे, लेखा परिक्षणास कागदपत्रे न दाखविणे, काम केवळ कागदोपत्री दाखविणे, निकृष्ठ दर्जाचे काम करणे त्यावर प्रशासकीय अधिकाऱ्याचे नियंत्रण नसणे इत्यादी अनेक बाबी सदर दलितवस्तीतील कामे पूर्ण करीत असताना आढळून येतात. समितीच्या पाहणीत उपरोक्त बाबी आल्यानंतर समिती संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत चौकशी अहवाल सादर करण्याचे निदेश देते. अशा वेळी थातूरमातूर चौकशी करून समितीला अहवाल पाठवून तशा अधिकाऱ्यांना संरक्षण दिल्याचे प्रकारही समितीला आढळून आले आहेत असे प्रकार घडू नयेत यासाठी शासनाने सजग रहावे अशी समितीची भावना आहे. याकामी वितरीत केलेला निधी हा शासनाने त्या त्या वर्षातच वितरीत कसा होईल व तो त्या त्या वर्षात कसा खर्च होईल या दृष्टीने सर्वंकष नियोजन करणे आवश्यक आहे. यास्तव दलित वस्तीमध्ये विविध योजना राबविण्यासंदर्भात शासनाने या सर्व बाबींचा आढावा घेऊन या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासंदर्भात वा त्याची अंमलबजावणी व सनियंत्रण योग्य प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने कडक कारवाई करण्यासंदर्भात एक सर्वंकष परिपत्रक निर्गमित करून संबंधितांना त्याद्वारे कळविण्यात यावे व याबाबात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, अहमदनगर

## जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे.

**परिच्छेद क्रमांक ३.१३/१८ व ३.११९० (११) (सन २०१३-२०१४).**

**(१) परिच्छेद क्रमांक ३.१३/१८ (सन २०१३-२०१४) : -**

जिल्हा परिषद अहमदनगर सन २०१३-१४ (परिच्छेद क्र.१८) सदर अनुदान वाटपा बाबत रक्कम रुपये २८,७५,६७०००/- इतकी रक्कम खर्च करणेत आली आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.—

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्रमांक तविआ/२०१०/प्रक्रं.७३/वित्त-४, दिनांक ८ डिसेंबर २०१० कंत्राटी स्वरुपात उपलब्ध करून घेणेत आलेल्या संगणक ऑपरेटर, कनिष्ठ अभियंता यांना द्यावयाच्या एकत्रित मासिक मोबदल्याची कार्यपद्धती जिल्हा स्तरावर गठीत समितीच्या सल्ल्याने निश्चित करणे बाबत नमुद असून ६३ कनिष्ठ अभियंत्यांना रक्कम रुपये ३७,८०,०००/- इतके मानधन अदा करतांना उपरोक्त शासन निर्णयात नमुद कार्यपद्धतीचा अवलंब करणेत आला असल्याबाबतचे अभिलेख लेखा परिक्षणाचेवेळी सादर केले नाहीत. तेरावा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त जनरल बेसिक ग्रॅन्ट चे उपयोगीता प्रमाणपत्र व नमुना नंबर ७ सामान्य पावती हे अभिलेखे तपासणीस प्राप्त झाले नाही. महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय तेविआ२०११/प्र.क्रं.-४२/वित्त४ दिनांक १ नोव्हेंबर २०११ च्या परिच्छेद-ड (६) (७) (८) मध्ये नमुद केले प्रमाणे महाऑनलाईन तर्फे नेमलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामाच्या पूर्ततेबाबत तसेच मोबदला अदायगीच्या हिशोबाबाबत जिल्हा परिषद पंचायत समिती, ग्रामपंचायत स्तरावर स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात यावी असे निर्देश असून अशा नोंदवह्या लेखा परिक्षणादरम्यान तपासणीस प्राप्त झाल्या नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.—**

१. महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय क्रमांक तेविआ/ २०१०/ प्रक्रं.७३/वित्त-४ दिनांक ८ डिसेंबर २०१० अन्वये कंत्राटी स्वरुपात उपलब्ध करून घेणेत आलेल्या संगणक ऑपरेटर, कनिष्ठ अभियंता यांना द्यावयाच्या एकत्रित मासिक मोबदल्याची कार्यपद्धती जिल्हा स्तरावर गठीत समितीच्या सल्ल्याने निश्चित केलेली आहे. त्यानुसार कनिष्ठ अभियंता यांची नेमणूक जिल्हास्तर समितीने दिनांक २८/५/२०१२ चे आदेशान्वये केली आहे. नेमणूका देतांना दि.०८/१२/२०१० च्या शासन निर्णयामध्ये नमुद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. त्यामुळे सदर प्रकरणी कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही. रक्कम रुपये ३७,८०,०००/- इतके मानधन अदा करतांना उपरोक्त शासन निर्णयात नमुद केल्यानुसार विहीत कार्यपद्धतीचा अवलंब केलेला आहे. कार्यपद्धतीची नस्ती अदायगीसाठी वित्त विभागात सादर करण्यात आली असल्याने लेखा परिक्षणादरम्यान तपासणीस उपलब्ध करता आली नाही. यामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता झालेली नाही व झालेले प्रदान योग्य आहे.

२. १३ वित्त आयोग अंतर्गत ग्रामपंचायतींना प्राप्त झालेल्या जनरल बेसिक ग्रॅन्ट (सन २०१३-१४) चे उपयोगीता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात आलेले आहेत व (नमुना नंबर ७) सामान्य पावती हे अभिलेख - दप्तरी दाखल आहेत.

शासन निर्णय क्र. तेविआ-२०११ /प्र.क्रं.४२/वित्त४, दि. १ नोव्हेंबर २०११ (परिशिष्ट क्रमांक ८.१) नुसार १३ व्या वित्त आयोगांतर्गत महाऑनलाईन तर्फे कंत्राटी पद्धतीने ग्रामपंचायत स्तरावर नेमलेल्या मनुष्यबळाकडून कामाच्या पुर्ततेबाबत ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावर स्वंतत्र नोंदवह्या ठेवण्यात आल्या आहेत.

तरी वरील प्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत असून सदरचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ३.११९० (११) (सन २०१३-२०१४) :**

मुंबई स्थानिक निधी लेखा अधिनियम १९३० मधील कलम (३) प्रमाणे ज्या तारखेस लेखापरीक्षणाचे काम सुरू करण्याचे ठरले जाते त्या तारखेसंबंधी आवश्यक तेवढ्या कालावधीची लेखी नोटीस संबंधित जिल्हा परिषदेचे विभाग/पंचायत समित्या यांना कळविण्यात येते. त्यानंतर प्रत्यक्ष लेखापरिक्षण सुरू झाल्यावर अधिनियमाचे कलम ६ (१) नुसार योग्य वाटतील अशा लेख्यांच्या संदर्भात जिल्हा परिषद, पंचायत समित्या यांना अर्धसमास पत्राने अभिलेख्यांची मागणी कळविली जाते व सदरचे अभिलेखे विहित मुदतीत सादर करणेबाबत कालावधी दिला जातो. तरीसुद्धा लेखापरिक्षणास कागदपत्रे/ अभिलेखे उपलब्ध केले जात नाहीत. त्या त्या जिल्हा परिषद/

विभाग/ पंचायत समिती अंतिमीकरणाच्या वेळी अभिलेखे उपलब्ध न केलेल्या आक्षेपांबाबत सविस्तर चर्चा करतानाही असे अभिलेख उपलब्ध करणे टाळण्यात येते. त्यामुळे असे परिच्छेद लेखापरिक्षण अहवालात समाविष्ट केले जातात. अशा प्रकारचे परिच्छेद लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये निवड करणेसाठी प्रस्तावित केले जातात. व संबंधीत जिल्हा परिषद विभागांना निवड केलेले परिच्छेद कळवून त्याबाबतचे अनुपालन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी आणि गट विकास अधिकारी यांना १५ दिवसांच्या आत सादर करणेबाबत सूचित केले जाते. तथापि या सूचनेबाबतही जिल्हा परिषद व पंचायत समित्या गांभिर्याने लक्ष देत नसल्याचे आढळून येते. वर नमूद केल्याप्रमाणे संबंधीत जिल्हा परिषद विभाग व पंचायत समिती यांना लेखे उपलब्ध करून देणेसाठी आवश्यक तेवढ्या संधी उपलब्ध करून देऊनसुद्धा लेखापरिक्षणास असे अभिलेखे सादर करणेसाठी योग्य तो प्रतिसाद दिला जात नाही. सदर बाब गंभीर स्वरुपाची असल्याने ही बाब पंचायतीराज समितींच्या निदर्शनास आणण्यात येत आहे. उदाहरणादाखल, जिल्हा परिषदेचे विभाग आणि पंचायत समित्या यांनी उपलब्ध न केलेल्या अभिलेखांबाबत घेतलेले आक्षेप खाली दर्शविण्यात आले आहेत.—

| अ. क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | विभाग | लेखा परीक्षण अहवाल परिच्छेद क्र. | गुंतलेली रक्कम |
|---|---|---|---|---|
| ११ | अहमदनगर | सामान्य प्रशासन विभाग | १६ | ४,९८,८५,९३३/- |

उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, अहमदनगर यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

आक्षेपात नमुद केल्याप्रमाणे सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत विभागाच्या लेखा परिक्षणावेळी स्थानिक निधी लेखा परिक्षण परिच्छेद क्रमांक १६ आक्षेपात नमुद केलेप्रमाणे अभिलेखे लेखापरिक्षणास अभिलेखे सादर करता आले नाहीत. तरी सद्यस्थितीमध्ये सन २०१३-१४ ते आज अखेर सर्व नोंदी अद्यावत असून आक्षेपात नमुद बाबींसाठी प्राप्त झालेले अनुदान पंचायत समिती स्तरावरुन ग्रामपंचायतींना वितरीत करण्यात आलेले आहे व खर्च करण्यात आलेले आहे. तसेच सन २०१३-१४ मधील परिच्छेद क्र. १६ चे लेखापरिक्षण करून मिळणेस प्रस्ताव मा. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा, अहमदनगर यांना सादर करण्यात आलेला आहे. तसेच परिच्छेदात नमुद करण्यात आलेले सर्व अनुषंगिक लेखे अद्यावत आहेत. गट विकास अधिकारी पंचायत समिती यांचेकडून त्यांना वितरीत केलेल्या अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र दप्तरी ठेवण्यात आलेले आहेत.

१. अनुदान नोंदवही (नमुना नं. - १३)

२. खर्चाची नोंदवही - (नमुना नं. - १४)

३. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना - अनुदान वितरण (खर्च रु. २,१३,००,०००/-)

४. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना -जाहिरात खर्च (खर्च रु. ३,५१,६५८/-)

५. राजीव गांधी सशक्तीकरण अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधणे (खर्च रु. १,२१,५०,०००/-)

६. संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत खर्च (खर्च रु. १०,७५,०००/-)

७. ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविणे - ग्रा.पं. हिस्सा (खर्च रु. ७०,०९,२७५/-)

एकूण रक्कम रु. ४,१८,८५,९३३/- मात्र गुंतलेली रक्कम असून अनुदान पंचायत समिती स्तरावर वितरीत करण्यात आलेले आहे. आक्षेपात नमुद केलेप्रमाणे मुद्दा क्रं. ३ पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना अनुदान वितरण मध्ये २,९३,००,०००/- अनुदान नमुद करण्यात आलेले आहे. मात्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रं. व्हीपीएम २६१३/प्र.क्र.२३४/ पंरा-४ दि. २२/११/२०१३ नुसार रक्कम रु. २,१३,००,०००/- प्राप्त झालेले आहे. तरी आक्षेपात नमुद केले प्रमाणे आवश्यक कार्यवाही झालेली असलेने सदरचा आक्षेप स्वीकृत होणेस विनंती आहे.

## मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

अहमदनगर जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने तेरावा वित्त आयोगामार्फत प्राप्त झालेल्या जनरल बेसिक ग्रँट (सन २०१३-२०१४) अनुदान वाटपाबाबत अशी विचारणा केली की, ६३ कनिष्ठ अभियंता यांनी कोणती कामे केलेली आहेत ?

सदर कर्मचारी कार्यरत आहेत का ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीने तेव्हा ६३ कनिष्ठ अभियंत्यांची कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करण्यात आली होती. सदर समितीमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, कॅफो, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, समाजकल्याण अधिकारी यांचा समावेश होता. कंत्राटी पद्धतीवर नेमणूक करीत असताना त्याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्याकरिता १०० मार्कांची परीक्षा घेण्यात आली होती त्यात ८० मार्क लेखी परीक्षेकरिता व २० मार्क तोंडी परीक्षेकरिता होते. त्यांना दरमहा १० हजार रुपये मानधन होते. त्या अनुषंगाने त्यांना ३७.८० लाख रुपये त्यांच्या वेतनावर अदा केलेले आहेत. यावर समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी नोंद वह्या उपलब्ध का नव्हत्या ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या स्तरावर आता सदर नोंद वह्या उपलब्ध आहेत. यावर समितीने विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी नोंद वह्या उपलब्ध नव्हत्या. याचा अर्थ जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीसमोर खर्चाच्या नोंद वह्या ठेवण्यात आल्या नाहीत. ही जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (डेप्युटी सीईओ), पंचायत यांची होती. परंतु त्यांनी यासंबंधी कोणतीही कारवाई केलेली नाही. त्यामुळे हा आक्षेप लेखा परीक्षणामध्ये निघाला आहे. त्यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत या पदावर कोण कार्यरत होते. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, त्यांनी तत्कालीन सर्व अधिकाऱ्यांना समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्याबाबत कळविले होते. सदर काळात कार्यरत असलेल्या दोन सीईओ यांच्यापैकी श्रीमती अग्रवाल यांनी लेखी पत्राद्वारे कळविले आहे की, शिर्डी येथे २१ तारखेला माननीय पंतप्रधान यांचा दौरा असल्याबाबत कळविले आहे.

यानंतर समितीने विचारणा केली की, आपण ज्या तत्कालीन अधिकाऱ्यांना बैठकीस उपस्थित राहण्याबाबत कळविले आहे त्यांच्यापैकी किती अधिकारी उपस्थित आहेत व किती अधिकाऱ्यांनी बैठकीस अनुपस्थितीत राहण्याबाबत कळविले आहे. तसेच लेखी पत्रव्यवहार न करता बैठकीला किती अधिकारी अनुपस्थित आहेत ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून समितीला सांगण्यात आले की, अशाप्रकारे गैरहजर असलेले एकूण ३ अधिकारी आहेत. त्यांची माहिती समितीला देण्यात येईल. यावर समितीने विचारणा केली की, त्यावेळी असलेल्या नोंदवह्या स्थायी समितीसमोर ठेवल्या असतील तर त्याचे कार्यवृत्त समितीला दाखवावे. त्यावेळी कार्यरत असलेल्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी (डेप्युटी सीईओ), पंचायत यांनी यासंबंधी कोणतीही जबाबदारी पार पाडलेली नाही. तसेच त्यांनी जिल्हा परिषदेला डावलून सदर निधी खर्च केला आहे. आपल्याला ३ वेळा संधी देऊन सुद्धा आपल्याकडून आक्षेपाची पूर्तता झालेली नाही. त्यावर्षीच्या असलेल्या नोंदवह्या अद्ययावत करून जीबीसमोर ठेवल्या आहेत का? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नोंदवह्या अद्यावत केल्या असे उत्तर दिले.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, समिती ज्या अनुपालन अहवालावर चर्चा करीत आहे तो आपण सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी ठेवला होता का ? अद्ययावत केलेली एखादी नोंद वही समितीला दाखवावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, पहिला अनुपालन अहवाल मंजुरीसाठी सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला होता. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अद्ययावत केलेली नोंद वही समितीला दाखविण्याबाबत संमती दर्शविली. समितीने विचारणा केली की, त्यावेळी तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) कोण होते व त्यावेळी आपल्याला परफॉमन्स ग्रँट मिळाली होती का ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीस विदित केले की, त्यावेळी श्री.साळुंके तत्कालीन मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) म्हणून कार्यरत होते. व त्यावेळी परफॉर्मन्स ग्रँट मिळाली होती. यावर समितीने विचारणा केली आपल्याकडे नोंद वह्या अद्ययावत नसताना, खर्चाचा हिशेब बरोबर नसताना जिल्हा परिषदेला परफॉर्मन्स ग्रँट मिळाली याचा अर्थ आपण शासनाला चुकीची माहिती दिली आहे. परफॉर्मन्स ग्रँट कधी मिळते व त्याबाबत आपल्याला माहीत आहे का ? यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यानी परफॉर्मन्स ग्रँट कधी मिळते याबाबत माहित नसल्याचे समितीला विदित केले. यावर समितीने नाराजी व्यक्त करीत विचारणा केली की, आपल्याला सर्व बेसिक गोष्टी माहीत असणे अत्यावश्यक आहे. तसेच आपल्या जिल्हा परिषदेचा परफॉर्मन्स चांगला नसताना शासनाला चुकीची माहिती देवून आपण परफॉर्मन्स ग्रँट शासनाकडून मिळविली आहे. ही बाब अतिशय गंभीर आहे याबाबत उप मुख्य कार्यकारी अधिकारी, यांना माहीत आहे का अशी विचारणा केली असता उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, जिल्हा परिषदेला तेराव्या वित्त आयोगातून बेसिक ग्रँट मिळते. त्या संदर्भात केंद्र तसेच राज्य शासनाने जे निर्देश दिलेले आहेत त्या माध्यमातून निधी मिळाल्यानंतर तो वेळेत खर्च करून त्यासंबंधीचे लेखे जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायतीच्या स्तरावर ठेवणे, तसेच त्यासंबंधी असलेल्या कामांचा वेळोवेळी आढावा घेऊन तो दर महिन्याला शासनाला अहवाल सादर केल्यानंतर शासन स्तरावरुन आपल्याला परफॉर्मन्स ग्रँट मिळत असते. त्या अनुषंगाने इतर जिल्हयांचा निधी आपण चांगल्या कामांकरिता आपल्याकडे वळवू शकतो.

यावर समितीने मिळालेल्या माहितीबाबत विदित केले की, आपण समितीला अतिशय समर्पक व चांगले उत्तर दिले आहे. ही सर्व माहिती मुख्य लेखा व वित्त अधिकारी (कॅफो) यांना असणे अत्यावश्यक आहे. परफॉर्मन्स ग्रॅन्ट कशी मिळते हे माहिती नसेल तर ते

शासनाच्या दृष्टीने अयोग्य आहे. त्याबाबत तात्काळ अहवाल देऊन पुढील कार्यवाही करण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले पाहिजे. तसेच मुख्य लेखाधिकारी यांनी एखादे देयक मंजुरीसाठी आले असता त्यामधील सर्व बाबी तपासल्याशिवाय ते देयक अदा करु नये असा उल्लेख कोषागाराशी संबंधित नियमांमध्येच आहे. त्या सर्व बाबी म्हणजे आपल्याकडे त्या देयकाशी संबंधित कागदपत्रे आली आहेत काय, तो निधी त्या कामावर प्रत्यक्षात खर्च झाला आहे की नाही, तो निधी खर्च करण्यासाठी रितसर मंजुरी होती किंवा नाही व संबंधित देयक मंजूर करण्याशी निगडीत सविस्तर सर्व कागदपत्रे त्या देयकाला जोडली आहेत किंवा नाही हे तपासण्याचे काम ते देयक मंजूर करण्यापूर्वी खातरजमा करण्याचे काम मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे आहे. जिल्हा परिषदेच्या खाते प्रमुखांच्या कामकाजाचे मुल्यमापन सीईओ यांना करावयाचे आहे. मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून आपली नियुक्ती पहिल्यांदाच आहे काय? समितीच्या माहितीप्रमाणे आपण यापूर्वी महापालिकेमध्ये मुख्य लेखा व वित्त अधिकारी म्हणून काम केलेले आहे. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला होय असे उत्तर दिले.

यावर समितीने मत व्यक्त केले की, असे असेल तर कुठेही वित्तीय कामकाज सारखेच आहे. राज्य शासन, महापालिका किंवा जिल्हा परिषद असो तेथे वित्तीय कामकाज साधारणपणे एकसारखेच असते. येथे नवीन काही नाही. यामध्ये साध्या साध्या बाबींची विचारणा करण्यात आली आहे. प्रत्येक प्रश्नामध्ये अनेक उपप्रश्न लपलेले असतात. त्यांचा आपण अभ्यास केला पाहिजे. कारण हे तुमचेच आणि जुनेच प्रश्न आहेत. समितीने नवीन काहीच विचारले नाही त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना आपले विभागप्रमुख जर समर्पक उत्तर देत नसतील आणि समितीचे समाधान होत नसेल तर ही बाब अतिशय गंभीर आहे. अशी नाराजी व्यक्त करून समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, आपण सीईओ म्हणून त्या त्या विभागाच्या प्रमुखांना त्यांच्या अखत्यारितील विषयांचा जाणीवपूर्वक अभ्यास करण्याच्या सूचना दिल्या पाहिजेत. विभाग प्रमुखांनी समितीला समर्पक उत्तर देणे अपेक्षित आहे आणि जर एखादी बाब समजली नसेल तर त्यासंबंधी वरिष्ठांकडून मार्गदर्शन घेतले पाहिजे. आपल्याकडे राज्य शासनाचे प्रतिनिधी उपलब्ध आहेत आणि त्या त्या विभागांचे सचिव सुद्धा आहेत. त्यामुळे काही ठिकाणी अडचणी येत असल्यास आपण त्यांच्याकडून माहिती किंवा मार्गदर्शन घेतले पाहिजे. सीईओ म्हणून आता आपण या प्रकरणी सखोल चौकशी करावी आणि काही विभाग प्रमुखांच्या कामकाजाचा आढावा घ्यावा. त्यांना आवश्यक त्या बाबी अवगत करून दिल्या पाहिजेत. अशा पद्धतीने एखाद्या अधिकाऱ्याला माहिती देता येत नसेल तर त्यांच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. या संदर्भात सर्व विभाग प्रमुखांच्या बाबतीत एक महिन्याच्या आत अहवाल तयार करून समितीला सादर करावा. आपले कॅफो आणि विभागाचे संबंधित अधिकारी यांना परफॉर्मन्स ग्रॅन्ट किंवा इतर वित्तीय बाबी असतील त्यांच्या बाबतीत मंत्रालयीन सचिवांची साक्ष समिती घेईल. त्यातून एक चांगली दिशा राज्याला मिळेल. या निमित्ताने राज्यातील सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना बोलावून घेऊ. ग्रॅन्टच्या बाबतीत त्यांना माहिती व्हावी आणि हा जिल्हा गतिमान व्हावा. राज्यात इतरही काही अडचणी असतील त्या समजून घेण्याच्या दृष्टीने समितीकडून वित्त विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

यानंतर समितीने जिल्हा परिषदेने लेखापरिक्षणाच्या वेळी अभिलेखे सादर न करण्याबाबत जबाबदारांविरुद्ध कोणती प्रशासकीय व दंडात्मक कार्यवाही केली अशी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा केला की, यामध्ये रुपये ४ कोटी १८ लाख ८५ हजार ९३३ इतकी रक्कम निधी म्हणून ग्रामपंचायतीला उपलब्ध करून दिली होती. त्याचे लेखे लेखा परिक्षकांना उपलब्ध करून देण्यात आले नाहीत असा आक्षेप घेतला होता. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.—

१. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना, या योजनेसाठी रु. २,१३,००,०००/- इतके अनुदान वितरण केले होते.

२. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना, या योजनेचा जाहिरात खर्च रु.३,५१,६५८/- इतका झाला होता.

३. राजीव गांधी सशक्तीकरण अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधणे यासाठी रु.१,२१,५०,०००/- इतका निधी खर्च केला होता.

४. संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत रु.१०,७५,०००/- इतका निधी खर्च केला होता.

५. ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविणे या योजनेमध्ये ग्रामपंचायतींचा हिस्सा म्हणून रु.७०,०९,२७५/- इतका निधी खर्च केला होता. अशी एकूण रुपये ४ कोटी १८ लाख ८५ हजार ९३३ इतकी रक्कम गुंतलेली आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, समितीचा यावर आक्षेप नाही. आपण याबाबतचे अभिलेखे ऑडिटच्या वेळी सादर केलेले नाहीत. अभिलेखे कधी तयार करून घेतले आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, ते अभिलेखे आता तयार करून घेतले आहेत. समितीने मत व्यक्त केली की, पण हा विषय आताचा नाही तर सन २०१३-१४ मधील आहे. त्यावेळी आपल्याला दोन तीन वेळा संधी दिल्यानंतरही ते अभिलेखे सादर करून

आक्षेप दूर केलेले नाहीत. त्यामुळे आपण दरम्यानच्या काळात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करायला नको होती काय ? परंतु आपण तशी जबाबदारी निश्चित केली नाही. त्यावेळी याबाबत कार्यवाही करायला हवी होती. पण ती केली नाही. त्यामुळे याला कोण जबाबदार आहे ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या मताला होकारात्मक समंती दर्शवली. यावर समितीने नाराजी व्यक्त करून विचारणा केली की, आपण फक्त या विषयाचे उत्तर दिले आहे. मात्र आपण कार्यवाहीसह उत्तर दिलेले नाही. याबाबत संबंधितांविरुद्ध जबाबदारी निश्चित करायला हवी होती. याबाबत कार्यवाही करायची जबाबदारी कोणाची होती, आतापर्यंत ही कार्यवाही का करण्यात आली नाही. याला कोण जबाबदार आहे ते सांगण्यात यावे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्याबद्दल क्षमापित करावे असे सागून सदर प्रकरणात तत्कालीन सीईओ जबाबदार आहेत असे समितीला विदित केले. यावर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विदीत केले की, तुम्ही सुद्धा कार्यवाही केली नाही. त्यामुळे तुमच्यावर सुद्धा ती जबाबदारी येते. आपण ती कार्यवाही करायला हवी होती की नाही. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला कार्यवाही करायला हवी होती असे होकारात्मक उत्तर दिले.

यावर समितीने मत व्यक्त करून विचारणा केली की, आपण नियम ७ अन्वये संबंधितांवर कार्यवाही करायला हवी होती. खरे म्हणजे या पंचायती राज समितीच्या (पीआरसी) बैठकीपूर्वीच आपण समितीला सांगणे अपेक्षित होते की या प्रकरणी तत्कालीन सीईओंनी कार्यवाही केली नव्हती. मात्र समितीने आता हे लेखा आक्षेप दूर केलेले आहेत. लेखा परीक्षकांना अभिलेखाची कागदपत्रे न दाखविणे या चुकीबद्दल विभागाकडून कोणती कार्यवाही केली पाहिजे? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, शिस्तभंगाची कार्यवाही केली पाहिजे. नियम १ ते ४ प्रमाणे दोषारोपपत्र बजाविण्याचे काम करायला हवे होते. यावर समितीने प्रश्न उपस्थित केला की, या कार्यवाहीमध्ये आपणाकडून नियम ७ अन्वये २५ हजार रुपयांचा दंड आकारला पाहिजे होता. त्याची एक वेतनवाढ रोखणे आणि त्याबाबत सेवा पुस्तकात नोंद करणे या सर्व गोष्टी आपण करायला हव्या होत्या. आपण या वसुलीबाबत तात्काळ कार्यवाही करावी. एक महिन्यात ही दंडाची रक्कम वसूल होईल काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला वसुली संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यात येईल असे होकारात्मक आश्वासन दिले.

तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढील प्रमाणे निर्देश दिले की, या प्रकरणी संपूर्ण कार्यवाहीसह अहवाल समितीला सादर करावा. हे करताना त्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा गैरव्यवहार झालेला आहे आणि त्यामध्ये किती रक्कम गुंतलेली आहे याची सविस्तर चौकशी करून समितीला हा अहवाल द्यावा. हवे तर आपण यासाठी २ महिन्यांचा कालावधी घ्यावा. मात्र वसुलीच्या कार्यवाहीसह आम्हाला हा अहवाल मिळणे अपेक्षित आहे.

**(१) परिच्छेद क्रमांक ३.१३/१८ (सन २०१३-२०१४) : -**

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या ८ डिसेंबर २०१० रोजीच्या शासन निर्णयात नमुद केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात आल्याचे अभिलेखे लेखा परिक्षणावेळी सादर करण्यात आले नाहीत. यासंदर्भात १३ व्या वित्त आयोगामार्फत प्राप्त झालेल्या जनरल बेसिक ग्रॅन्ट (सन २०१३-१४ ) च्या बाबतीत विभाग प्रमुखांच्या कामकाजाचा आढावा घेऊन तयार करण्यात आलेल्या अहवालाची प्रत समितीला सादर करण्यात यावी.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग,शासन निर्णय क्रमांक तेविआ/२०१०/प्र.क्र.७३/वित्त-४, दिनांक ०८/१२/२०१० अन्वये कनिष्ठ अभियंता यांची नेमणूक करण्यात आली असून याबाबतचा दि.२८/५/२०१२ चे नेमणूक आदेशात जिल्हास्तरीय समितीच्या सल्ल्याने सर्व अटी व शर्ती नमुद करण्यात आल्या आहेत. उपरोक्त शासन निर्णय व नेमणूक आदेश यास अधिन राहून त्यामधील अटी व शर्तीनुसार रुपये ३७,८०,०००/- इतके मानधन अदायगी गट विकास अधिकारी यांचे मार्फत करण्यात आली आहे. सदरचे कनिष्ठ अभियंता यांची नेमणूक महाऑनलाईन मार्फत न होता जिल्हा परिषदेमार्फत कंत्राटी स्वरुपात करण्यात आलेली होती. या संदर्भातील नस्ती अदायगीसाठी वित्त विभागात सादर करण्यात आली होती त्यामुळे लेखापरिक्षणा दरम्यान तपासणीस उपलब्ध करता आली नव्हती. संगणक तंज्ञ व प्रोग्रॅमर, संगणक व डेटा एंट्री ऑपरेटर, हार्ड वेअर व नेटवर्क इंजिनियर इ. नेमणूक मात्र महाऑनलाईन मार्फत करण्यात आलेल्या होत्या.

१३ वा वित्त आयोग अंतर्गत ग्रामपंचायतींना प्राप्त झालेल्या जनरल बेसिक ग्रॅन्ट (सन २०१३ -२०१४ ) चे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्यात आलेले आहेत व सामान्य पावती (नमुना नंबर ७) हे अभिलेख दप्तरी दाखल आहेत.

तरी वरील प्रमाणे अनुपालन सादर करण्यात येत असून सदरचे अनुपालन स्विकृत होणेस विनंती आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय. (वित्त-४)**

जिल्हा परिषद अहमदनगर यांनी केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**(२) परिच्छेद क्र. ३.११९० (११) (सन २०१३-१४)**

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली :—**

लेखा परिक्षावेळी अभिलेखे सादर न केल्याप्रकरणी संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली आहे, तसेच त्यामध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश झालेला आहे आणि त्यामध्ये किती रक्कम गुंतवलेली आहे याची सविस्तर चौकशी करून वसुलीच्या कार्यवाहीसह अहवाल समितीला सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली :—**

सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायत विभागाच्या लेखा परिक्षणावेळी लेखा परिक्षणास दप्तर सादर न केल्यामुळे संबंधित कर्मचारी यांचेवर दंडात्मक कारवाई करणेची कार्यवाहीची तरतूद आहे. मात्र संबंधित कर्मचारी मयत झालेमुळे त्यांचेवर दंडात्मक कारवाई करता आली नाही. त्यासाठी क्षमापन मिळण्यास विनंती आहे.

आज रोजी लेखा परिक्षणासाठी सर्व अभिलेखे उपलब्ध असून सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखा अहमदनगर यांना लेखा परिक्षण करून मिळणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. स्थानिक निधी लेखा परिक्षण परिच्छेद क्रं. १६ मध्ये घेण्यात आलेल्या आक्षेपातील सर्व अभिलेखे अद्यावत आहेत. याबाबत उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आलेले आहे.

१. अनुदान नोंदवही ( नमुना नं. - १३ )

२. खर्चाची नोंदवही - ( नमुना नं. - १४ )

३. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना - अनुदान वितरण ( खर्च रु. २,१३,००,०००/- )

४. पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना -जाहिरात खर्च ( खर्च रु. ३,५१,६५८/- )

५. राजीव गांधी सशक्तीकरण अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधणे ( खर्च रु. १,२१,५०,०००/- )

६. संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत खर्च ( खर्च रु. १०,७५,०००/- )

७. ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविणे - ग्रा.पं. हिस्सा ( खर्च रु. ७०,०९,२७५/- )

एकूण रक्कम रु. ४,१८,८५,९३३/- मात्र गुंतलेली रक्कम असून अनुदान पंचायत समिती स्तरावर वितरीत करण्यात आलेले आहे. आक्षेपात नमुद केलेप्रमाणे मुद्दा क्रं. ३ पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना अनुदान वितरण मध्ये २,९३,००,०००/- अनुदान नमुद करण्यात आलेले आहे. मात्र ग्रामविकास व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन शासन निर्णय क्रं. व्हीपीएम २६१३/प्र.क्र.२३४/पंरा-४ दि. २२/११/२०१३ नुसार रक्कम रु. २,१३,००,०००/- प्राप्त झालेले आहे.

तरी आक्षेपात नमुद केले प्रमाणे आवश्यक कार्यवाही झालेली असलेने सदरचा आक्षेपात स्वीकृत होणेस विनंती आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय (वित्त - ७)**

जिल्हा परिषद अहमदनगर यांनी केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला दिनांक ४ ते ६ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक १४ डिसेंबर, २०२१ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, १३ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या जनरल बेसिक ग्रॅन्ट ( सन २०१३-१४ ) या विषयासंदर्भात माहिती देण्यात यावी. जिल्हा परिषदेने लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे असा मुद्दा आहे. किती अभिलेख्यांमध्ये नियम ७ चे उल्लंघन करण्यात आलेले आहे ? त्यावर कोणती कार्यवाही करण्यात

आली आहे ? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला पुढीलप्रमाणे माहिती दिली की, स्थानिक लेखा निधी विभागाने ३ आक्षेप घेतले होते. पहिला आक्षेप असा होता की, ६३ कनिष्ठ अभियंत्यांच्या मानधनापोटी ३७ लाख ८० हजार रुपयांची रक्कम दिलेली आहे. दिनांक ८/१२/२०१० च्या शासन निर्णयानुसार जी कार्यपद्धती निश्चित करावयाची होती ती करण्यात आलेली नाही. ती कार्यपद्धती निश्चित केली किंवा नाही, हे लेखा परीक्षणावेळेस दाखविण्यात आलेले नाही. त्यामुळे मानधनाची अदायगी योग्य आहे किंवा नाही, हे समजत नव्हते. दुसरे असे की, १३ व्या वित्त आयोगामार्फत प्राप्त बेसिक ग्रँटचे वापर (युटिलायझेशन) प्रमाणपत्र आणि सामान्य पावती नमुना ७ हे लेखापरीक्षणावेळेस उपलब्ध नव्हते. तिसरा आक्षेप असा होता की, महा ऑनलाईनमार्फत जे कर्मचारी नियुक्त केले होते त्यांच्याकडून करून घ्यावयाच्या कामाचे रजिस्टर लेखापरीक्षणावेळेस उपलब्ध करून दिले नव्हते. समितीच्या दौऱ्यावेळेस मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतेवेळेस समितीने काही सूचना केल्या होत्या. त्यामध्ये १३ व्या वित्त आयोगाच्या बेसिक ग्रँटच्या अनुषंगाने जे कामकाज झालेले आहे त्या कामकाजाचा आढावा घेऊन तो समितीकडे सादर करावयाचा आहे. याबाबतचा अहवाल समितीला सादर केला आहे. आम्ही स्थानिक निधी लेखा कार्यालयास विनंती केली आहे की, जिल्हा परिषदेचे त्या काळातील लेखापरीक्षण करून द्यावे.

समितीने मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पुढे अशी विचारणा केली की सदरहू अहवाल शासनाला सादर केला आहे, शासन या अहवालाशी सहमत आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी होकारात्मक उत्तर दिले. यावर स्थानिक निधी लेखा संचालक यांनी समितीला विदित केले की, या मुद्याच्या अनुषंगाने पुढे जेव्हा पंचायती राज समितीचा दौरा आयोजित होणार होता तेव्हा या विषयाचा पत्र व्यवहार झाला होता. तसेच जिल्हा कार्यालयाकडून नवीन अहवालाची माहिती घेतली आहे. लेखापरीक्षणामध्ये जे मूळ आक्षेप नोंदविण्यात आले आहेत त्याअनुषंगाने मूळ रेकॉर्ड अहमदनगर कार्यालयास द्यावे. तेथील स्थानिक लेखा कार्यालयातील अधिकारी पुढील आठ दिवसांमध्ये त्यावरील आक्षेप पडताळून त्याची माहिती देतील व ती माहिती समितीला सादर करण्यात येईल. तद्नुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढील काळात वेळेत लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करून देण्यात येतील असे आश्वासन समितीला दिले.

समितीने त्यावेळेस किती कनिष्ठ अभियंत्यांना अग्रीम देण्यात आले होते? असा प्रश्न उपस्थित केला असता. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, एकूण ६३ अभियंत्यांना ३७ लाख ८० हजार रुपये मानधन देण्यात आले आहे. यावर समितीने लेखापरीक्षणामध्ये काय आक्षेप घेण्यात आला होता? असा प्रश्न उपस्थित केला असता स्थानिक निधी लेखा संचालक यांनी समितीला विदित केले की, आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत, हा आक्षेप होता. जेव्हा आवश्यक कागदपत्र उपलब्ध करून दिली जात नाहीत, तेव्हा शंकेला वाव मिळतो. त्यामुळे सबंधित कागदपत्रे उपलब्ध करून दिल्यानंतर अशा प्रकारचा प्रश्नच उद्‌भवत नाही. यावर समितीने नाराजी व्यक्त करून पुढीलप्रमाणे निदेश दिले की, आपले अधिकारी इतर कामांमध्ये जी तत्परता दाखवितात तीच तत्परता अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत दाखविणे आवश्यक आहे. उक्त प्रकरणांमध्ये गुंतलेला निधी शासनाचा आहे. जिल्हा स्तरावरील अधिकारी अभिलेखे उपलब्ध करून देण्याबाबत एवढे बिनधास्त असतील तर ही गंभीर बाब आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, याबाबतची नोंद घेण्यात आलेली आहे. उक्त प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल. असे आश्वासन समितीला दिले यावर समितीने होकारात्मक संमती दर्शविली.

या नंतर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने लेखापरीक्षणासाठी अभिलेखे सादर न करणे, याबाबत आपण काय कार्यवाही केलेली आहे? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, लेखापरीक्षणावेळी अभिलेखे सादर केले नाहीत, त्यांच्याविरुद्ध काय कारवाई केली असा समितीचा प्रश्न आहे. सदर अभिलेखे सादर न केलेल्या लेख्यांमध्ये कोणकोणत्या बाबींचा समावेश आहे. त्यात किती रक्कम गुंतलेली आहे, याबाबतची चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा, असे समितीने निदेश दिले होते. समितीच्या उक्त निदेशानुसार संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे. यावर समितीने प्रश्न उपस्थित केला की, केलेल्या कारवाईचा कारवाईसह अहवाल सादर केला आहे काय? यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यालयीन अधीक्षक आणि कनिष्ठ सहाय्यक (प्रशासन) या तीन अधिकारी/कर्मचारी यांनी लेखापरीक्षणावेळी आवश्यक अभिलेखे उपलब्ध करून दिले नव्हते. यापैकी कक्ष अधिकारी व श्री.पैठणकर हे वर्ग-३ मधील कर्मचारी मयत झालेले आहेत. तत्कालीन उप मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.महाजन हे सन २०१५ मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे उक्त प्रकरणी कारवाई करता आली नाही. मात्र कागदपत्र व युटिलायझेशन सर्टिफिकेट या सर्व बाबी रेकॉर्डवर आहेत. तेव्हा जी कागदपत्रे उपलब्ध करून दिली नव्हती सर्व कागदपत्रे आता उपलब्ध केलेली आहेत. सदर कागदपत्रे आता स्थानिक निधीलेखा यांना सादर करण्यात येतील.

तद्नंतर स्थानिक निधि लेखा संचालक यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विदित केले की, आमचा ऑडीटचा प्रोग्राम रेग्युलर असतो. तसेच आमच्याकडे आडिटरची संख्या कमी आहे. त्यामुळे आपण विहित वेळेत रेकॉर्ड उपलब्ध करून दिले तर आम्हाला देखील सोयीचे होते. कधी-कधी असे होते की, रेकॉर्ड उपलब्ध करून द्या म्हणून ऑडिटर मागणी करतात आणि आपले अधिकारी/कर्मचारी

त्यांना आता वेळ नाही, म्हणून ते कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. पुन्हा असे होऊ नये, याची कृपया काळजी घ्यावी. १०० टक्के ऑडीट करणे आम्हाला शक्य होणार नाही. ज्या धोरणात्मक बाबी आहेत आणि ज्या मध्ये वित्तीय औचित्याचा भंग झालेला आहे, अशा प्रकरणाचे ऑडीट करून संक्षिप्त स्वरुपात अहवाल तयार करून तो अध्यक्ष महोदयांना सादर करण्यात येईल. त्यामुळे आपण अशा प्रकारच्या सूचना खालच्या स्तरावर देण्यात याव्यात. माहे डिसेंबर, २०२१ अखेरपर्यंत सदर कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्थानिक निधि लेखा संचालक यांनी दिलेल्या सूचनांबाबत होकारात्मक संमती दर्शवित खालच्या स्तरावर आवश्यक सूचना देण्यात येतील असे समितीला आश्वासित केले.

**अभिप्राय व शिफारशी**

अहमदनगर जिल्ह्यात सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षात ग्रामपंचायतींना आर्थिक पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजनेंतर्गत रू. २,१३,००,०००/-, या योजनेचा जाहिरात खर्च रू. ३,५१,६५८/-, राजीव गांधी सशक्तीकरण अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय बांधणे रू. १,२१,५०,०००/- , संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान अंतर्गत रू. १०,७५,०००/- व ग्रामपंचायतींना सौर पथदिवे बसविणे या योजनेंतर्गत ७०,०९,२७५/-असे एकूण ४ कोटी १८ लाख ८५ हजार ९३३ इतका निधी उपलब्ध करून दिला आहे. तसेच कंत्राटी स्वरूपात नेमण्यात आलेल्या संगणक ऑपरेटर व कनिष्ठ अभियंता यांना देण्याच्या एकत्रित मासिक मोबदल्याची कार्यपद्धती जिल्हास्तरावर गठीत करण्यात आलेल्या समितीच्या सल्ल्याने निश्चित केली आहे. यासाठी रू. ३७,८०,०००/- इतके मानधन अदा करण्यात आलेले आहे. परंतु या संदर्भातील महत्वाची कागदपत्रांसह अभिलेखे लेखापरिक्षणास उपलब्ध करून देण्यात आलेली नाहीत.

ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या स्तरावर आता उपरोक्त नमूद खर्चाची सर्व अभिलेखे उपलब्ध असून यापुढे विहित वेळेत लेखापरिक्षणास अभिलेखे उपलब्ध करून देण्यात येतील असे समितीला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी साक्षीत आश्वासित केले. यावेळेस मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना परफॉर्मन्स ग्रँट बाबतची कार्यपद्धती व इतर वित्तीय कामकाज याबाबत कोणतीही माहिती नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अभिलेखे अद्यावत व लेखापरिक्षण झालेले नसताना जिल्हा परिषदेला परफॉर्मन्स ग्रँट मिळालेली होती. याचा अर्थ स्पष्ट आहे की, शासनाला चुकीची माहिती सादर करून परफॉर्मन्स ग्रँट मिळवण्यात आलेली आहे. वास्तविक मुख्य लेखाधिकारी व वित्त अधिकारी यांच्याकडे देयके मंजूरीसाठी आली असता, सदरहू निधी त्या कामावर प्रत्यक्षात खर्च झाला आहे काय, सदरचा निधी खर्च करण्यासाठी रितसर मंजूरी घेण्यात आली आहे काय, संबंधित देयक मंजूर करण्याशी निगडित सविस्तर सर्व कागदपत्रे त्या देयकाला जोडली आहेत काय, हे तपासण्याचे काम देयक मंजूर करण्यापूर्वी मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे आहे. याबाबतची कोणतीही कार्यपद्धती अवलंबिण्यात आलेली नसल्याने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या कामकाजाबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

लेखापरिक्षणाचे काम सुरू करण्याच्या वेळी त्या तारखेसंबंधी आवश्यक कालावधीची नोटीस जिल्हा परिषद व पंचायत समित्यांना पाठविण्यात येते. लेखापरिक्षण सुरू झाल्यानंतर आवश्यक ते अभिलेखे विहित मुदतीत सादर करण्याबाबत कालावधी दिला जात असतानाही लेखापरिक्षणास कागदपत्रांसह महत्वाची अभिलेखे उपलब्ध करून दिली जात नाहीत. सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षातील अभिलेखे सादर न केल्याबाबत तीन वेळा संधी दिल्यांनतरही अभिलेखे सादर करून आक्षेप दूर केलेले नाहीत. त्यामुळे या प्रकरणातील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांच्यावर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रू. २५,०००/- दंडाची शास्ती व एक वेतनवाढ रोखण्याची कारवाई करून तशी नोंद संबंधितांच्या सेवापुस्तकात घेण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे.

**मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० मधील कलम (३) व कलम ६ (१) नुसार लेखापरिक्षणास विहित वेळेत सर्व कागदपत्रांसह अभिलेखे उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच लेखापरिक्षणाचे आक्षेप असल्यास त्याच वर्षीच अभिलेखे सादर करून आक्षेप दूर करावेत. तसेच दोषींवर महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम,१९३० च्या कलम ७ नुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर विहित वेळेत कारवाई करावी, असे निदेश भेटीच्या वेळी देऊनही अनेक प्रकरणात कारवाई झालेली नाही अशा सर्व प्रकरणांचा फेर आढावा घेऊन नियम ७ प्रमाणे दोषींवर कडक स्वरूपाची कारवाई करावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे अधिकारी व सर्व विभागांच्या खाते प्रमुखांसह लेखा अधिकारी यांना त्यांच्या अखत्यारीत असलेल्या विषयांबाबत व परफॉर्मन्स ग्रँट यासह इतर वित्तीय बाबी यासंदर्भातला अभ्यास करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच आवश्यक असल्यास राज्य शासनाचे प्रतिनिधी व विभागाचे सचिव यांच्याकडून वेळोवेळी मार्गदर्शन घेण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

## प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, अहमदनगर

## सर्वसाधारण शिफारशी

**(१) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :—**

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः अहमदनगर जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या रक्कमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निर्देशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची / अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी ती वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचा कोट्यवधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रक्कमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करून वसूल केल्या असत्या तर या रक्कमा केंव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या, शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरित परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचाऱ्यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियिमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोप पत्र दाखल करून असे प्रकरण सहा महिन्यांत निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रक्कमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुद्ध जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यवधी रूपयांचा निधी तरतूद करून मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठया प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिकाऱ्यांकडून रक्कमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यवधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणाऱ्या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिकाऱ्यांद्वारे होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुसऱ्या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करून राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत शासनाविषयी नाराजी व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रक्कमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यता यावे, अशी समितीची शिफारस आहे.**

**गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रक्कमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करून अहमदनगर जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे :**

समितीने अहमदनगर जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकरणात लेखा परिक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती ती आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी

निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परिक्षक सुरुवातीला कागदपत्रे उपलब्ध करून देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असून देखील संबंधित अधिकारी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणाऱ्या अधिकाऱ्यास केवळ १००/- रूपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे २५,०००/- रुपये (पंचवीस हजार रुपये) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परिक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करून दिली नाहीत अशा जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांना अधिनियमातील तरतुदीनुसार रुपये २५०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अहमदनगर जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची प्रकरणनिहाय संपूर्ण माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरून दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-**

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरून समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचाऱ्याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरूद्ध जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण अंगिकारल्याने कारवाई करतानादेखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करू नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निःपक्षपातीपणे चौकशी करून चौकशी अहवालामध्ये दोषीविरूद्ध कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनुसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तिक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल. परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधित व्यक्तींना नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करून "दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती" या तत्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# परिशिष्ट - "अ"

## शासनाचे आदेश व परिपत्रके

परिशिष्ट क्रमांक - ३.१

**अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली**

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ६ जून, २००८

वाचा:- **शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दिनांक: २६ सप्टेंबर २००५.**

प्रस्तावना:-

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयाद्वारे वित्त विभागाने विभागांतर्गत वर्ष अखेर अखर्चित राहिलेल्या रकमा खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे. शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला निधी पूर्णपणे खर्च करतांना येणा-या अडचणी लक्षात घेऊन उपरोक्त शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

शासन निर्णय:-

शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका, प्राधिकरणे यांना एखाद्या आर्थिक वर्षात मुक्त केलेला व अखर्चित राहीलेला निधी खर्च करण्यासाठी दिनांक ३० जून पूर्वी अनुमती घेण्याची अट शिथिल करण्यात येत आहे. आता सदर अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर पर्यंत खर्च करण्याची अनुमती देण्यात येत आहे. सदर अनुमती सन २००७-०८ व त्यापुढील अखर्चित रकमांसाठी राहील. मात्र सन २००७-०८ या आर्थिक वर्षाच्या आधी मुक्त केलेल्या व पुढील एका आर्थिक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी अखर्चित राहीलेला निधी स्थानिक संस्थांनी शासनाकडे परत करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००८०६०६१४२९५७००५ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( सु.प्र.कानडे )
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग

(कृ.मा.प.)

३।१



प्रतिः

१. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)

२. सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग,/ सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग.

३. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई.

४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परीक्षा), मुंबई.

५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,

६. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परीक्षा), नागपूर.

७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/ वांद्रे

८. निवासी लेखा अधिकारी, मुंबई

९. निवड नस्ती, अर्थोपाय

... ... ... ... ... ... ... ... शाळेत जाणा-या
आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी
उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य
भागातील अनुसूचित जाती, भटक्या जाती व
विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेखालील
परिशिष्ट क्रमांक - ४.१ विद्यार्थीनींना उपस्थिती भत्ता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

शिक्षण व सेवायोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक- पीआरई-१०९१/[९६१४]/प्राशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२
दिनांक- १० जानेवारी, १९९२.

संदर्भ :- शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.टीएसपी-१०९१/ वा.यो./उ.भ १९९१-९२/टि.एस्.पी.कक्ष, दि.२९-८-९१.

शासन निर्णय :- प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्याबाबतच्या धोरणानुसार प्राथमिक शाळेत जाणा-या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी इ. १ली ते ४थी मधील शाळेत जाणा-या " आदिवासी उपयोजना क्षेत्रातील तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राव्यतिरिक्त राज्यातील अन्य भागातील अनुसूचित जाती, भटक्या जाती व विमुक्त जमातीतील दारिद्रय रेषेतील खालील विद्यार्थीनीना नियमित शाळेत उपस्थित रहाण्यासाठी प्रतिदिनी प्रत्येक मुलीमागे १ रु.या दराने मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, इ.१ली ते ४थी मध्ये शाळेत जाणा-या अनुसूचित जमाती मधील मुलींना व अनुसूचित जाती, भटक्या व विमुक्त जमातीतील दारिद्रयरेषेखालील मुलींना व आश्रम शाळेत डेस्कॉलर मुलींना प्रतिदिनी रु १/- प्रमाणे उपस्थिती भत्ता सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील [ जोडपत्र "अ"] नियमानुसार दि. ३-१-१९९२ या क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी सुरु करण्यास नियमानुसार शासन अनुमती देत आहे.

३. यासाठी होणारा खर्च पुढील अर्थशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

१] बिगर आदिवासी क्षेत्र - लेखाशीर्ष

" २२०२ सर्वसाधारण शिक्षण-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-१०३ प्राथमिक शाळांसाठी स्थानिक संस्थांना सहाय्य[१]म.जि.प.व पं.स.अधिनियम १९६१ च्या कलम १८७ अन्वये जि.प. ना योजनांतर्गत अनुदाने [ए]राज्य

..२/-

योजनांतर्गत योजना.

२] आदिवासी क्षेत्र- लेखाशीर्ष ]

"२२०२-सर्वसाधारण शिक्षण-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-जनजाती क्षेत्र उपयोजना-१०३-प्राथमिक शाळांसाठी स्थानिक संस्थांना सहाय्य[१] महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १८७अन्वये ि अन्वये जिल्हा परिषदांना योजनांतर्गत अनुदाने [ए] राज्य योजनांतर्गत योजना [ २२०२१७९७]-टी-८" व पुरवणी मागणीद्वारे मंजूर केलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. सदर खर्च[ बिगर आदिवासी विभाग] शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक- आकनि- ११९२/१२४ अर्थसंकल्प-६ दि. ४ जानेवारी, ९२ अन्वये मंजूर केलेल्या अग्रीम रु २०,[illegible],००,०००/- [ रुपये दोन [illegible] फक्त ]" यामधून व [आदिवासी विभाग] शासन ज्ञापन वित्त विभाग क्रमांक:आकनि ११९२/१३८/अर्थसंकल्प १७, दि. ८ जानेवारी, १९९२ अन्वये मंजूर केलेल्या अग्रीम रु.८१,००,००० [रु. ऐक्याऐंशी लाख फक्त] [illegible]

४. मंजूर अग्रीम रक्कम दि.२९-२-९२ पर्यंत पूर्ण खर्च करावी व प्रत्यक्ष खर्ची पडलेल्या रकमेबाबत सविस्तर अहवाल शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिक्षण विभागास दि. १-४-९२ पूर्वी पाठवावा.

संबंधित खर्च हा आकस्मिक निधी अग्रीमामधून खर्ची पडणार असल्यामुळे महाराष्ट्र आकस्मिकता निधी नियमावलीतील नियम क्र. ६,८ व १२ प्रमाणे देयके सादर करतांना पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी :-

अ] आकस्मिक निधीतून करण्यात येणा-या खर्चासंबंधिच्या प्रत्येक प्रमाणकावर ठळकशा शाईने " रुपये आकस्मिक निधीतून अशी नोंद घेण्यात यावी.

ब] जर आकस्मिक निधीतून मंजूर झालेली रक्कम पूर्ण खर्च होणार नसेल तर अग्रीम रक्कम कमी करण्यासाठी शासनाकडे वेळीच प्रस्ताव सादर करण्यात यावा.

क] आकस्मिक निधीतून खर्च करण्यात येणा-या रकमेचा सतत मेळ घालण्यात यावा.

ड]आकस्मिक निधीतून केलेल्या खर्चासाठी काढावयाची रक्कम वेगळी बील पाठवून काढावी.

इ] अशा प्रत्येक बिलावर व प्रती पत्रावर वित्त विभागाने ज्या शासकीय ज्ञापनाद्वारे अग्रीम मंजूर केले आहे. त्याचा क्रमांक आकनि-

..३/-

५३४ अ.धं-१. दिनांक-४/१२/१९९२ [ UTS न ८००० ...
बिगर
[ आदिवासी उपयोजना क्षेत्रासाठी] व [ बिगर आदिवासी क्षेत्रासाठी
अन्वये [कोड नं. ८०००-१३८-९]
क्रमांक-आयनि- ११९२/१३८ अर्थसं-१७व दिनांक-८/१/१९९२ नमूद करावा.

फ] बीलासोबत पाठविलेल्या स्लीपवर लेखाशिर्ष कोड नंबर व खर्चाचा कोड नंबर नमूद करावा.

६] हा शासन निर्णय नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक क्रमांक- १७६३/९१/व्यय-५, व दिनांक- १६-१२-९१ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

संगणक संकेतांक २००१०९२६१९६४३४७००१ म. सु. कुलकर्णी
[ म. सु. कुलकर्णी ]
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक [ बृहन्मुंबई सोडून]
मुख्य कार्यकारी अधिकारी [ सर्व जिल्हा परिषद]
शिक्षण अधिकारी [ प्राथमिक ] सर्व जिल्हा परिषद]
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
महालेखापाल-१/२, मुंबई/नागपूर
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई
ग्राम विकास विभाग
वित्त विभाग[व्यय-५]अर्थसं-३, ६]
नियोजन विभाग
आदिवासी विकास विभाग, का-१२
समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य क्रीडा व पर्यटन विभाग,
सर्व जिल्ह्याचे जिल्हा अधिकारी व सदस्य सचिव,
जिल्हा नियोजन व विकास मंडळ,
संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक
आयुक्त, आदिवासी उपयोजना नाशिक/नागपूर.

परिशिष्ट क्रमांक - ५.१

**१३ वा वित्त आयोग**
**(सन २०१०-२०१५)**

**१३व्या वित्त आयोगांतर्गत पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी परफॉर्मन्स ग्रँटच्या स्वरुपात प्राप्त होणा-या निधीबाबत मार्गदर्शक सूचना.**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
**शासन परिपत्रक, क्रमांक- तेविआ २०१०/प्र.क्र. २२ /वित्त-४**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२**
**दिनांक- ३० ऑगस्ट,२०१०.**

**प्रस्तावना :-** केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील पंचायत राज संस्थांना त्यांच्या बळकटीकरणासाठी अनुदान देण्यात येते. दिनांक १ एप्रिल,२०१० पासून १३ व्या वित्त आयोगास प्रारंभ झाला असून त्याचा कालखंड एप्रिल २०१० ते मार्च २०१५ असा आहे. तेराव्या वित्त आयोगांतर्गत राज्याला प्राप्त होणारा निधी जनरल बेसिक ग्रँट, जनरल परफॉर्मन्स ग्रँट, स्पेशल एरिया बेसिक ग्रँट व स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँट या ४ प्रकारच्या ग्रँट्सच्या स्वरुपात प्राप्त होणार आहे. त्यापैकी जनरल बेसिक ग्रँट, स्पेशल एरिया बेसिक ग्रँटचा निधी २०१०-११ पासून राज्याला प्राप्त होणार आहे. जनरल बेसिक ग्रँट, स्पेशल एरिया बेसिक ग्रँटचा पुढील हप्ता मिळण्यासाठी त्याअंतर्गत पूर्वी वितरीत निधीच्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र केंद्र शासनाला सादर करणे आवश्यक आहे. तथापि जनरल परफॉर्मन्स ग्रँट व स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँटच्या स्वरुपात २०११-१२ पासून प्राप्त होणारा निधी १३ व्या वित्त आयोगाने विहित केलेल्या अटींची पूर्तता झाल्यानंतरच राज्याला पर्यायाने पंचायत राज संस्थांना मिळणार आहे.त्यानुसार जनरल बेसिक ग्रँट,जनरल परफॉर्मन्स ग्रँट , स्पेशल एरिया बेसिक ग्रँट, स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँट्सच्या स्वरुपात २०१०-११ ते २०१४-१५ या कालखंडात मिळणारा निधी, परफॉर्मन्स ग्रँट प्राप्त होण्यासाठी राज्याने पूर्तता करावयाच्या अटी तसेच, त्या अटींच्या पूर्ततेसाठी पंचायत राज संस्थांनी कोणत्या बाबींवर गांभीर्याने लक्ष देवून कार्यवाही करणे आवश्यक आहे, यासंदर्भात सदरचे परिपत्रक जारी करण्यात येत आहे.

**शासन परिपत्रक:-** तेराव्या वित्त आयोगांतर्गत राज्यातील पंचायत राज संस्थांच्या बळकटीकरणासाठी सन २०१०-१५ या कालखंडात जनरल बेसिक ग्रँट, जनरल परफॉर्मन्स ग्रँट, स्पेशल एरिया बेसिक ग्रँट व स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँट या ४ प्रकारच्या ग्रँटच्या स्वरुपात राज्याला प्राप्त होणारा अपेक्षित निधी पुढील प्रमाणे असेल.

२

( रुपये कोटीत )

| १३ वा वित्त आयोगाचे अनुदानाचे प्रकार | सन २०१०-११ | सन २०११-१२ | सन २०१२-१३ | सन २०१३-१४ | सन २०१४-१५ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| जनरल बेसिक ग्रँट | ५११.९५ | ५९३.७० | ६९३.११ | ८२२.१६ | ९७३.४५ | ३५९५.१७ |
| जनरल परफॉर्मन्स ग्रँट | ०.०० | २०२.९९ | ४७६.१९ | ५६१.७० | ६६२.५५ | १९०३.४३ |
| स्पेशल एरिया बेसिक ग्रँट | ७.९० | ७.९० | ७.९० | ७.९० | ७.८० | ३९.४० |
| स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँट | ०.०० | ३.९० | ७.९० | ७.९० | ७.९० | २७.६० |
| एकूण- | ५१९.८५ | ८०८.४९ | ११८५.१० | १३९९.६६ | १६५१.७० | ५५६५.६० |

**यापैकी जनरल परफॉर्मन्स ग्रँटच्या स्वरुपात प्राप्त होणारा निधी २०११-१२ पासून १३ व्या वित्त आयोगाने विहित केलेल्या खालील ९ अटींची पूर्तता झाल्यानंतरच राज्यास पर्यायाने पंचायत राज संस्थांना मिळणार आहे.**

| अट क्र. | पूर्तता करावयाची बाब |
|---|---|
| १ | अ) राज्याच्या मुळ अर्थसंकल्पीय दस्ताऐवजासोबत पंचायत राजसंस्थांना राज्याकडून वितरीत केलेल्या योजनेतर व योजनांतर्गत निधीची स्वतंत्र पुरवणी लावणे.<br>ब) सर्व पंचायत राज संस्थांमध्ये नियंत्रक व महालेखा परिक्षक (C&AG) यांनी विहीत केलेल्या नमुन्यात लेखे ठेवल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे.(प्रिया सॉफ्टची जि.प./पं.स/ग्रां.पं.स्तरावर अंमलबजावणी करणे) |
| २ | नियंत्रक व महालेखा परिक्षकांनी पंचायत राज संस्थांच्या प्रत्येक स्तराला लेखा परिक्षणाबाबत तांत्रिक मार्गदर्शन व सहाय्य (TG & A) देऊन त्याबाबत तयार केलेला वार्षिक तांत्रिक तपासणी अहवाल व संचालक स्थानिक निधी लेखा यांचा वार्षिक अहवाल विधिमंडळाला सादर करणे. |
| ३ | स्थानिक स्वराज्य संस्थांमधील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी अम्ब्युड्समनची स्वतंत्र व्यवस्था निर्माण करणे /या कामासाठी स्वतंत्र उपलोकायुक्त नेमणे |
| ४ | पंचायत राज संस्थांना वित्त आयोगाचा निधी ५ ते १० दिवसात हस्तांतरीत करण्यासाठी इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर सिस्टीम तयार करणे. |
| ५ | राज्य वित्त आयोगाच्या सदस्यांची अर्हता ठरविण्यासाठी अधिनियम तयार करणे. |
| ६ | सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना मालमत्ता कर आकारण्यास सक्षम बनविणे |
| ७ | पंचायत राज संस्थांना स्वतंत्र व पारदर्शकपणे मालमत्ता कराचे निर्धारण करण्यास सहाय्य करण्यासाठी मालमत्ता कर मंडळाची स्थापना करणे. |
| ८ | पंचायत राज संस्थांद्वारे पुरविल्या जाणा-या सेवांचा दर्जा ठरविण्यासाठी प्रत्येक जिल्हापरिषदनिहाय गुणवत्ता नियंत्रण उप विभागाची स्थापना करणे. |
| ९ | ग्रामपंचायतींच्या लोकसंख्येनुसार ग्रामपंचायतींमध्ये आगप्रतिबंधक योजना उभारणे. |

C:\Documents and Settings\abc\Desktop\GR 13 FC 23 8 2010
एच-२२२१ -१अ

**तसेच स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँटच्या स्वरुपात प्राप्त होणारा निधी २०११-१२ पासून १३ व्या वित्त आयोगाने विहित केलेल्या खालील ४ अटींची पूर्तता झाल्यानंतरच राज्यास पर्यायाने पंचायत राज संस्थांना मिळणार आहे.**

| अट क्र. | पूर्तता करावयाची बाब |
|---|---|
| १ | स्पेशल एरिया परफॉर्मन्स ग्रँट मिळवणारी यंत्रणा जर पंचायत असेल तर त्या यंत्रणेने जनरल परफॉर्मन्स ग्रँट प्राप्त होण्यासाठी आवश्यक असलेल्या अटींपैकी अट क्र.१,२,३ व ६ पूर्ण करणे आवश्यक आहे. |
| २ | जर या यंत्रणा पंचायत नसतील तर त्यांनी त्यांचे लेखे त्यांना देण्यात आलेल्या सूचनांनुसार सातत्याने ठेवावेत व त्यांचे लेखे अद्ययावतही असावेत. तसेच, त्याचे नियंत्रक व महालेखापालांकडून लेखापरिक्षण झालेले असावे आणि त्यांचे लेखा परिक्षण अहवालही सभागृहासमोर सादर केले जावेत. |
| ३ | स्थानिक स्वराज्य संस्थांमधील किमान जिल्हा स्तरीय लोकनियुक्त पदाधिकारी व शासकिय अधिकारी अभ्युदूसमनच्या कार्यकक्षेत आणले जावेत.याबाबत योग्य ती विधीविधान प्रक्रिया व अधिनियम तयार करणे आवश्यक आहे. |
| ४ | वित्त आयोगाचा निधी ५ ते १० दिवसात वितरीत करण्यासाठी इलेक्ट्रोनिक ट्रान्सफर सिस्टीम असणे आवश्यक. |

या सर्व अटींपैकी सर्व पंचायत राज संस्थांमध्ये नियंत्रक व महालेखा परिक्षक (C&AG) यांनी विहीत केलेल्या नमुन्यात (प्रिया सॉफ्ट) लेखे ठेवल्याबाबतचे प्रमाणपत्र देणे, पंचायत राज संस्थांना वित्त आयोगाचा निधी ५ ते १० दिवसात वितरीत करणे , सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना मालमत्ता कर आकारण्यास सक्षम बनविणे या संदर्भात सर्व पंचायत राज संस्थांनी गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.त्यासाठी त्यांना खालील सूचना देण्यात येत आहेत.

१) पंचायत राज संस्थांचे लेखे ठेवण्यासंदर्भात केंद्र शासनाने प्रस्तावित केलेल्या Panchayat Raj Institutions Accounting Software-PRIAsoft या संगणकिय प्रणालीच्या वापरास १ एप्रिल,२०१० पासून प्रारंभ झाला आहे. सदरची संगणाकिय आज्ञावली नियंत्रक व महालेखापाल यांनी तयार केलेल्या पंचायत राज संस्थांच्या सुधारीत नमुन्यानुसार तयार करण्यात आली आहे.त्यामुळे सर्व पंचायत राज संस्थांनी या संगणकीय आज्ञावलीतच सर्व लेखे ठेवणे आवश्यक आहे.

२) १३ व्या वित्त आयोगाचा निधी राज्य शासनाकडुन जिल्हा परिषदांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बी.डी.एस.वर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदांनी तो निधी तात्काळ कोषागारातून काढून वित्त आयोगासाठी स्वतंत्र उघडण्यात आलेल्या बँक खात्यात जमा करुन घ्यावा व जिल्हा परिषद स्तरासाठीचा निधी वगळून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरासाठीचा निधी, विहित केलेल्या निकषांच्या आधारे ५ ते १० दिवसात ग्रामपंचायतींच्या व पंचायत समित्यांच्या खात्यावर इ.सी.एस.(Electronic Clearance System)./एन.इ.एफ.टी (National Electronic Fund Transfer) किंवा आर.टी.जी.एस (Real Time

५.१



Gross Settlement) या आधुनिक बँकिंग सिस्टीमद्वारे वर्ग करावा.यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ज्या बँका निधी हस्तांतरणाच्या वरील आधुनिक सुविधा उपलब्ध करुन देतील,अशा आय.एफ.एस.सी. (IFSC) कोड धारण केलेल्या व एम.आय.सी.आर.(MICR) कोड असलेल्या राष्ट्रीयकृत बँका, शड्युल्ड बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व जिल्हा मध्यवर्ती बँका यांना प्राधान्य द्यावे. कोणत्याही परिस्थीतीत पंचायत समित्या व ग्रामपंचायतींना वितरीत करावयाच्या निधीचे ५ ते १० दिवसातच वितरण करावे. निधी वितरणास विहीत कालावधीपेक्षा विलंब झाल्यास त्यावर द्यावयाच्या व्याजाची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची राहील.

३) स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्वउत्पन्न वाढविण्यासाठी त्यांनी त्यांचे कर व करेतर उत्पन्न वाढविणे आवश्यक आहे. मालमत्ता कर कायद्याप्रमाणे जे कर पंचायत राज संस्था आकारु शकतात, ते कर त्यांनी पूर्णपणे आकारुन वसूल करावेत. तसेच त्यांचे मार्फत नागरिकांना पुरविल्या जाणा-या विविध सेवांसाठी आकारले जाणारे उपभोक्ता शुल्क ( User Charges ) पूर्ण क्षमतेने वसूल करावेत व त्यांचे स्वतंत्र हिशेब ठेवावेत.

सदरचे शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक-**२०१००९०११९३५५१००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

३०.०८.१०

**(एकनाथ मोरे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

प्रति,
मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
मा.सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
सर्व विभागीय आयुक्त.(महसूल)
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य लेखा परिक्षक , स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व उपसचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-१५/अर्थोपाय / वित्त आयोग कक्ष.)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग ( सर्व कार्यासने )

---

C:\Documents and Settings\abc\Desktop\GR 13 FC 23 8 2010
एच-२२९१ -२३।•

परिशिष्ट क्रमांक - ५.२

राज्यातील ग्रामीण रस्त्याच्या देखभालीसाठी रस्त्यांचे बांधकाम करणा-या कंत्राटदारावर देखभालीची जबाबदारी सोपविणे तसेच कामाची माहिती दर्शविणारे फलक कामाच्या ठिकाणी बसविणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
शासन निर्णय, क्रमांक -जिपर-२००९/प्र.क्र.१८०/पंरा-८,
दिनांक:- ३१ डिसेंबर,२००९.

**वाचा :-** १. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक सिएटी-१०८७/प्र.क्र.९४/इमा-२, दिनांक १४.६.१९८९

२. शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग,क्रमांक-संकीर्ण-०५/०६/प्र.क्र.५३/इमा-२, दिनांक ८.९.२००६.

३. शासन परिपत्रक,ग्राम विकास व जलसंधारण विभाग,क्रमांक-झेडपीए-२००६/प्र.क्र.३७६/वित्त-९, दिनांक २९.१.२००७

४. शासन पत्र, समक्रमांक दिनांक ४.७.२००९.

५. शासन पत्र, समक्रमांक दिनांक ३.८.२००९

**शासन निर्णय :-**

राज्यातील ग्रामीण भागातील रस्त्यांची गुणवत्ता योग्य दर्जाची ठेवण्याच्या दृष्टीने रस्त्यांची कामे पूर्ण झाल्यानंतर संबंधीत कंत्राटदाराने दोष निवारण कालावधीमध्ये रस्त्यांची देखभाल दुरुस्ती त्यांच्या खर्चाने करणे आवश्यक आहे. या संदर्भात शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक सिएटी-१०८७/प्र.क्र.९४/इमा.२, दिनांक १४.६.१९८९ अन्वये सविस्तर सुचना दिलेल्या आहेत. तथापि, दोष निवारण कालावधीमध्ये कंत्राटदाराकडून रस्त्याच्या खराब झालेल्या भागाची दुरुस्ती होत नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

२. या अनुषंगाने सर्व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिका-यांना तसेच जिल्हा परिषदेअंतर्गत सर्व कार्यकारी अभियंता यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

(१) राज्यातील ग्रामीण रस्त्यांच्या संदर्भात दोष निवारण कालावधी हा शासनाच्या वर उल्लेख केलेल्या दिनांक १४.६.१९८९ च्या निर्णयानुसार कामाच्या निविदेमध्ये तंतोतंत नमूद करण्यात यावा. ही जबाबदारी निविदा प्रपत्रे मंजूर करणा-या अधिका-याची राहील.

(२) दोष निवारण कालावधीमध्ये रस्त्याची देखभाल दुरुस्ती करण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील व ही जबाबदारी संबंधित कंत्राटदार काळजीपूर्वक पार पाडतो याचे सनियंत्रण जिल्हा परिषदेचे कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेकडून

करण्यात येईल. तसेच दुरुस्तीचे काम केल्याबाबतचे अभिलेखही जिल्हापरिषदेचे कार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेकडून व्यवस्थित ठेवण्यात यावेत.

(३) प्रत्यक्ष कामांच्या जागी विहित प्रपत्रात कामाची माहिती दर्शविणारे फलक तातडीने बसविण्यात यावेत. या माहिती फलकामध्ये कंत्राटदाराचे नाव, कार्यारंभ आदेश, कामाचा खर्च,काम पूर्ण करावयाचा दिनांक, दोष निवारण कालावधी या सर्वांचा स्पष्ट उल्लेख असणे आवश्यक राहील.

(४) संबंधित कंत्राटदाराकडून निविदा करारातील अटी व शर्तीचे पालन न झाल्यास तसेच कामाचा गुणात्मक दर्जा राखला न गेल्यास अथवा दोष निवारण कालावधीमध्ये रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी काळजीपूर्वक पार पाडण्यात आली नसल्यास संबंधीत कंत्राटदारावर शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांक-संकीर्ण-०५/ ०६/प्र.क्र.५३/ इमा-२, दिनांक २८.९.००६ अन्वये कारवाई करण्यात यावी.

३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर विषय त्यांच्या मासिक बैठकीमध्ये समाविष्ट करावा व त्यांच्या अधिपत्याखालील संबंधित कार्यकारी अभियंता व इतर अधिका-यांकडून वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही होईल याबाबत दक्षता घ्यावी. वरील सूचनांप्रमाणे कार्यवाही न करणा-या अधिकारी /कर्मचा-यांविरुध्द शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ मधील कलम १० खालील तरतूदीनुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी.

४. सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २००९१२३११३४४१९००१ आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( दि. ग. मोरे )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित:-**

१.सर्व विभागीय आयुक्त.
२.सचिव (रस्ते, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
३.सर्व जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
४.सर्व उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय
५.सर्व जिल्हापरिषदांचे कार्यकारी अभियंता (बांधकाम)
६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
७.कार्यासन क्रमांक वित्त-९, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई-४०० ०३२
८.कार्यासन क्रमांक पंरा-८, निवड नस्ती, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

परिशिष्ट क्रमांक - ७.१

**शासनाने वितरीत केलेल्या अनुदानापैकी अखर्चित निधी खर्च करण्याबाबतची कार्यप्रणाली.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: संकिर्ण-१०.१५/प्र.क्र.१८/अर्थोपाय**
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक:- २५ ऑगस्ट,२०१५.

<u>वाचा</u>:- १) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.२६ सप्टेंबर,२००५.
२) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.३१ ऑगस्ट, २००७..
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.१५ नोव्हेंबर, २००७.
४) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक संकिर्ण १०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.६ जून,२००८.

**<u>प्रस्तावना</u>:-**

उपरोक्त संदर्भाधिन शासन निर्णयान्वये शासनाने जिल्हा परिषदा, नगर परिषदा, महानगरपालिका तसेच शासनाकडून विविध महामंडळांना/प्राधिकरणांना वितरीत केलेल्या निधीपैकी वर्ष अखेर अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्याची कार्यप्रणाली विषद केली आहे महापालिका, नगरपरिषदा व जिल्हापरिषदा यांना वितरित केलेला निधी त्या आर्थिक वर्षानंतरच्या पुढील एका वर्षात खर्च करण्याची मुभा आहे. त्यानंतर शासनाची मान्यता आवश्यक आहे. अशा अखर्चित निधीबाबत विभागाकडून आढावा होऊन व अखर्चित निधी खर्च करण्याची परवानगी देत असताना प्रत्यक्ष निधीची उपलब्धता, प्रत्यक्ष काम झाले आहे किंवा कसे व त्याच कामावर एकाहून अधिक स्त्रोतातून निधी खर्च होत नाही या बाबींची तपासणी आवश्यक असते. या सर्व बाबी विचारात घेऊन व ही पध्दत अधिक सुटसुटीत व्हावी यासाठी पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:-**

दि. ३१.०३.२०१४ पर्यंतच्या अखर्चित निधीसंदर्भात खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

अ) प्रशासकीय विभागांनी अशा अखर्चित निधी संदर्भात तात्काळ आढावा घ्यावा. सदर आढावा दि.३०.०९.२०१५ पर्यंत पूर्ण करण्यात यावा.

ब) बांधकामाव्यतिरिक्त (वेतन, अनुदान व सवलती, इत्यादी) अखर्चित निधी तात्काळ शासनास जमा करण्यात यावा.

क) बांधकामाच्या निधीसंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी:-

(i) जी कामे भौतिकदृष्टया पूर्ण झाली आहेत व खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकत नाही, अशा सर्व प्रकरणी खर्चाची परवानगी विभाग स्तरावर देण्यात यावी. परवानगी देत असताना त्याच कामावर इतर स्रोतातून खर्च न झाल्याची खात्री विभागाने करावी.

(ii) जी कामे सुरू होऊन भौतिकदृष्टया अपूर्ण आहेत, ती कामे पुढील दि.३१.०३.२०१६ पर्यंत पूर्ण होतील असे विभागाकडून नियोजन केले जाईल या अटींच्या अधीन राहून दि. ३१.०३.२०१६ पर्यंत खर्च करण्याची परवानगी विभागस्तरावर देण्यात यावी.

(iii) जी कामे अद्याप सुरू नाहीत त्याचा निधी तात्काळ शासन जमा करावा.

ङ) प्रशासकीय विभागांनी यापुढे अनुदान मुक्त करत असताना विहीत मुदतीत (म्हणजेच पुढील वर्षाच्या दि.३१ मार्च पर्यंत) खर्च होईल तेवढेच अनुदान वितरित करण्याची दक्षता घ्यावी.

२. दि.३१.०३.२०१४ पर्यंत अखर्चित राहिलेला निधी खर्च करण्यास मान्यता मिळण्यासाठीच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करावी व दि.३१.०३.२०१४ नंतर मुक्त केलेल्या निधीच्या संदर्भात पुर्वीचे आदेश लागू राहतील व असा निधी विहीत मुदतीत खर्च करण्याची पूर्ण जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०८२५१७१६३२५८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Vasant Krishna Patil

Digitally signed by Vasant Krishna Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Finance Department, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasant Krishna Patil
Date: 2015.08.25 17:41:26 +05'30'

(व.कृ.पाटील)
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

१) अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व मंत्रालयीन विभाग)
२) सर्व उप सचिव, अवर सचिव, वित्त विभाग / सर्व व्यय कार्यासने, वित्त विभाग
३) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
४) महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परिक्षा), मुंबई
५) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
६) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परिक्षा), नागपूर
७) संचालक, लेखा व कोषागारे
८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे
९) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१०) निवड नस्ती (अर्थोपाय)

परिशिष्ट क्रमांक - ८.१

१३ वा वित्त आयोग.

१३ व्या वित्त आयोगांतर्गत वितरीत निधीतून, ई-पीआरआय / ई-पंचायत प्रकल्पासाठी महाऑनलाईनतर्फे कंत्राटी पद्धतीने जि.प./पं.स. /ग्रा.पं.स्तरावर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला द्यावयाच्या मोबदल्याची अदायगी जिल्हापरिषद स्तरावरून करणेसाठी द्यावयाच्या मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
**शासन निर्णय, क्रमांक- तेविआ २०११/प्र.क्र.४२/वित्त-४**
**मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक- १ नोव्हेंबर,२०११.**

वाचा- १) शासन निर्णय क्र.तेविआ २०१०/प्र.क्र.२२/वित्त-४, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई, दिनांक ३०/८/२०१०.
२) शासन निर्णय क्र.तेविआ २०११/प्र.क्र.२९/वित्त-४, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई , दिनांक २५/३/२०११.
३) सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्र.मातंसं/ नस्ती-०८ /७० दि.२७ जुलै २००९ व दि. २२ मार्च २०११.
४) शासन निर्णय क्र.व्हीपीएम २०१०/प्र.क्र.६/पंरा-३, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई, दिनांक २६/४/२०११.
५) शासन निर्णय क्र.व्हीपीएम २०१०/प्र.क्र.६/पंरा-३, ग्राम विकास व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई, दिनांक ३०/४/२०११.
६) शासन परिपत्रक, क्रमांक- तेविआ २०११/प्र.क्र.४२/वित्त-४ मंत्रालय,मुंबई-३२. दिनांक- ३०/४/२०११.
७) शासन निर्णय, क्रमांक- व्हीपीएम-२०११/प्र.क्र.६/पंरा-३ मंत्रालय,मुंबई-३२. दिनांक- २८/९/२०११.

प्रस्तावना :-

राज्यातील पंचायत राज संस्थांचे बळकटीकरण करुन त्यांचे कामात सुसूत्रता, एकसूत्रीपणा व पारदर्शकता आणण्यासाठी केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने e-PRI/e-Panchayat हा प्रकल्प राबवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्यातील पंचायत राज संस्थांमध्ये ई-पीआरआय हा प्रकल्प राबविण्याचा निर्णय संदर्भ क्र.४ च्या शासन निर्णयान्वये ग्राम विकास विभागाने घेतला आहे. सदर प्रकल्पासाठी १३ व्या वित्त

आयोगाच्या वितरीत निधीतून सर्व ग्रामपंचायतींना, पंचायत समितींना व जिल्हा परिषदांना, केंद्र शासनाकडून प्राप्त होणा-या विविध सॉफ्टवेअर्सची अंमलबजावणी होईल अशा उच्चक्षमतेच्या संगणक, प्रिंटर कम स्कॅनर मशीन,यु.पी.एस. ई-स्वाक्षरी मोड्यूल, इंटरनेट जोडणी अशा सुविधा पुरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, ई-पीआरआय प्रकल्पाचे कार्यान्वयन सुरळीत होण्यासाठी महाऑनलाईनतर्फे पंचायत राज संस्थांना उपलब्ध करुन दिलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून दरमहा द्यावयाचा मोबदला व त्या मोबदल्याची अदायगी महाऑनलाईनला करण्याबाबतची कार्यवाही यासंदर्भात संदर्भ क्र.६ च्या शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. ई-पीआरआय प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी महाऑनलाईनतर्फे पंचायत राज संस्थांना पुरविण्यात आलेल्या कंत्राटी मनुष्यबळाने करावयाची कामे व त्यांना द्यावयाच्या मोबदल्याच्या अदायगीबाबतच्या सूचना संदर्भ क्र.७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. महाऑनलाईनतर्फे संदर्भ क्र.६ च्या शासन परिपत्रकानुसार जिल्हा परिषद/पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर जे तांत्रिक मनुष्यळ उपलब्ध करुन देण्यात आले आहे,त्या मनुष्यबळाला १३ व्या वित्त आयोगाच्या निधीतून द्यावयाच्या मोबदल्याची कार्यपध्दती व प्रक्रिया अधिक सुलभ व सोईस्कर व्हावी असे निदेश शासनाने दिले आहेत. त्यानुसार संदर्भ क्र.६ च्या परिपत्रकान्वये ठरविलेला मोबदला महाऑनलाईनतर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला देताना पालन करावयाची सुधारित कार्यपध्दती व प्रक्रिया तसेच, १३ व्या वित्त आयोगांतर्गत जनरल बेसिक ग्रँट व जनरल परफॉर्मन्स ग्रँटच्या स्वरुपात पुढील काळात पंचायत राज संस्थांना उपलब्ध होणा-या निधीतून महाऑनलाईनच्या तांत्रिक मनुष्यबळाला द्यावयाच्या मोबदल्याबाबतचे नियोजन करण्यासंदर्भात या शासन निर्णयान्वये पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय-</u>

ई-पीआरआय (ई-पंचायत) या प्रकल्पाच्या अंमलबजावणीस महाऑनलाईनतर्फे जिल्हा परिषद /पंचायत समिती व ग्रामपंचायत स्तरावर जे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन

देण्यात येणार आहे, त्यांना द्यावयाच्या मोबदल्याबाबत संदर्भ क्र.६ च्या शासन परिपत्रकान्वये यापूर्वीच निदेश देण्यात आले आहेत. तसेच, महाऑनलाईनतर्फे पंचायत राज संस्थांच्या तीन्ही स्तरावर पुरविण्यात आलेल्या कंत्राटी मनुष्यबळाची निर्देशित कामे व त्यांना द्यावयाच्या मोबदल्याच्या अदायगीबाबतच्या आवश्यक सूचना संदर्भ क्र.७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार संदर्भ क्र.६ च्या शासन परिपत्रकान्वये निश्चित केलेला मोबदला त्या तांत्रिक मनुष्यबळाने संदर्भ क्र.७ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेली कामे केल्यानंतर त्यांना अदा करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

(अ) ई-पीआरआय प्रकल्पासाठी महाऑनलाईन तर्फे कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या तांत्रिक मनुष्यबळाला मोबदला अदा करताना पालन करावयाची सुधारित कार्यपध्दती-

